
E-BOOK
सुपर डुपर हिटस्
- दिलीप ठाकूर
१

# "ई साहित्य प्रतिष्ठान"
# सादर करीत आहे
# "श्री. दिलीप ठाकूर" लिखित
# " सुपर डुपर हिट्स "



**© - "श्री. दिलीप ठाकूर" (जेष्ठ सिनेपत्रकार व चित्रपट विश्लेषक)**
glam.thakurdilip@gmail.com 9870616216

हजारो दर्जेदार मराठी ई-पुस्तके!
फक्त 'एकच' क्लिक ..... आणि ई-पुस्तक हजर
**For all 'E-Sahitya' E-Books.. Visit/Log on**
**https://www.esahity.com**
**(पुस्तक वाचण्यासाठी कव्हरवर एक क्लिक करा- एक मिनिट थांबा- बस्स)**
**तुमच्या आवडीची पन्नास पुस्तके डाऊनलोड करून मोबाईलवर ठेवा.**
**आरामात वाचा!, लोकांनाही फॉरवर्डा. चकटफू !**

"सुपर डुपर हिट्स" ©

लेखक : दिलीप ठाकूर

प्रकाशन : १५ मार्च, २०२५

© esahity Pratishthan®2025

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com          esahity@gmail.com

ई साहित्य प्रतिष्ठान : Whatsapp - 9987737237

(फ्री पुस्तकांसाठी नाव व गाव कळवा)

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

हे "ई बुक" वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी "ई साहित्य प्रतिष्ठान" ची लेखी परवानगी आवश्यक!

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

**लक्षात घ्या. हे बोलके "ई बुक" आहे. या "ई बुक" मधील प्रत्येक "फोटो"वर  तसेच "निळ्या रंगातील मजकूर", यावर सुद्धा "लिंक्स" दिलेल्या आहेत. फक्त "क्लिक" करा, आणि त्यावरील "ऑडिओ व व्हिडिओज" चा मनसोक्त आनंद घ्या.**

## ♥ लेखकांविषयी थोडेसे ♥

दिलीप ठाकूर
(जेष्ठ सिनेपत्रकार व चित्रपट विश्लेषक)
जन्म २० एप्रिल १९६०

अलिबाग तालुक्यातील चौल गावात जन्म झालेल्या "दिलीप ठाकूर" यांचे बालपण, शालेय आणि महाविद्यालयीन जीवन मुंबईत गिरगावातील खोताची वाडीतील अवघ्या दहा बाय दहाच्या खोलीत घडताना एकीकडे दक्षिण मुंबईतील अनेक चित्रपटगृहात स्टॉलच्या तिकीटात सतत  नवे जुने चित्रपट पाहणे आणि त्या काळातील अनेक साप्ताहिके, मासिके, दिवाळी अंक वाचणे यात घडले. शिवाय गल्ली क्रिकेट

आणि गल्ली चित्रपट यातून जनसामान्यांशी नाळ जुळली होतीच. त्यांनी गिरगावातील हिंद विद्यालय हायस्कूलमध्ये शालेय तर चौपाटीच्या भवन्स कॉलेज मध्ये उच्च शिक्षण घेतले. यातूनच विद्यार्थी दशेतच त्यांनी विविध नियतकालिकांमधून वृत्तपत्र लेखन सुरु केले. एकाद्या लेखावरचे मत अथवा एकाद्या ताज्या घडामोडीवरचे आपले मत 'वाचकांच्या पत्रा'तून प्रसिद्ध होत आहेत या त्यांच्यासाठी खूपच मोठा उत्साहाचा भाग होता. मार्मिक, रसरंग, चित्रानंद, सोबत, लोकप्रभा, क्रीडांगण, मनोहर अशा साप्ताहिकातून आपली पत्रे तर कधी लेखही प्रसिद्ध होत असल्याने त्यांचा लेखनातील कल वाढला. १९८२ साली त्यांनी नवशक्ती दैनिकात प्रूफ रिडर म्हणून रुजू झाले आणि त्याबरोबरच रविवार नवशक्तीत चित्रपटविषयक सदरही लिहायला मिळाले. १९८६ साली त्यांना संपादकीय विभागात बढती देण्यात

आली. तेव्हापासूनचा त्यांचा प्रवास खूप वळणा वळणाचा आहे. एकीकडे हॅन्ड कंपोझ (म्हणजे हाताने खिळे लावणे) ते डिजिटल मिडिया अशी तर दुसरीकडे सिंगल स्क्रीन थिएटर्स ते ओटीटी प्लॅटफॉर्म अशी त्यांची वाटचाल आहे. ऐशी आणि नव्वदच्या दशकात त्यांनी खूपच मोठ्या प्रमाणावर अनेक दैनिके आणि साप्ताहिकात विविध टोपणनावाने चित्रपटविषयक सदर लेखन केले. "राजा दिलीप", "स्पॉटबॉय", "पिक्चरवाला", "सिनेमावाला", "राजा चौलकर", "राजा फिल्मीस्तानी" वगैरे टोपणनावानी खूपच मोठ्या प्रमाणावर लेखन केले. मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीतील प्रत्यक्षात शूटिंग रिपोर्टींगसाठी सेटवर जाणे, चौफेर निरीक्षण आणि लहान मोठ्या स्टार्ससह अनेक प्रकारचे तंत्रज्ञ आणि कामगार, चित्रपट वितरक व प्रदर्शक यांच्याशी संवाद साधणे यातून त्यांच्याकडे वेगळी माहिती, संदर्भ, तपशील,

आठवणी यांची जमा होत गेली. याचीच पुढची पायरी म्हणून २००३ सालापासून त्यांचे चित्रपटविषयक लेख संग्रह प्रसिद्ध होत आहेत. आतापर्यंत त्यांची पंचेचाळीस पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यात "स्थित्यंतरातील सिनेमा", "क्लॅप", "पैसा वसूल", "यादगार पल", "फर्स्ट डे फर्स्ट शो", "कॉर्नर सीट", "सिनेमा घर", "ओपन थिएटर", "बारा ते तीन तीन ते सहा", "गल्ला पेटी", "सिनेमा मसाला मिक्स", "आऊट फोकस", 'थिएटरातील टाळ्या शिट्ट्या', 'यश हेच चलनी नाणे' अशी अनेक पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यांच्या अनघा प्रकाशन ( ठाणे) यांच्या वतीने "टॉकीजची गोष्ट" हे दक्षिण मुंबईतील जुन्या सिंगल स्क्रीन थिएटर्सच्या आठवणी सांगणारे पुस्तक जुन्या आठवणीत नेते. त्यात आता खाणाखुणाही शिल्लक नसलेल्या मॅजेस्टीक, रेक्स, रेडियो अशा चित्रपटगृहांवरही फोकस टाकण्यात आला आहे.

इट्स मज्जा या यू ट्यूब चॅनेलसाठीचा त्यांचा 'ठाकूर विचारणार' हा मुलाखतींचा शो अतिशय लोकप्रिय आहे. अशोक सराफ, रणजीत, बाळ धुरी, विजय पाटकर, सुकन्या कुलकर्णी, अशोक समर्थ, उपेंद्र लिमये, वर्षा उसगांवकर, अश्विनी भावे आदींच्या त्यांच्या मुलाखतींची चित्रपटसृष्टीत बरीच चर्चा होत आहे. २००९ सालापासून ते मुक्त पत्रकार आणि लेखक म्हणून कार्यरत आहेत. जनसामान्य रसिकांना समजतो आणि आवडतो अशाच पारंपरिक मसालेदार मनोरंजक चित्रपटांवर आणि त्या विश्वावर त्यांनी कायमच फोकस ठेवला. आणि त्यातूनच त्यांच्या मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीत सर्व स्तरांवर खूप ओळखी झाल्या. इसाक मुजावर आणि शिरीष कणेकर हे त्यांचे विशेष आवडते लेखक आहेत. शिरीष कणेकर यांच्या नाविन्य प्रकाशन (पुणे) यांनी प्रकाशित केलेल्या "निवडक शिरीष कणेकर" या

ग्रंथातील लेखांची निवड व संपादन दिलीप ठाकूर यांनी केली आहे. विशेष म्हणजे, चित्रपती व्ही. शांताराम फाऊंडेशनच्या 'शतक महोत्सवी मराठी चित्रपट' या शंभर वर्षातील मराठी चित्रपटांची तपशीलवार माहिती दिलेल्या सूचीच्या संपादनाची संधी त्यांना मिळाली. चित्रपटविषयक माहिती आणि अनुभवाचा त्यांना जवळपास सर्वच मराठी तसेच काही हिंदी वृत्तवाहिन्यांवर प्रतिक्रिया देताना, एकाद्या चर्चेत सहभाग घेताना कायमच फायदा होत असल्याचे दिसतेय. TIMES OF INDIA इत्यादी इंग्रजी वृत्तपत्रातही त्यांची चित्रपटसृष्टीतील एकाद्या घटनेवर दशकभरापासून अधिक काळ सातत्याने प्रतिक्रिया येत आहे. त्यांना या वाटचालीत अनेक पुरस्कार प्राप्त होत आहेत. विशेष उल्लेखनीय पुरस्कार म्हणजे अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या वतीने देण्यात आलेला चित्रकर्मी

पुरस्कार, मराठी पत्रकार संघाच्या वतीने जयहिंद पुरस्कार आणि प्रमोद नवलकर स्मृती पुरस्कार, संस्कृती कलादर्पणच्या वतीने उल्लेखनीय पत्रकार पुरस्कार, इंडिवूड मिडिया एक्सलन्स अॅवॉर्ड, शिवसेना गिरगाव शाखा पुरस्कार, 'मी गिरगावकर' दक्षिण मुंबई शिवसेना शाखा पुरस्कार, थर्ड बेल एन्टरटेन्मेन्ट कलातीर्थ पुरस्कार, बालगंधर्व सन्मान चिन्ह (पुणे) इत्यादी अनेक पुरस्कारांचा समावेश होतो. जवळपास रोजच तारीखवार जुन्या काळातील चित्रपटांबाबत सोशल मिडियात पोस्ट करणे यात त्यांनी सातत्य ठेवले आहे. कृष्ण धवल अर्थात ब्लॅक अँड व्हाईट काळातील चित्रपटापासूनच्या फोटो आणि बुकलेटचा त्यांच्याकडे उत्तम संग्रह आहे.

दिलिप ठाकूर यांना शुभेच्छा.
#संजीव_वेलणकर पुणे.        ९४२२३०१७३३
♥



**"मनोगत"**

**"शो हाऊसफुल्ल आहे... "**

मला हाऊसफुल्ल गर्दीतील एक पब्लिक होऊन पिक्चर एन्जॉय करायला आवडते. कारण गिरगावातील खोताची वाडीत लहानाचा मोठा होताना अशाच एकपडदा चित्रपटगृह अर्थात सिंगल स्क्रीन थिएटर्समध्ये हाऊसफुल्ल गर्दीतील एक पब्लिक होऊन पडद्यावरील डायलॉगला मनसोक्त मनमुराद टाळ्या व शिट्ट्या देत मी वाढलो. १९८२

साली मिडियात आलो, चित्रपट समीक्षक व पत्रकार म्हणून चौफेर व खणखणीत वाटचाल सुरू केली. मी मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीत भटकंती, लहान मोठ्या भेटीगाठी व निरीक्षण असे करत करत वाटचाल सुरू ठेवल्याने मला पुस्तकाबाहेरचे आणि गुगलबाहेरचे चित्रपटाचे जग माहीत होतं होत गेले. इतकेच नव्हे तर मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीत मला ओळखणारा खूपच मोठा वर्ग आहे हे विशेष उल्लेखनीय आहे. या प्रवासात चित्रपट विश्लेषक अशी प्रगती केली. या सगळ्यात माझ्यातील चित्रपट रसिक कायम राहीला. जनसामान्य प्रेक्षकांचे मनोरंजन करणारा चित्रपट तोच माझा चित्रपट. अशा सर्वज्ञात चित्रपटावर लिहिणे, बोलणे जास्त आव्हानात्मक असते. कारण संदर्भ, माहिती, तपशील अजिबात चुकुन चालत नाही. अशाच काही सुपर डुपर हिट चित्रपटावरचे माझे ई बुक. आपल्या देशातील चित्रपट संस्कृतीत

रसिकांची आवडनिवड ही अतिशय महत्त्वाची गोष्ट. त्यांच्या संवेदनशीलतेवर मी कायमच विश्वास ठेवला आणि मी त्यांच्यातीलच एक आहे अशी भावना जपली. आजही मल्टीप्लेक्समध्ये चित्रपट एन्जॉय करतांना एखाद्या डायलॉगला मनापासून दाद देतो. आपण चित्रपट समीक्षक आहोत तेव्हा आपण गंभीरच असावे असे मी वागण्या बोलण्यात का आणू? आपण जनसामान्याचे प्रतिनिधी आहोत, त्यातून आलो आहोत हे विसरत नाही. म्हणून त्यांना आपलेसे वाटतील असे माझे विषय असतात.... आणि सुपर डुपर हिट ही खूपच मोठी गोष्ट. त्यामुळे सामाजिक सांस्कृतिक माध्यम आणि आर्थिक वातावरण बदलून जाते. अनेक यशोगाथा जन्माला येतात. गॉसिप, ग्लॅमर, फिल्मी गप्पा, गल्ला पेटी अशी सगळीकडे त्या यशाची चर्चा रंगते. सेलिब्रिटीजचा आत्मविश्वास वाढतो. त्यांच्या कारकिर्दीला गती येते. त्याला इमेज

मिळते. एक सुपर डुपर हिट मंगता है यार असे उगाच म्हटले जात नाही. अशा अनेक गोष्टी यशात असतात. त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न म्हणजेच हे पुस्तक सुपर डुपर हिट....

माझा अनेक वर्षांपासूनचा जिवलग मित्र डॉ. अनंत पावसकर यांनी काही महिन्यांपूर्वी अतिशय प्रेमाने पुढाकार घेऊन माझे "शोले पन्नास वर्षे" हे पहिले "ई बुक" प्रकाशित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली! ई साहित्य प्रतिष्ठानच्या वतीने ते पुस्तक प्रकाशित झाले. भरपूर माहिती व मनोरंजन असलेल्या त्या ई बुकला रसिक वाचकांचा अतिशय उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला, आजही मिळतोय. त्यामुळे अधिक उत्साहाने हे पुस्तक आपल्या समोर आणत आहे. या पुस्तकातील लेख तात्कालिक आहेत. पण चित्रपट सर्वकालीन सुपरहिट आहेत. हे पुस्तक जुन्या काळातील चित्रपट रसिकांना एक उत्तम

फ्लॅशबॅक आहे तर आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल पिढीला हे चित्रपट पहावेसे वाटतील. ई बुक हे जगभरातील वाचकांपर्यंत पोहोचत असते आणि आपले पुस्तक अधिकाधिक वाचकांपर्यंत पोहोचावे ही लेखकाची मनोमन इच्छा असतेच असते. चित्रपट आणि चित्रपटसृष्टी यावर माझी मुद्रित माध्यमापासून माझी आतापर्यंत चव्वेचाळीस (४४) पुस्तके प्रकाशित झाली आहेत. चित्रपटसृष्टीतील मोठ्या सेलिब्रिटींज पासून सेटवरील कामगारांपर्यत आणि चित्रपट वितरकापासून कला दिग्दर्शकापर्यत अशा सर्वच स्तरातून मी सातत्याने काम करताना ही चित्रपटसृष्टी अधिकाधिक प्रमाणात जाणून घ्यायला मी कायमच उत्साह दाखवला. चित्रीकरणासाठीचे स्टुडिओ ते मिनी थिएटर्स असा माझा प्रवास सुरू आहे हे माझ्या अनेक पुस्तकांतून आपणास लक्षात येईलच वा आले असेल. मुद्रित माध्यमे, वृत्त वाहिन्या व डिजिटल युग

**असा माध्यमे स्वीकारत ही वाटचाल सुरू आहे आणि त्याच वाटचालीत हे "सुपर डुपर हिट" हे पुस्तक! आपण याही पुस्तकाचे नक्कीच स्वागत कराल याचा नक्कीच विश्वास आहे. अर्थात, इतकी वर्षे सतत काम करीत असतानाही आजही नवीन गोष्टी शिकण्याची व जाणून घेण्याची माझी इच्छा कायम आहे! मी आजही विद्यार्थी म्हणून वावरतोय....!**

दिलीप ठाकूर
(ज्येष्ठ पत्रकार आणि चित्रपट विश्लेषक)

♥




♥

# अनुक्रमणिका


१. सीता और गीता (१८)

२. काला सोना (३१)

३. जंजीर (४२)

४. दो फूल (५७)

५. यादों की बारात (६९)

६. पिंजरा (८४)

७. मेरे जीवन साथी (११४)

८. आजाद (१३२)

९. अभिमान (१४३)

१०. रजनीगंधा (१५५)

११. मदर इंडिया (१७०)

१२. कहो ना प्यार है (१८९)

१३. सोंगाड्या (२०४)

१४. दाग (२२१)

१५. हाथी मेरे साथी (२३२)

## लेख क्र. १

# सीता और गीताचा डबल धमाका पन्नाशीपार!




आजच्या डिजिटल युगात, व्ही.एफ.एक्स आणि ए.आय. तंत्रज्ञानाच्या युगात रुपेरी पडद्यावर दुहेरी काय नि तिहेरी काय! एकाच कलाकाराच्या अनेक भूमिका आणि त्या देखील विविध वयोगटातील दाखवता येणे काहीसं सोप झाले आहे! (पण तेवढेच ते महागही झाले आहे.) पण ज्या काळात फार तांत्रिक सुविधा उपलब्ध नव्हत्या त्या काळात जेव्हा असे प्रयत्न झाले तेव्हा?

खर तर सिनेमा हमखास सुपर हिट ठरेल याचा कोणताही हुकमी फॉर्म्युला/ रेसिपी/ मेजरमेंट/ टाईम-टेबल/ तराजू/ कॅल्क्युलेटर/ कॅम्प्युटर नाही! ते कोणत्याही काळात नव्हतेच. आज कार्पोरेट युगाला उगाच वाटते, चित्रपटाच्या यशाचा काही फॉर्म्युला आहे. "रियॅलिटी शो" असा आहे की, पब्लिकला जो पिक्चर भारी आवडतो तोच आणि तोच पिक्चर हाऊसफुल्ल गर्दीत चालतो. मग तो "दशावतार" असू शकतो अथवा 'कांतारा' ही असू शकतो! भले पिक्चर हिट झाल्यावर उलटसुलट प्रतिक्रिया उमटू देत. काहीही फरक पडत नाही. "पब्लिक है वो सब जानती है! "

पब्लिकच्या हाती अनेक गोष्टी असतात. एकाद्या हुकमी फॉर्म्युल्यावरील पिक्चरची रिमेक

जोपर्यंत रंगतेय तोपर्यंत त्याच्या अनेक एडिशन त्याना आवडतात. पण आता अमूकतमूक मसाला कालबाह्य होत चाललाय असे फिल्मवाल्याना समजणेही भाग असते. तात्पर्य, काही काही रिमेक या त्या त्या काळातील हुकमी फंडा असतो! त्या काळातील प्रेक्षकांच्या आवडीनिवडीशी ते सुसंगत असते.

जुळे भाऊ आणि त्यांच्या अनेक प्रकारच्या गोष्टी (पिक्चरच्या पहिल्याच रिळात लहानपणीच हरवणे आणि पिक्चरच्या शेवटी सोळाव्या अथवा अठराव्या रिळात त्यांनी एकमेकांना ओळखणे!) हे रुपेरी पडद्यावरील एक हुकमी कथा सूत्र आहे! एकसारखे दिसणारे हे दोन नायक! एक धीट तर दुसरा भित्रा! योगायोगाने अथवा फिल्मी स्टाईलने त्यांची अदलाबदल होते. कहानी मे ट्विस्ट! त्यातूनच

अनेक प्रकारची धमाल गडबड गोंधळ होतो. भित्र्या नायकाचा छळ करणाऱ्या खलनायकाला आता धीट नायक तडी देतो, त्याचाच चाबूक त्याच्यावरच चालवतो तेव्हा व्हीलन अचंबित होतो. पब्लिक टाळ्या शिट्यानी पिक्चर एन्जॉय करतोय. आजच्या डिजिटल युगात, ओटीटी प्लॅटफॉर्म काळात जगभरातील अनेक भाषेतील चित्रपट पाहत असलेल्या युवा पिढीला हा 'इधर का भाई उधर, उधर का भाई इधर' हा फंडा अतिशयोक्तीपूर्ण वाटेल. पण साठ/सत्तर/ऐंशीच्या दशकातील पब्लिकला यात भारी मसालेदार मनोरंजक वाटे! आज त्यांनी वयाची पन्नाशी, साठी, सत्तरी ओलांडलेही आहेत, त्यांना स्वप्नरंजनात रमण्याची ही गोष्ट!!

अशा गोष्टीचा पाया रचला दिलीपकुमारची दुहेरी भूमिका असलेल्या तापी चाणक्य दिग्दर्शित 'राम और श्याम'ने (१९६७). दिलीपकुमारच्या अष्टपैलू अभिनयाने नटलेला दे धमाल पिक्चर! मुंबईत अप्सरा थिएटरमध्ये ज्युबिली हिट! आता याच 'स्टोरीवर किती पिक्चर आले आणि पब्लिकने एन्जॉय केले' ते बघा! चांगल्या गुणांचे प्रगती पुस्तक आहे! पिक्चर सुपर हिट तर सबकुछ हिट! काहीत नायक तर काहीत नायिका डबल रोलमध्ये आहेत! बाकीच्या मसालेदार गोष्टी जवळपास सारख्याच! थोडे मीठ कमी जास्त इतकेच अथवा जास्त शिजवलेला, रंगवलेला मसाला म्हणा ना!

रमेश सिप्पी दिग्दर्शित 'सीता और गीता' (हेमा मालिनी - १९७२), मुरुगन कुमारन दिग्दर्शित 'जैसे को तैसा' ( जितेंद्र १९७३), शरद पिळगावकर

निर्मित व मुरलीधर कापडी दिग्दर्शित 'चोरावर मोर' (उषा चव्हाण-१९८०), पंकज पराशर दिग्दर्शित 'चालबाज' (श्रीदेवी-१९८९), राकेश रोशन दिग्दर्शित 'किशन कन्हय्या' (अनिल कपूर. १९९०), डेव्हिड धवन दिग्दर्शित 'जुडवा' (गोविंदा-१९९७) 'राम और श्याम' मधील रंजकता 'जुडवा'त डेव्हिड धवन स्टाईल अतिरंजितपणे आली! काळ बदलत बदलत राहिला! फॉर्म्युला रंगत रंगत आला! मीठ मसाला तिखट मिरची वाढवत वाढवत आला! मात्र लोकांनी एन्जॉय केले. (लिंक्स पहा!)

यातील जी. पी. सिप्पी निर्मित 'सीता और गीता' (मुंबईत प्रदर्शन ३ नोव्हेंबर १९७२) च्या डबल धमाका प्रदर्शनाची त्रेपन्न वर्षे कधी बरे झाली हे समजलेच नाही! (त्याकाळात टप्प्याटप्प्याने चित्रपट प्रदर्शित होत! त्यामुळेच हा चित्रपट देशात

विविध ठिकाणी १० नोव्हेंबर, मग १७ नोव्हेंबर आणि त्यानंतर असा प्रदर्शित होत राहिला! तसे रिलीज हा देखील सही फंडा.)

या चित्रपटाची पटकथा सलिम जावेद यांची. एकाद्या जुन्या चित्रपटावर रंगरंगोटी करुन त्याची रिमेक फ्रेश क्रीम ठरेल अशी मांडणी बांधणी करण्यात ही जोडी बाकबगार होती! हे सांगायलाच हवं! हिट चित्रपटाचे पुढील पिढीतही आकर्षण असते, म्हणूनच त्याची रिमेक अगदीच 'कॉपी टू कॉपी' ठरु नये हेच तर आवश्यक असते! फिल्म दीवाने आवडते चित्रपट डोक्यात फिट्ट ठेवून असतो, त्याला रिमेक कितपत रंगलीय अथवा फसलीय हे पटकन लक्षात येते. (प्रेक्षकांना कधीच गृहीत धरु नये हे वेगळे सांगायलाच नको!) म्हणून नवीन मसाला वापरावा! चव नवीन लागते!

मसालेदार मनोरंजक चित्रपटाला हा अलिखित नियम लागू आहे!

'सीता आणि गीता' या जुळ्या बहिणी. दुर्दैवाने त्या जन्मतःच वेगळ्या होतात. एक शहरात तर एक ग्रामीण भागात लहानाची मोठी होते. गीता एक धाडसी, धांदरट तर दुसरी सीता सोबर, भित्री. गीता आता शहरातून डोंबारी खेळत गुजराण करतेय. तिला 'राका' (धर्मेंद्र) हा साथीदार भेटतो! त्यांच्यात प्रेमाचे धागे गुंफले जातात. सीताला रवि (संजीवकुमार) हा प्रियकर मिळतो! पण तिची काकी कौशल्या (मनोरमा) ही मात्र फारच जाच होत असतो. आईवडीलांच्या निधनानंतर सीताला तिच्या काका (सत्येन कप्पू) आणि काकीने सांभाळलय! वाढवलयं! एकदा योगायोगाने सीताच्या जागी गीता आणि गीताच्या जागी सीता

अशी अदलाबदल झाली आणि मनोरंजनाचे अधिकाधिक फटाके फुटतात. अगदी त्यांचे चुकीने लग्न लावण्यापर्यंत गोंधळ निर्माण होतो!

फर्स्ट-शोपासूनच पब्लिकने पिक्चर एन्जॉय केला आणि रौप्यमहोत्सवी यशाचा जणू सिग्नल मिळाला. मुंबईत या पिक्चरचे मेन थिएटर मिनर्व्हा होते. के. वैकुंठ यांचे कुशल छायाचित्रण व एम. एस. शिंदे यांचे कसबी संकलन यांचा खास उल्लेख हवाच! त्या काळात फार तांत्रिक सुविधा नव्हत्याच आणि डबल रोलवरचे कॅमेरा व संकलनाचे काम सोपे नव्हतेच. आनंद बक्षी यांच्या गीतांना राहुल देव बर्मनचे संगीत यांनीही या मनोरंजनात मस्त भर टाकली! 'अरे जिंदगी है खेल..' (पार्श्वगायक आशा भोसले व मन्ना डे), 'अभी तो हाथ मे जाम है..' (मन्ना डे), 'कोई लडकी..' (किशोरकुमार व लता

मंगेशकर), 'ओ साथी चल..' (किशोरकुमार व आशा भोसले) ही गाणी चित्रपट रंगवण्यात भर घालतात आणि आजही ही गाणी लोकप्रिय आहेत! विशेष म्हणजे, धर्मेंद्रला मन्ना डेचा आवाज फिट बसलाय. हेही सांगायलाच हवं!

हेमा मालिनीने भारीच धमाल भूमिका रंगवलीय. मिळालेल्या फुल्ल स्कोपचा तिने भन्नाट वापर केलाय. धर्मेंद्र व संजीवकुमारनेही रंग भरलाय.

आता थोडेसे गॉसिपिंग! तेही हवेच! या चित्रपटाबद्दलही अनेक कथा दंतकथा, गोष्टी चर्चेत आहेत! सिनेमाचे जग म्हटल्यावर त्या असायलाच हव्यात! या चित्रपटासाठी दिग्दर्शक रमेश सिप्पी यांनी अगोदर मुमताजला विचारले होते. पण

निर्माते जी. पी. सिप्पी यांनी म्हणे भप्पी सोनी दिग्दर्शित 'ब्रह्मचारी' (१९६८) च्या वेळेस ठरलेले मानधन न दिल्याने यावेळी तिने जरा अधिकची मागणी केली. एव्हाना ती स्टार होती! तिची अधिक मानधनाची  मागणी जी. पी. सिप्पीना मान्य नव्हती. सिप्पी पिता पुत्रानी आपल्या 'अंदाज' मधील हेमा मालिनीची निवड केली. राजेश खन्नाने एक नायक साकारावा असे जी. पी. सिप्पीना मनोमन वाटत होते. त्यांच्याच भास्कर दवे दिग्दर्शित 'राज' (१९६७) पासून राजेश खन्नाची करियर सुरु झाली. पण त्यांच्याच 'अंदाज' (१९७१) मध्ये भूमिका साकारत असतानाच त्याला म्हणे रमेश सिप्पीची कामाची पद्धत आवडली नाही म्हणून त्याने दिग्दर्शकच बदलायची मागणी केली. (असं म्हणतात!) ती मंजूर कशी होईल?

एका दृश्यात पंख्यावर चढून दृश्य देण्यापूर्वी रमेश सिप्पीने तसे करुन दाखवले म्हणून हेमा मालिनी त्या दृश्यासाठी तयार झाली! डोंबारीच्या खेळातील अनेक साहसी दृश्ये शशिकला पवार यांनी हेमा मालिनीची डमी म्हणून साकारली. पडद्यावर मात्र हेमा मालिनी भाव खाऊन गेली! याच चित्रपटाच्या शूटिंगच्या काळात संजीवकुमार हेमा मालिनीकडे आकृष्ट झाला! एकतर्फी प्रेम होते ते! जावेद अख्तर आणि हनी इराणी यांचेही याच चित्रपटाच्या काळात सूत जुळले! एक चित्रपट घडत असतानाच अशा अनेक छोट्या मोठ्या गोष्टी घडत असतात! 'सीता और गीता'च्या ज्युबिली हिटनंतर निर्माते जी. पी. सिप्पी आणि दिग्दर्शक रमेश सिप्पी यांनी 'शोले'च्या निर्मितीत पाऊल टाकले आणि ३ ऑक्टोबर १९७३ रोजी

**बंगलोरजवळ उभारलेल्या रामगढ गावाच्या सेटवर 'शोले'चा मुहूर्त केला..! सीता और गीता चित्रपटातील धर्मेंद्र, हेमा मालिनी आणि संजीवकुमार यांना आपल्या नवीन चित्रपटात पुन्हा घ्यायचेच हे रमेश सिप्पींनी ठरवले होतेच आणि तसेच झाले..!**

**© दिलीप ठाकूर**
**(महाराष्ट्र दिनमान - शनिवार लेख एन्टरटेन्मेंट)**

♥




♥

## लेख क्र. २

## 'काला सोना' @५० वर्षे
## 'ताक धिन नाचे नशे मे धूम....'




सत्तरच्या दशकातील पारंपरिक लोकप्रिय मसालेदार मनोरंजक चित्रपटात काही हुकमी गोष्टी पाह्यला मिळत! स्टॉल, अप्पर स्टॉल व बाल्कनी अशा सर्वांनाच ते मनोरंजक चित्रपट आवडत! पैसा वसूल झाला पाहिजे इतकीच अपेक्षा! जो टाईमपास करे तो लोकप्रिय होई!

कधी अशा मनोरंजक चित्रपटात सगळ्याच

गोष्टी एकाच पिक्चरमध्ये भरलेल्या, जोडलेल्या! एकाच तिकीटावर त्या पाह्यला मिळतात याचं केवढे कौतुक!

अचानक वादळ निर्माण झाल्याने लहानपणी जत्रेत हरवलेले दोन वा तीन भाऊ! बरं ते हरवणे खलनायकाच्या कृष्णकृत्याने घडले बिघडले असेल, आणि त्यात त्या खलनायकाने या दोन वा तीन भावाच्या माता पित्याचा खून केला असेल तर हेच भाऊ मोठेपणी एकत्र आल्यावर आपल्या मा बाप के खून का बदला घेतात. एकाच्या हातावर जन्म खूण! अथवा लहानपणी एकत्र गायलेले गाणे! मोठेपणी हे सगळं उपय पडतं. हा खलनायक काळाबाजार करणारा; कधी लंपट तर कधी किमती हिरे अथवा एखाद्या जुन्या काळातील मूर्ती चोरी करू पाहणाऱा असेल वा चरस गांजा

यांच्या गैरव्यवहारात अडकलेला असतो! एकात एक गुंतलेला मसाला म्हणजे मसालेदार मनोरंजन चित्रपट! अधेमधे विविध प्रकारची किमान सात गाणी! पब्लिकला हे भारीच आवडायचे! पैसा वसूल मनोरंजन म्हणत! यातच पाश्चात्य देशातील चित्रपटांवर बेतलेला मसाला हिंदी चित्रपटात पेरला जाई. शम्मी कपूरने "ईरमाला डूस" या चित्रपटावर "मनोरंजन" (१९७४) बनवला! त्याचे हिंदीकरण इंग्रजी वळणाचे असल्याचे चित्रपट रसिकांना आवडले नाही! संजीवकुमारचा "हवालदार" मजेशीर होता! झीनत अमान एकदम मोकळी वावरली! तीच तिची खासियत होती! सगळाच प्रकार बेधडक! खरं तर मूळ विदेशी चित्रपटातील थीम तेवढी घेऊन त्यावर हिंदीचा मसाला लावावा. सलिम जावेद जोडीने तेच केले

"मजबूर" (१९७४) लिहिला. दिग्दर्शक रवि टंडन यांनी तो पडद्यावर खुलवला. पिक्चर सुपर हिट!!

असाच एक मसालेदार चित्रपट, हरीश शहा व विनोद शहा निर्मित व रविकांत नागाईच दिग्दर्शित "काला सोना" (मुंबई प्रदर्शित-१९, सप्टेंबर १९७५. पन्नास वर्षे पूर्ण!). यातला नायक पाश्चात्य रंगढगाचा आणि चित्रपटांत मसाला हिंदी चित्रपटाच्या पब्लिकला आवडणारा! भन्नाट मिलावट! पहाडी भागातील पॉपी सिंग (प्रेम चोप्रा) याचे असलेले अफू, चरस, गांजा याचे अड्डे हिकमती डॅशिग नायक (फिरोज खान) आपल्या साथीदारांसह उध्वस्त करतो हे या चित्रपटाचे मध्यवर्ती कथासूत्र! पटकथा रमेश पंत यांची! ही गोष्ट घडताना प्रेम प्रकरण, पाठलाग, मारधाड वगैरे वगैरे आहेच! पॉपी सिंगचा प्रेम चोप्राचा एकूण

लूक एकदम कडक नि प्रभावी! प्रेम चोप्राची खलनायक म्हणून कारकीर्द मोठी व वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यात हा लूक बहुचर्चित! प्रेम चोप्राची आवाजाची वा बोलण्याची शैली नेहमीच वैशिष्ट्यपूर्ण! त्याचा स्वतःचा चाहतावर्ग निर्माण झाला हे उल्लेखनीय!

दिग्दर्शक रविकांत नागाईच हे विदेशी चित्रपट 'जेम्स बाँड'चा मसाला हिंदी चित्रपटात पेरणी करावी यासाठी ओळखले जाणारे! कॉपी करावी तर अशी भारी असं त्यांना वाटलं असावं. आणि त्यात ते अनेकदा यशस्वी झाले हे महत्त्वाचे.

सत्तरच्या दशकातील 'फर्ज', 'हिम्मत', 'द ट्रेन', 'सुरक्षा', 'वारदात', 'मेरे जीवन साथी' वगैरे चित्रपट त्यांचेच. जितेंद्रला त्यांनी फिट्ट पॅन्टमध्ये त्यांनीच नाचवलं आणि मिथुन चक्रवर्तीला त्यांनीच

स्टार केलं. तो गरीब निर्मात्यांचा अमिताभ बच्चन म्हणून ओळखला जावू लागला.एक दिग्दर्शक काय काय घडवतो!

"शोले" च्या यशाच्या वादळात "काला सोना" पडद्यावर आला. शोले आजही सुपर हिट आहे. त्याची चर्चा आजही होतेय. अर्थात तगडी स्पर्धा होती. तरी काही जमेच्या बाजू आहेत! दिग्दर्शक रविकांत नागाईच हा मूळचा यशस्वी छायाचित्रणकार अर्थात कॅमेरामन. त्यामुळे आपण आपल्या चित्रपटाचा मसाला पडद्यावर कसा खुलवणार व रंगवणार आहोत हे स्पष्ट होते. आणि तेच पडदाभर खुलल़े. विशेषतः पहाडी भागातील एक वेगळेच सौंदर्य, उत्तर भारतातील हे चित्रीकरण! आणि इनडोअर चित्रीकरण मुंबईतील स्टुडिओत चित्रपटात  गाणी आणि मारधाड हे

दोन्ही आऊट-डोअर्स लोकेशन या चित्रपटाचे आकर्षण आहे. आणि गीत, संगीत आणि नृत्य एकदम धमाकेदार. 'सुन सुन कसम से..' (आशा भोसले व डॅनी डेन्झोपा) पडद्यावर हे गाणं डॅनी व फरिदा जलाल यांच्यावर आहे. (डॅनी गायचाही), 'ताक धिन नाचो नशे मे..' (आशा भोसले व किशोरकुमार! पडद्यावर हे गाणं फिरोज खान व परवीन बाबी यांच्यावर आहे.), 'कोई आया आने भी दे..' (आशा भोसले.पडद्यावर हे गाणं हेलनने साकारलेय)

हा चित्रपट राजेश खन्नाला घेऊन निर्माण करण्याची निर्मात्यांची योजना होती. त्यांच्याच 'मेरे जीवन साथी' मध्ये तोच होता. राजेश खन्ना विलक्षण लोकप्रिय व बिझी असल्याचे ते दिवस. म्हणूनच त्याने आपला मित्र दिग्दर्शक नरेंद्र बेदी

यांचा 'खोटे सिक्के' (१९७४) नाकारला. त्यातही फिरोज खान आला. गंमत म्हणजे, फिरोज खानला आपल्या 'धर्मात्मा' (१९७५) या चित्रपटासाठीही राजेश खन्नाच हवा होता. राजेश खन्नाचा नकार फिरोज खानला फारच फळला. चित्रपटाच्या जगात असं होतंच असते. फिरोज खान हिंदी चित्रपटसृष्टीतील 'क्लिंट ईस्टवूड' म्हणून ओळखला जावू लागला. क्लिंट ईस्टवूड हा हॉलीवूड स्टार. फिरोज खानचं सिक्स पॅक व्यक्तीमत्व, सेक्सी लूक, उत्तम ड्रेस सेन्स, अंगात वजनदार जॅकेट, फिट्ट जिन्स, डोक्यावर आकर्षक हॅट अर्थात टोपी. सगळंच भारी! फिरोज खान 'स्टायलिश अभिनेता'. आशा पारेखनी आपला आवडता स्टायलिश अभिनेता म्हणून एका मुलाखतीत फिरोज खानचं नाव घेतलं. ही गोष्ट

छोटी वाटते पण महत्वाची. एक आघाडीची अभिनेत्री छान कौतुक करतेय आणखी काय हवं? 'काला सोना'च्या आउट डोअर्स लोकेशनवर फिरोज खान व डॅनी डेन्झोप्पा शिकारीला जात. त्यातूनच त्याना एनर्जी मिळाली असेल. तसे आवश्यक असते. हे दोघेही वेगळीच लाईफस्टाईल असणारं. अस्सल मर्द म्हणून ओळखले जाणारे!

'काला सोना'ची नायिका म्हणून सायरा बानू पहिली पसंती! एक आकर्षक सौंदर्यासाठी ओळखली जाणारी अभिनेत्री. काही कारणास्तव तिची निवड झाली नाही आणि परवीन बाबी आली. याच चित्रपटाच्या निर्मितीच्या काळात डॅनी डेन्झोप्पा व परवीन बाबी यांच्यात गुटर गुटूर सुरु होते. त्या काळात ते लिव्ह-इन रिलेशनशिप राहत होते. पन्नास वर्षांपूर्वी ही कल्पनाच प्रचंड धाडसी

होती. कुचाळक्या करणारी मासिके या गोष्टीला भरपूर कव्हरेज देत होती. काला सोना चित्रपटांत फिरोज खान, परवीन बाबी, डॅनी डेन्झोप्पा, फरिदा जलाल, हेलन, प्रेम चोप्रा, नरेंद्रनाथ, बिपीन गुप्ता, दुर्गा खोटे, केश्तो मुखर्जी, मा. भगवान, सीमा कपूर, आगा, राजू श्रेष्ठ, के. एन. सिंग, जयराज, इम्तियाज वगैरेंच्या भूमिका आहेत. चित्रपटाची पोस्टर्स पाहिल्यानंतर या चित्रपटात सर्व प्रकारचा मसाला एन्जॉय करायला मिळणार याची खात्री पटे. "काला सोना" व फिरोज खानचा भाऊ संजय खान निर्मित, दिग्दर्शित व अभिनित "चांदी सोना" (१९७७) असे चित्रपटाच्या नावात साम्य हा एक योगायोग! दोन्हीत परवीन बाबी, डॅनी डेन्झोपा आणि रणजित हेदेखील एक विशेष! या चित्रपटात समुद्रात तळाशी असलेल्या सोना

चांदीच्या खजिन्याचा शोध! तोही हिंदी चित्रपटाच्या मसालेदार मनोरंजन शैलीत! संजय खान कसदार दिग्दर्शक म्हणून ओळखला जात नव्हता. मात्र सातत्याने चित्रपट निर्मिती व दिग्दर्शन करे. आजच्या ओटीटीच्या काळात काला सोना काय आणि चांदी सोना काय अशा मसालेदार मनोरंजन चित्रपटाचे आकर्षण ते काय? यापेक्षा भारी आणि धाडसी कन्टेन्ट ओटीटीवर पाह्यला मिळतोय. आजच्या काळात देश विदेशातील मनोरंजन अशी वाटणी राहिलेली नाही. पण तरीही एका चित्रपटाला अर्थात काला सोना चित्रपटांला पन्नास वर्षे पूर्ण झाली यानिमित्ताने फोकस हवाच!

© दिलीप ठाकूर
(राम प्रहर - झूम प्रहर)

♥

## लेख क्र. ३

# सूडनायक पन्नास वर्षांचा झाला...!
# रोल-रोल पे लिखा होता है करनेवाले का नाम..!




'जंजीर'चा इन्स्पेक्टर विजय खन्ना देव आनंदच्या नशीबात नव्हता ते बरेच झाले. तुम्हा आम्हा पब्लिकचे नशीब दांडगे होते म्हणायचं! देवसाहेब स्वतःच्या प्रतिमेच्या, रुपाच्या, लोकप्रियतेच्या प्रेमात! त्याला रुपेरी पडद्यावर गाणं गायची हौस मौज! पण विजय संपूर्ण पिक्चरभर हसत नाही. कायम अंतर्मुख आहे! मनात माँ बाप के खून का बदला घेण्याची तीव्र धुसफूस आहे! तो

गाईल कसा? देव आनंदला ही भूमिका जमली असती की नाही माहीत नाही. शोभली अथवा पाहवली नक्कीच नसती!

राजकुमारला रोल आवडला! पण दिग्दर्शक प्रकाश मेहराच्या केसाला लावलेल्या तेलाचा वास आवडला नाही म्हणून नाही म्हटलं अशी एक दंतकथा प्रसिद्ध आहे! (गंमत म्हणजे, कालांतराने याच प्रकाश मेहरा यांच्या 'इन्सानियत के दुश्मन' आणि 'मुकद्दर का फैसला' मध्ये जानी राजकुमारने भूमिका साकारली तेव्हा बहुतेक मेहराने तेलाचा ब्रॅण्ड बदलला असावा अथवा राजकुमारच्या नाकाला आता काही प्रॉब्लेम नसावा.) राजकुमार त्या दिवसांत चेन्नईत (तेव्हाचे मद्रास) शूटिंग करत असल्याने त्याने मेहरांना सुचवले तिकडे शूटिंग करुयात. पण ही गोष्ट

मुंबईत घडते, मग काय करणार?

धर्मेंद्र एकाच वेळेस अनेक चित्रपटात बिझी होता म्हणून त्याला 'जंजीर' कडे दुर्लक्ष करावे लागले. 'जंजीर' चे पटकथेचे हक्क त्याच्याकडेच होते. तोच या चित्रपटाची निर्मिती करणार होता! मेहरांच्या 'समाधी'त भूमिका साकारत असतानाच धर्मेंद्रने मेहरांना 'जंजीर' चे हक्क दिले आणि मेहरांनी कामाला सुरुवात केली! सलिम जावेद यांची बंदिस्त पटकथा व धारदार संवाद मेहरांच्या हाती येताच या जोडीने मेहरांना अट घातली. पिक्चरच्या पोस्टर, होर्डिंग्ज, बुकलेटस यात आपल्याला क्रेडिट हवं. 'हाथी मेरे साथी', 'अधिकार', 'अंदाज', 'सीता और गीता' या सुपर हिट चित्रपटांच्या पटकथेने त्यांच्या नावाला वलय आणि वजन यायला हवे होते. पण त्यांचे नाव

पडद्यावरच राहिले. पब्लिसिटीत सुद्धा नव्हते! पिक्चरवाल्यांचे जग फोकसमध्ये चमकत असलेल्याकडे जास्त पाहते. तो फंडा महत्वाचा! तात्पर्य, सलिम-जावेदचा नावाचा आग्रह (की हट्ट) अगदी सही होता!

आता मेहराना 'परफेक्ट हीरो' हवा होता! जावेद अख्तरने दिलीपकुमारलाही ही स्क्रिप्ट ऐकवली आणि त्याने आपल्या स्वभावानुसार 'तारीफ पे तारीफ' केली पण होकार दिला नाही! (दिलीपकुमारलाही 'जंजीर' साठी विचारले हे जावेद अख्तर आपल्या मुलाखतीत सांगतात तेव्हा समजते. अन्यथा इतकी वर्षे हा संदर्भ/संबंध माहित नव्हता.) अशातच एकदा सलिम खानने एस. रामनाथन दिग्दर्शित 'बॉम्बे टू गोवा' (१९७२) पाहिला आणि त्यातील अमिताभची ढिश्यूम

ढिश्यूम मारधाड पाहताना त्यांना वाटले, हाच हीरो 'जंजीर' ला परफेक्ट आहे. त्यांनी व प्राणनेही ते मेहरांना सांगताच तेही 'बॉम्बे टू गोवा' पाह्यला थिएटरात गेले आणि त्यांच्यातील दिग्दर्शकाला 'इन्स्पेक्टर विजय खन्ना' सापडला. साठ हजार रुपयांत अमिताभला साईन केले!

या घडामोडी होत असतानाच मुमताजने 'आपण लवकरच लग्न करतोय' असे म्हणत 'जंजीर' सोडला. मेहरांनी 'समाधी'तील दोन नायिकांपैकी जया भादुरीला 'चक्कू छुरिया तेज चलाओ..' साठी निवडले. तोपर्यंत 'एक नजर', 'बन्सी बिरजू'त एकत्र काम करताना ती व अमिताभ मनाने खूप जवळ आले होते. 'जंजीर'साठी अमिताभचा विचार करावा असे जयानेही मेहराना सुचवल्याचा किस्सा प्रसिद्ध आहे. पिक्चर हिट असले की त्याच्या अनेक

छोट्या छोट्या गोष्टीही चर्चेच्या ठरतात त्या या अशा!

....'जंजीर' (रिलीज ११ मे १९७३) पडद्यावर येईपर्यंत एक नवीन वादळ (चक्रीवादळच) जन्माला येतेय असा फिल्म इंडस्ट्रीतील ट्रेण्ड पंडितानाही अंदाज नव्हता आणि त्यातच खरी गंमत असते! 'फर्स्ट डे फर्स्ट शो'चा पब्लिक रिपोर्ट म्हणजे पिक्चरची कुंडली स्पष्ट! 'जंजीर' रिलीज होईपर्यंत अमिताभच्या खात्यात बरेच फ्लॉप आणि 'आनंद'मधील अभिनयाचे कौतुक (अर्थात राजेश खन्नाचे जास्त होत होते) व 'बॉम्बे टू गोवा'चे यश (त्यातही मेहमूद जास्त भाव खाऊन गेला). एवढ्याश्या भांडवलावर 'जंजीर' फार फार तर चार आठवडे चालायला हवा होता. पण आज पन्नास वर्षे होऊनही चालतोच आहे! एकदा का

पब्लिकने ठरवले अमूक पिक्चर डोक्यात फिट्ट करायचा आणि डोक्यावर घ्यायचा की तो निर्णय अंतिम. 'जंजीर' सुपर हिट ठरल्यावर अनेक स्टोरीज बाहेर आल्या!

पोस्टरवर आपलं नाव नसल्याचे पाहून सलिम जावेदने एका रंगारीला पैसे देऊन ऑपेरा हाऊस ते जुहू परिसरातील 'जंजीर'च्या पोस्टरवर आपलं नाव रंगवंले ते कुठे? हे सांगितले नसल्याने अमिताभच्या हातावर तर कुठे प्राणच्या चेहऱ्यावर, कुठे अजितच्या पिस्तूलवर ते रंगवले गेले. असं नाव रंगवून नाव होत असते तर हा उद्योग अनेकांनी केला असता.

सेठ धरम दयाल तेजा साकारताना आपण अगदी थंड डोक्याने आणि एकाच पट्टीत बोलतोय असं दाखवूया हे अजितने सुचवलेले मेहरांनी

मानले आणि ते पब्लिकला आवडले. सलिम खानने अजितला इंदौरला नेऊन एका डॉनची भेट घडवून दिली. स्वत: सलिम इंदौरचाच होता!

प्राणने 'यारी है इमान मेरा..' हे गाणेच साकारायला नकार दिला होता. मेहरांनी त्याची समजूत घातली आणि हेच गाणे लोकप्रिय ठरले. गुलशन बावरा यांच्या गीतांना कल्याणजी आनंदजीचे संगीत! 'दीवाने है दीवाने को..' गाणे पडद्यावर गुलशन बावरानेच संजना (रेहाना खान) सोबत साकारलयं!



पिक्चरचे मध्यवर्ती कथासूत्र फार ग्रेट वगैरे नाही! त्या काळात ते भारी होते आणि लहान मोठ्या व्यक्तिरेखांचा परफॉर्म, प्रभावी पटकथा, टाळीबाज डायलॉग आणि 'यारी है इमान मेरा यार मेरी जिंदगी..' या कव्वालीची लोकप्रियता यावर पिक्चर भारी ठरलं!

हे ठरवून होत नसते! असं केले तर तसे होईल, असं दाखवलं तर ते हिट होईल अशी सुपर हिट पिक्चरची हुकमी रेसिपी नसतेच. ते घडत जाते आणि पब्लिकला पचलं तर मग अशा पिक्चरला कोणीच थांबवू शकत नाही.

लहानपणी आपल्या आई पित्याची निर्घृण हत्या करणाऱ्या तेजाचा मोठेपणी पोलीस इन्स्पेक्टर विजय हा शोध घेतो याभोवती अनेक लहान मोठ्या व्यक्तिरेखांसह पिक्चर रंगतो!

अर्थात, मध्यवर्ती थीमशी त्या भूमिका जोडल्या गेल्या असल्याने आपण गुंतत जातो. माला (जया भादुरी), शेरखान (प्राण), डिसिल्वा (ओम प्रकाश), मोना (बिंदू), गंगू (केश्तो मुखर्जी) वगैरे वगैरे!! डायलॉगने हमखास टाळ्या शिट्ट्या वसूल केल्या.

'जब तक बैठने को ना कहा जाए शराफत से खडे रहो, यह पुलीस स्टेशन है तुम्हारे बाप का घर नही!..' या संवादाने अमिताभला नवीन ओळख मिळाली. त्याच्या रुपेरी जोशला छप्पर फाड रिस्पॉन्स मिळाला!

'आज के बाद अपने आदमीयोंसे कह दो की हमेशा तुम्हारे नजदीक रहे... क्यों कि तुम्हारी नजदीक की नजर कमजोर है...!! '

'आज जिंदगी मे पहेली बार शेरखान की शेर से टक्कर हुई..! '

मला आठवतय, माझ्या शालेय वयात राजेश खन्नाची जबरदस्त क्रेझ असतानाच्या दिवसांतच 'जंजीर' आला (नेमकं सांगायचं तर 'दाग' २७ एप्रिलला रिलीज झाल्यावर दोनच आठवड्यांनी 'जंजीर' आला). पण त्याने इतिहास घडवला! हिंदी चित्रपटसृष्टीला तडफदार 'ॲन्ग्री यंग मॅन' अर्थात तडाखेबंद 'सूडनायक' दिला. 'यश हेच चलनी नाणे' या फिल्मी नियमानुसार अमिताभ बच्चन नावाचे पर्व सुरु झाले ते कायमचेच! पब्लिक, मिडिया आणि फिल्म इंडस्ट्रीत अचानक अमिताभ महत्वाचा ठरला. तोपर्यंत संथ वेगाने निर्मितीवस्थेत असलेल्या 'बेनाम'च्या शूटिंगला दिग्दर्शक नरेंद्र बेदीने वेग दिला.

जंजीर मॅटीनी शो, रिपिट रनला रिलीज होत होता आणि नव्वदच्या दशकात एके दिवशी बातमी

आली, चित्रपट वितरक गुलशन रॉय यांनी 'जंजीर' चे हक्क घेतले असून त्याच्यावर आधुनिक तांत्रिक सोपस्कार करुन तो सिनेमास्कोप करण्यात आला आहे! माहिमच्या बादलमध्ये ही तांत्रिक करामत पाह्यला गेल्यावर निराश झालो! मूळ चित्रपट खालून वरुन कापला असल्याने त्याचा प्रभाव बोथट झाला होता. चित्रपट आणि अमिताभची उंची यात मावणारी शोभणारी नव्हतीच. मूळ पस्तीस एम एमचा 'जंजीर' पाहणे हाच यावरचा उपाय होता. अशा सर्वकालीन चित्रपटाची रिमेक स्वाभाविक गोष्ट. तेलगू व तमिळ भाषेत १९७४ साली तर १९८० साली मल्याळम भाषेत रिमेक झाली. हिंदीत (२०१३) रिमेक बनताना वाद झाला! सलिम जावेद याविरुद्ध कोर्टात गेले. आता प्रकाश मेहरा हयात नसल्याने मुलाने ही केस लढवली!

अखेर कोर्टाबाहेर 'मांडवली' होत सलिम जावेदना दोन कोटी मानधन मिळाले. मूळ चित्रपटासाठी त्यांना पंचावन्न हजार रुपये मानधन मिळाले होते. पन्नास वर्षांपूर्वी या पंचावन्न हजाराची 'किंमत' किती असेल? 'जंजीर'च्या वेळचा प्रेक्षक, तेव्हाचं जगणं, तेव्हाचा चित्रपट, तेव्हाचे सामाजिक सांस्कृतिक वातावरण आणि आता रिमेकच्या वेळची स्थिती यात फरक होता ही मूलभूत गोष्ट का लक्षात येत नाही.

'जंजीर'च्या यशावर फोकस टाकताना मला वाटतं, ओ. पी. रल्हन दिग्दर्शित 'फूल और पत्थर' (१९६५) पासूनच निधड्या वृत्तीचा हीरो पब्लिकला आवडायला लागला होता. (सोबर धर्मेंद्र आता 'ही-मॅन' ठरत होता.) 'मेरे हमदम मेरे दोस्त', 'फर्ज', 'द ट्रेन', 'यकीन', 'आमने सामने' अशी पब्लिकला

ॲक्शन हळूहळू आवडत होती! पण ॲक्शन हीरोला एस्टॅब्लिश होण्यासाठी 'जंजीर'चा योग आला. आतापर्यंत हिंदी चित्रपटातील फायटिंग एक तर क्लायमॅक्सला असायची आणि तीही लुटूपुटूची अथवा दारासिंग, रंधवा यांच्या स्टंटपटात असे. त्याला प्रतिष्ठा नसे. ते अंतर 'जंजीर' ने कमी केले. फायटिंगलाही ॲक्टींग लागते यावर शिक्कामोर्तब झाले. सगळेच चित्रपट येतात व जातात (काही आवडले जातात तर बरेचसे नावडते. त्याचे सर्व हक्क प्रेक्षकांच्या स्वाधीन ).

सत्तरच्या दशकाच्या मध्यास महागाई, टंचाई, बेरोजगारी, साठेबाजी, रेशनवर रॉकेल साठी रांग, रेशनवरील गोडे तेल गायब, डालडा गायब! याने समाज त्रस्त झाला होता! युवकांच्या मनात असंतोष खदखदत होता आणि या

सगळ्याला रुपेरी पडद्यावरील अमिताभ जणू वाट मोकळी करुन देत होता.

'जंजीर'ने त्याची सुरुवात केली. त्या प्रवासाला पन्नास वर्षे झाली कधी हे समजलेच नाही. सर्व काही कालपरवा घडलं असेच वाटतेय!

© दिलीप ठाकूर
(राम प्रहर - झूम प्रहर)

♥



♥

## लेख क्र. ४

## "मुथ्थूकोडी कव्वाडीहडा..."
## "दो फूल" @ पन्नास वर्षे !



बरोबर पन्नास वर्षांपूर्वीची गोष्ट..! रेडिओ सिलोनवरील 'बिनाका गीतमाला'मध्ये एका नवीन धमाकेदार गाण्याची एन्ट्री झाल्याचे निवेदक अमिन सयानी यांनी आपल्या स्टाईलमध्ये म्हटलं, 'बहनो और भाईओ... आज बिनाका गीतमाला मे एक नया गाना सामिल हो रहा है....! मजरुह सुल्तानपुरीने इस गीत को लिखा है और राहुल देव

बर्मन का संगीत है... और सबसे अलग बात यह है की आशा भोसले के साथ मेहमूद ने इस गीत को गाया है.. आप गाना सुनिये...!

'मुथ्थूकोडी कवाडीहडा
मुथ्थूकोडी कवाडीहडा
ओ... ओ... मैने प्यार मे जो ना करना था,
वो भी मुझे करना पडा..!'

गाण्याचा मुखडा, अंतरा, एकूणच गाण्याची रचना, त्याचं व्यक्तिमत्व परंपरावाल्यांना न आवडणारी, मस्तकात जाणारी अशीच (पन्नास वर्षांपूर्वी असे गाणे म्हणजे कल्चरल शॉकच! मोठाच सांस्कृतिक धक्का..! हे काय गाणे आहे? असे सहज कोणीही म्हणत असे). कोणी आर. डी. बर्मनच्या नावाने गळे काढले (हे संगीतच नव्हे, हे गाणेच नव्हे असे मुद्रित माध्यमातून वाचकांच्या

पत्रातून खरमरीतपणे लिहिले.) याउलट मेहमूदचे असं काही 'वेगळ्या वळणा'चे गाणे असू शकते हे राजा नवाथे दिग्दर्शित 'गुमनाम' (१९६६) मधील 'हम काले है तो क्या हूवा..' या गाण्याच्या लोकप्रियतेमुळे ("इंग्लिश" पण ऐका!) अनेकांना 'ऐकवत' होते. आर. डी. बर्मन धसमुसळेपणा करणारा संगीतकार असे 'मत'वालेही मुथ्थूकोडी मुखड्याने अचंबित झाले नाहीत!

एव्हाना मार्केटमध्ये 'दो फूल' च्या तबकडीची विक्री वाढली, विविध भारतीवर या गाण्याची फर्माईश वाढली! झुमरीतल्लयापासून हे गाणे ऐकवा अशी पत्रे वाढली! लाऊडस्पीकरवर हे गाणे हमखास वाजू लागले, इराणी हॉटेलमधील ज्युकबॉक्समध्ये चार आण्याचे नाणे टाकून हे गाणे वारंवार ऐकले जाऊ लागले....! अशी लोकप्रियता

वाढत असतानाच मुंबईत ६ एप्रिल १९७३ रोजी 'दो फूल' रिलीज झाला तो सिल्व्हर ज्युबिली हिट होण्यासाठीच! (गुगलवरची २१ मार्च तारीख




दिल्लीतील रिलीजची. त्या काळात टप्प्याटप्प्याने पिक्चर रिलीज होत.) मुंबईत मेन थिएटर "रॉक्सित" अगदीत फर्स्ट शोपासूनच पब्लिक गीत संगीत व नृत्याने खुललेला हा "कॉमेडी सिनेमा" आवडला गेला आणि त्यात महत्वाचे फॅक्टर होते, मेहमूदचा डबल रोल आणि आर. डी. बर्मनचे संगीत! आर. डी. असे काही 'हटके' प्रयोग करुन

एक प्रकारची चित्रपट संगीतात क्रांतीच करत होता. देव आनंद अभिनित, निर्मित व दिग्दर्शित 'हरे राम हरे कृष्णा' ( १९७२) मधील 'दम मारो दम मिट जाऐ गम..' हा त्यातला जणू सज्जड पुरावा! मग शम्मी कपूर दिग्दर्शित 'मनोरंजन' (१९७४) मध्ये आर. डी.ने 'गोयांके चुनांचे..' असे वेगळे बोल असलेले आनंद बक्षीचे गाणे दिलेच!

आज पन्नास वर्षानंतरही बालाजी कलामंदिर निर्मित 'दो फूल' ची आणि मुथ्थूकोडी गाण्याची क्रेझ कायम आहे. 'Anubhavi Raja Anubhavi' या तेलगू चित्रपटाची रिमेक असल्याने 'दो फूल' मध्ये साऊथ इंडियन व्यक्तिरेखा मणी (मेहमूद) आली. दिग्दर्शक एस. रामनाथन हा कन्नड, तमिळ व हिंदी चित्रपटांचा दिग्दर्शक. 'बॉम्बे टू गोवा' (१९७२) नंतर मेहमूदला घेऊन त्याने 'दो फूल' (१९७३) आणि

'सबसे बडा रुपय्या' (१९७६) हे चित्रपट दिग्दर्शित केले. पण हे पिक्चर मेहमूदचे म्हणून ओळखले जातात हे पुन्हा वेगळे सांगायलाच नको! मेहमूद एव्हाना फक्त हिरोच्या जोडीला "कॉमेडियन" राहिला नव्हता. (उदाहरणार्थ 'हमराही', 'घर बसाके देखो', 'प्यार किये जा', 'हमजोली', 'पडोसन' , 'जवाब' वगैरे). तर 'मस्तान', 'मै सुंदर हू', 'लाखों मे एक', 'साधू और शैतान', 'अलबेला' (मेहमूदचाही 'अलबेला' होता!. भगवानदादांच्या 'अलबेला' शी नाम साम्य इतकच), गरम मसाला, जोहर मेहमूद इन गोवा अशा पिक्चर्सनी हीरो झाला होता. (तर दिग्दर्शक एस. रामनाथन यांच्या प्रगती पुस्तकात अमिताभ बच्चनची तिहेरी भूमिका असलेला 'महान' हा चित्रपटही आहे!)

'दो फूल' मध्ये मुंबईत राहणाऱ्या पवित्र

कुमार राय अर्थात पुट्टन (मेहमूद) आणि चरित्र कुमार राय (विनोद मेहरा) या दोन उपद्व्यापी भावांचे चाळे सुरु असतानाच एकदा पुट्टनवर एका खुनाचा आळ येतो आणि तो खून आपण नव्हे तर आपल्यासारख्याच दिसणाऱ्या मणीने केला असून तो कोचिनला आहे असे पुट्टन पोलिसांना सांगतो. मणी तिकडे आपली पत्नी रुक्मिणी (रमा प्रभा) हिच्याशी कधी प्रेम तर कधी भांडण अशा संसारात रमलेला असतो. काही समज, गैरसमज, योगायोग यातून काही गंमती जमती घडतात आणि रंगत येते. पुट्टन आणि शैला (अरुणा इराणी) व चुट्टन आणि पूनम (अंजना मुमताज) यांच्या प्रेम-गोष्टी आहेतच. या चित्रपटात अशोककुमार, जीवन, मुकरी, सुंदर, ललिता पवार, मुमताज अली, चंद्रशेखर, लक्ष्मी छाया यांच्याही छोट्या मोठ्या

भूमिका आहेत. सत्तरच्या दशकातील मसाला मिक्स मनोरंजक पिक्चरमध्ये अशी अनेक कॅरॅक्टर हमखास असत! पिक्चरमध्ये सुरुवातीला असलेले दोन प्रेमी युगलांवरचे 'म...म... माफ करो... ज.. ज... ज.. जाने दो..' (आशा भोसले, किशोरकुमार, उषा मंगेशकर व मेहमूद) हेही गाणे हिट ठरले!

'दो फूल' आणि मुथ्थूकोडी कवाडीहडा या एकाच सुपर हिटच्या दोन बाजू ठरल्या त्या कायमच्याच!

आता हिट पिक्चरची रिमेक करावीशी वाटली नाही तर फिल्मी आश्चर्यच. रिमेक सोपी की अवघड? ती कशी करावी? काळानुसार त्यात काही बदल करावेत का अशी प्रश्न मंजुषा रिमेक पिक्चर पाहिल्यावर पडते.

निर्माता व दिग्दर्शक बिपीन वर्तीने 'चंगू मंगू' (१९८८) अशी रिमेक करताना डिट्टो केली! मूळ चित्रपटातील मेहमूदची भूमिका अशोक सराफला तर विनोद मेहराची लक्ष्मीकांत बेर्डेला देताना बहुतेक साऊथ इंडियन रुपडं अशोक सराफला शोभेल असा विचार केला असावा. याची नायिका अरुणा इराणी. शहरी नायिका निवेदिता जोशी आणि किशोरी शहाणेने साकारलीय. पिक्चरला साधारण यश मिळाले. मूळ 'दो फूल' एव्हाना मॅटीनी शो, मग व्हिडिओ कॅसेट असा पुढील पिढीत जात होताच. जमेची बाजू एकच, अशोक सराफ व लक्ष्मीकांत बेर्डेची एव्हाना जमलेली जोडी याही पिक्चरमध्ये पंचेस खुलवत जमली.

कालांतराने मूळ पिक्चरपेक्षाही रिमेक जबरा हिट ठरली. 'दो फूल 'च्या कॉन्सेप्टवर अनिझ

बज्मीने पहलाज निहलानी निर्मित व डेव्हिड धवन दिग्दर्शित लिहिलेला 'ऑखे' (१९९३) असा काही सुपर हिट पिक्चर ठरला की अनेक वर्षे तो आपले हिंदी चित्रपटसृष्टीतील सर्वकालीन टॉप-टेन पिक्चरमधलं आपले स्थान टिकवून होता! (कालांतराने सुपर-हिट चित्रपट पाचशे वगैरे कोटी अगदीच पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे सहज कमवू लागताच 'ऑखे' बाद झाला!) गंमत म्हणजे, मूळ चित्रपटातील मेहमूदचा डबल रोल या पिक्चरमध्ये गोविंदाने केला. शहरी बून्नू आणि ग्रामीण गौरीशंकर. यातील बून्नूचा भाऊ मुन्नू चंकी पांडेने साकारला. गौरीशंकरची पत्नी चंद्रमुखी शिल्पा शिरोडकरने रंगवली. या जोडीचे "अंगना मे बाबा.." हे गाणे पिक्चरायझेशनवरुन श्लील की अश्लील यावरुन वाद निर्माण झाला तरी गाणे

हिट! रितू व रागेश्वरी या दोन मॉडर्न नायिका! अतिशयोक्तीपूर्ण मनोरंजनासाठी सदाशिव अमरापूरकर, शक्ती कपूर व कादर खान होतेच! डेव्हिड धवनचा आपला एक ऑडियन्स होता. ('दो फूल' च्या नेमके हे उलट!)

"यू ट्यूब"वर "मुथ्थूकोडी कव्वाडी हडा.." गाण्यातील मेहमूद व रमा प्रभाचे भन्नाट लटके झटके पाहून 'दो फूल' ची पन्नाशी एन्जॉय करुयात! सध्याच्या गोंधळलेल्या वातावरणात असा पिक्चर हवाच. असे पिक्चर डोक्याला कसलाही शॉट देत नाहीत तर मग आणखीन काय हवे?

बम्बईया भाषेत बोले तो, 'दो फूल' एकट्या मेहमूदने खाऊन टाकला. कधी तो मस्त बॅटींग करतो तर कधी तो रन काढून दुसऱ्या मेहमूदला स्ट्राईक देतोय. दोन्ही बाजूने मेहमूद तर मग

एन्जॉयमेंटसाठी मंगता है क्या?

'दो फूल' च्या सुपर हिटनंतर मेहमूदने अभिनय व दिग्दर्शित केला 'कुंवारा बाप' (१९७४). त्यात एका डोळ्यात हंसू तर दुसऱ्यात आंसू. तोही पिक्चर मुंबईत रॉक्सी थिएटरमध्येच ज्युबिली हिट झाला! त्याची नुकतीच पन्नाशी झाली!

© दिलीप ठाकूर
(शिवनेर विशेषांक)
♥




♥

## लेख क्र. ५

## 'यादों की बारात' @५०
## स्टोरीपासून पोस्टरपर्यंत सगळेच हिट!




'शाकाल जब बाझी खेलता है, तो जितने पत्ते उसके हाथ मे होते है उतने ही उसके आस्तीन मे....!'

'जब दिल बहुत कुछ कहने को चाहे और जुबान साथ ना दे...तो ये मोहब्बत की पहली सीढी होती है...!'

'पिलाना फर्ज था तो कुछ भी पिला दिया होता...
शराब कम थी तो पानी मिला दिया होता....!'
'मै अपने 'प्लॅन' को खुद बनाता हू...!'

'जो अपनी जान पर खेलते है...वो अपनी मंझिल खुद ढूंढते है..! '

प्रत्येक डायलॉगवर थिएटरमध्ये पब्लिकच्या टाळ्या शिट्ट्या...!!!!!

जगभरात कुठेही ठरवून सुपर हिट पिक्चर काढू शकले असते तर 'जगभरातील चित्रपटाचा इतिहास, भूगोल, अर्थकारण, अंकगणित' असं सगळेच बदलले असते! पण एकाद्या सुपर-डुपर हिट पिक्चरमध्ये योगायोगानेच 'सगळेच गुण' जुळलेले दिसतात याचा अर्थ ते 'पिक्चर ' काही सॉलीड वगैरे असते नाही. वा चाकोरीबाह्य् थीमवरचे असते असेही नाही! तरी पब्लिकने पिक्चर डोक्यावर नि डोक्यात घेतलेले असते!

'यादों की बारात' हा एक असाच मसालेदार मनोरंजक हिट चित्रपट! २ नोव्हेंबर १९७३ ला पडद्यावर आला तोच 'फर्स्ट शो'पासूनच सुपर हिट!

पन्नास वर्षे पूर्ण होऊनही तो पुनःपुन्हा एन्जॉय करताना छान टाईमपास होतोच.

बरं पिक्चरची स्टोरी काय? तर लहानपणी तीन भाऊ आपल्या आईवडीलांसोबत एका भावाच्या वाढदिवसानिमित्त केक कापून 'यादों की बारात निकली है आज दिल के व्दारे..' हे गाणे गात असतानाच खलनायक शाकाल (अजित) आपल्याविरुध्द पोलिसात साक्ष दिलेल्याचा खातमा करण्यासाठी येतो! तो या माता पित्याचा खून करतो. दोन लहान मुल पळतात. त्यातला धावती एक मालगाडी पकडतो. त्यातला एक मागे राहतो. तिसरा धाकटा भाऊ घरातील नोकराणीसोबत असतो! तीन भाऊ तीन ठिकाणी लहानाचे मोठे बनतात. शंकर (धर्मेंद्र) 'चोर नायक' बनतो. रतन (तारीक) एका मोठ्या हॉटेलमध्ये

वादक गायक बनतो! धाकटा भाऊ विजय (विजय अरोरा) त्याच हायफाय हॉटेलमध्ये नोकरीला लागतो. त्याची आणि सुनीताची प्रेमकथा सुरु होते. शंकर विरुध्द शाकाल असा सामना सुरु होतो. अधेमधे गीत संगीत व नृत्य येत राहते. ते लोकप्रिय असल्यानेच ते आपण एन्जॉयही करतो. आणि क्लायमॅक्सला रतन नेहमीप्रमाणेच आज आपण लहानपणीचे गाणे गावूया ते ऐकून आपले भाऊ सापडतील अशी आशा ठेवतो! ती आशा खरीच ठरते. संपूर्ण पिक्चरभर एकमेकांना पाहत असलेले हे तिघे आपण लहानपणीच हरवलेले भाऊ आहेत हे आता ओळखतात! शंकर शाकालचा खातमा करतो आणि पिक्चर द एन्ड!

लहानपणीच जत्रेत अथवा वादळात वा भूकंपात तीन भाऊ आपल्या मातापित्यांसह

हरवतात. पाचजण पाच ठिकाणी असतात आणि अठराव्या रिळात एकमेकांना सापडतात! पिक्चरचा शेवट गोड होतो हे मुख्य प्रवाहात सर्वप्रथम सुपर हिट ठरले ते बी.आर. चोप्रा निर्मित व यश चोप्रा दिग्दर्शित बी. आर. फिल्मच्या 'वक्त' (१९६५) पिक्चरच्या वेळेस. चित्रपट माध्यमातील पकड घेणारी पटकथा व प्रभावी संकलन याचे उत्तम उदाहरण म्हणजे 'वक्त' पिक्चर. एकाच वेळेस अनेक व्यक्तीरेखांना गुंफणे आणि भिन्न मूडसच्या कलाकारांना घेऊन पिक्चर पडद्यावर आणणे हे सोपे नाही. यशजींचा हा फिल्म मेकिंगमधला एक 'लॉस्ट ॲण्ड फाऊंड' मसाल्याचा चित्रपट! त्यावरुनच सलिम जावेद यांनी 'यादों की बारात'ची मांडणी, बांधणी केली हे अधूनमधून दिसत राहते! खरं तर दिग्दर्शक

मनमोहन देसाई यांनी 'हरवले गवसले' यात जणू पीएच डी. केली, की काय? कधी दोन भाऊ ('भाई हो तो ऐसा', 'रामपूर का लक्ष्मण'), कधी तीन भाऊ (अमर अकबर ॲन्थनी) असेच लहानपणीच हरवून पिक्चरच्या शेवटच्या रिळात सापडतात. अधेमधे काही योगायोगाच्या तर काही अतर्क्य गोष्टी..ते काही असले तरी पब्लिकची भारी पसंती!

निर्माता व दिग्दर्शक नासिर हुसेन यांनी 'यादों की बारात' मध्ये असं वेगळे काहीही मांडलं नाही. या फॉर्मुल्यात वेगळे असे करणार काय? तरीही 'यादों की बारात' भारी मनोरंजन ठरला तो सलिम जावेदची 'टर्न आणि ट्विस्ट' असलेली जबरदस्त पटकथा! काही चमकदार संवाद! धर्मेंद्रची डॅशिंग भूमिका! (याच पिक्चरने त्याला 'ही-मॅन' इमेज दिली. त्याने सोबर.. ही कात

टाकली ती कायमची! गंमत म्हणजे, 'वक्त'मधील राजकुमारने साकारलेली भूमिका 'मोठ्या भावाची भूमिका नको, तशाच भूमिका ऑफर होतील म्हणून धर्मेंद्रने नाकारली आणि यावेळेस आपली करियर बरीच पुढे गेली आहे या जाणिवेने स्वीकारली!), झीनत अमानचा मधाळपणा (सेक्स अपील), तारीकचा म्युझिकल परफॉर्मन्स! मजरुह सुल्तानपुरी यांची गीते! राहुल देव बर्मनचे तरुण संगीत आणि चक्क या सगळ्याची भट्टी जमून आली आणि पिक्चर सुपर हिट! विजय अरोराची भूमिकेसाठी नासिर हुसेन यांनी अमिताभ बच्चनच्या नावाचा विचार केला होता. तेव्हा नेमका त्याचा पडता काळ सुरु होता म्हणून वितरक नको म्हणाले. आणि नेमका 'जंजीर' १९७३ च्याच मे महिन्यात पडद्यावर येताच सुपर हिट ठरला! आणि

आता पाच महिने होताहेत तोच 'यादों की बारात' आला. काही म्हणा, अमिताभ यात सूट झाला नसता, हे मात्र नक्की! झीनत अमानने पारंपरिक वस्त्रात असावे ही नासिर हुसेनची इच्छा तिने नाकारुन, पाश्चात्य लूकच्या वस्त्रांना पसंदी देताना डिसेण्डपणा जपला! ग्रेसफुल ठरली! नीतू सिंग 'लेकर हम दीवाना दिल..' गाण्यात व काही दृश्यात होती इतकेच! पिक्चर हिट झाल्याने तीही प्रकाशली!

सलिम जावेदची बंदिस्त पटकथा व संवाद असलेला प्रकाश मेहरा दिग्दर्शित 'जंजीर' तुफान सुपर हिट ठरल्याने माहौल बदलला होता! आता 'यादों की बारात' रिलीज होताना पोस्टरभर तीन हुकमी गोष्टी! एका बाजूला चाकूधारी शंकर (अर्थात धर्मेंद्र), मध्यभागी 'चुरा लिया तुमने जो दिल

को..' या सर्वकालीन लोकप्रिय गाण्यातील गिटारसह झीनत अमान व विजय अरोरा! शेजारीच झगमग लायटींगच्या स्टेजवरील इलेक्ट्रॉनिक गिटारसह तारीक! एका कोपऱ्यात काळा गॉगल घातलेला आणि हॅण्डक्लोजने सिगारेट ओढणारा अजित आणि या सगळ्या क्षेत्ररक्षणातून अगदीच कोपऱ्यात इम्तियाज! एकाच पोस्टरभर बरंच काही हे त्या काळातील वैशिष्ट्य! बरं, शाकालचा एक बूट आठ नंबरचा तर दुसरा नऊ नंबरचा! असं का? याला उत्तर नाही! तशी हिंदी पिक्चर्समधील अनेक गोष्टींना उत्तरच नसतात. अगदी लहानपणीच गायलेले गाणे सही सही मोठेपणी कसे गाता येईल हे विचारायचे नाही! त्या काळात लहानपणीची अनेक गाणी मोठेपणी क्लायमॅक्सला मोठाच स्कोर करणारी

ठरत. खुद्द नासिर हुसेन दिग्दर्शित 'प्यार का मौसम' मधील (१९६९) 'तुम बिन जाऊ कहा..' असेच तीनदा आहे आणि क्लायमॅक्सला ते कानावर पडताच नायकाला (शशी कपूर) त्याची आई (निरुपा रॉय) ओळखते! या चित्रपटात 'यादों की बारात निकली है..' हे हरवलेले भाऊ सापडावेत याचसाठी असते! पण ते अधेमधे येते तेव्हाच हरवलेले भाऊ सापडले असते तर पिक्चर पुढे कसा गेला असता? त्या काळातील चित्रपट रसिकांना हा सगळाच फॉर्म्युला भारी आवडे! कालांतराने समजले बालपणीचा तारीक लहानपणी आमिर खानने साकारलाय. तेव्हा तो आठ वर्षांचा होता. त्याला आपले काका नासिर हुसेन यांच्याबद्दल विशेष आस्था! थोडा मोठा झाल्यावर तो नासिर हुसेन यांच्याकडे 'मंझिल

मंझिल' व 'जबरदस्त'च्या वेळेस चौथ्या क्रमांकाचा सहाय्यक दिग्दर्शक होता!

आर. डी. बर्मनने 'यादों की बारात' मध्ये संगीताची भरपूर लयलूट केली. नासिर हुसेन हे आपला पहिला चित्रपट 'तुमसा नहीं देखा' ( १९५७) पासूनच गीत संगीत व नृत्याला भरपूर स्कोप देणारे. त्यांचा 'कांरवा' (१९७१) तर त्यांच्या कारकिर्दीतील हायपॉईंट. प्रेक्षकही जाणून असत नासिर हुसेन यांचा पिक्चर म्हणजे म्युझिक भारी असणार. 'आपके कमरे मे कोई रहता है..' (आशा भोसले, किशोरकुमार व राहुल देव बर्मन), 'यादों की बारात निकली है आज दिल के व्दारे..' (लहानपणी लता मंगेशकर, सुषमा श्रेष्ठ व पद्मिनी कोल्हापूरे. मोठेपणी मोहम्मद रफी आणि किशोरकुमार), 'लेकर हम दीवाना दिल..' (आशा

भोसले व किशोरकुमार), 'ओ मेरी सोनी मेरी तमन्ना..' (आशा भोसले व किशोरकुमार) आणि या सगळ्यावर भारी असलेले 'चुरा लिया है तुमने जो दिल को..' (आशा भोसले व मोहम्मद रफी). अशी सगळीच गाणी हिट म्हटल्यावर हीच गाणी पुन्हा पाह्यची तर पिक्चरचं तिकीट काढायला हवे! चुरा लिया आजही तारुण्यात आहे तर मग आणखीन काय हवे? (सगळ्या लिंक्स नक्की पहा)

मुंबईत या चित्रपटाचे मेन थिएटर नाझमध्ये हा चित्रपट तब्बल पन्नास आठवडे मुक्कामाला होता. पिक्चरची जबरदस्त क्रेझ होती हे आठवतयं.

'यादों की बारात' पुन्हा पुन्हा एन्जॉय केलेल्यांच्या डोळ्यासमोर एव्हाना अख्खं "पिक्चर" आले असेलच! आणि आता "यू ट्यूब"वर पाहणारे 'या पिक्चरमध्ये काय बरे पाह्यला

मिळणार आहे?'..आहे यानुसार पाहतील! तीन भाऊ लहानपणी हरवतात काय आणि लहानपणीच्या गाण्याने आता भेटतात काय, त्यातला शंकर गुन्हेगारीकडे वळतो आणि आपल्या आईपित्याच्या खूनाचा बदला काय घेतो यात काही थ्रील अथवा रोमांचकता वाटणार नाही. कारण आज डिजिटल युगात जगभरातील अनेक प्रकारचे चित्रपट पाहता येताहेत. पन्नास वर्षांपूर्वी हिंदीत मसालेदार मनोरंजक चित्रपट हाच मुख्य प्रवाहात जोरात होता. त्यात मांडणीला महत्व होते. थिएटरमध्ये काळोख झाल्यावर पडद्यावरच्या विश्वात मन हरवून जाणारे मनोरंजन हवे असे. त्यात ज्या दिग्दर्शकाला यश प्राप्त होई, त्याचा चित्रपट पंचवीस अथवा पन्नास आठवडे कधी पूर्ण करे हे समजायचेही नाही. 'सामर्थ्य आहे मांडणीत'

असं म्हणतात ते उगीच नाही. बरं त्यात टकलू शेट्टी या चित्रपटात डोक्यावर केस असलेला असा! 'वक्त' मधील मदन पुरीची आठवण येईल असा गेटअप! 'वक्त' मध्ये मदन पुरी राजकुमारवर चाकू उगारतो तेव्हा तो आपल्या विशिष्ट स्टाईलमध्ये बोलतो, 'यह बच्चो के खेलने की चीज नही....!' 'यादों की बारात' मध्ये शेट्टीही असेच करतो तेव्हा धर्मेंद्र म्हणतो, सुबह जब तुम्हारा बॉस ब्रेक फास्ट के लिए टेबल पर बैठेगा तब ब्रेड को बटर लगाने काम आयेगा...!

कदाचित आश्चर्य वाटेल, साठच्या दशकात धर्मेंद्र सोबर व्यक्तीरेखा साकारत असतानाच (देवर, अनपढ इत्यादी चित्रपट!) ओ. पी. रल्हनने 'फूल और पत्थर' (१९६६) मध्ये निधड्या उघड्या छातीने धर्मेंद्र पोस्टरभर आला आणि त्याची इमेज

बदलू लागली, त्यात 'यादों की बारात' फारच मोठा सपोर्ट सिस्टीम ठरला. त्याची ही-मॅन इमेज झाली आणि त्याचे डायलॉग धारधार होत गेला, आवाजही वाढत गेला! 'यादों की बारात निकली है आज दिल के व्दारे....' हरवले (म्हणून) गवसले या फॉर्मुल्यावरचे पिक्चर्स केवढे तरी त्यात हा एकदम कडक नि सरस! (सगळ्या लिंक्स नक्की पहा!)

© दिलीप ठाकूर
(राम प्रहर-झूम प्रहर)

♥




♥

# <u>लेख क्र. ६</u>

## आवडता चित्रपट!!!
## "पिंजरा".. मराठी चित्रपटातील एक माईलस्टोन!




माझा तरी सर्वाधिक आवडता चित्रपट एकच एक असा नाही! पण माझा अतिशय आवडता चित्रपट म्हणून जगभरातील एखाद्या दूरवरच्या देशातील चित्रपटाचे नाव घेऊन आपण आणि आपली आवडत्या चित्रपटाची आवड निवड "जगावेगळी" आहे असेही मी अतिशय उत्साहाने सांगणार नाही! मला ज्या भाषेतील चित्रपट

समजतात त्या भाषेतील चित्रपट आवडतात असे अगदी सोप्पे समीकरण आहे! मला मराठी व हिंदी चित्रपट समजतात म्हणूनच आवडतात. दक्षिणे कडील कन्नड तमिळ तेलुगू मल्याळम अशा प्रादेशिक भाषेतील चित्रपट हिंदीत डब करून आल्यावर  समजू लागले. मी देखील ऐंशीच्या दशकापासून अनेकदा भारताच्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात देश विदेशातील समजणारे आणि न समजणारेही चित्रपट पाहिले. त्यातील अनेक चित्रपट मी पडद्यावरच ठेवून बाहेर पडलोय. चित्रपट एक तर डोक्यावर घ्यायचा असतो वा डोक्यात ठेवायचा असतो. चित्रपट पाहताना मी कायमच  "एक सर्वसामान्य चित्रपट रसिक" अशीच भावना व भूमिका ठेवली आहे! सिंगल-स्क्रीन थिएटर्स अर्थात एकपडदा

चित्रपटगृह ते आज प्रसार माध्यमातील चित्रपट विश्लेषक अशा दीर्घकालीन प्रवासात सामान्य प्रेक्षक ही वृत्ती व दृष्टीकोन कायम ठेवलाय.आणि हे बरोबरच आहे!

माझ्या आवडत्या चित्रपटात विजय आनंद दिग्दर्शित "जॉनी मेरा नाम" (१९७०) आहे तसाच दादा कोंडके दिग्दर्शित "पांडू हवालदार" (१९७५) देखील आहे! रमेश सिप्पी दिग्दर्शित "शोले" (१९७५ ) आहे तसाच डॉ. जब्बार पटेल दिग्दर्शित "सिंहासन" (१९८०) देखील आहे! मला विविध प्रकारचे चित्रपट विविध कारणांमुळे आवडतात....

असाच एक माझा अतिशय आवडता चित्रपट, चित्रपती व्ही. शांताराम निर्मित व दिग्दर्शित "पिंजरा"!

माझ्या आवडत्या चित्रपटाचे नाव ऐकून

दचकलात का? पण माझी आवडनिवड माझी आहे!

"पिंजरा' आठवला तरी वैशिष्ट्यपूर्ण श्रेयनामावली, त्याचा आशय, त्यातील कसदार अभिनय, त्यातील गीत संगीत आणि नृत्य, त्याचे बोलके पोस्टर आणि चित्रपटाचा रंग असे सगळेच डोळ्यासमोर येते तर मग.. आणखीन काय हवे? एकाच्या चित्रपटाचे यश असेदेखील असू शकते.

वर्षे कशी सिनेमाच्या रिळापेक्षाही अधिकच वेगाने मागे सरकत असतात बघा. व्ही. शांताराम निर्मित व दिग्दर्शित "पिंजरा" च्या प्रदर्शनास चक्क इतका त्रेपन्न वर्षाचा कालावधी व्हावा? मी अगदी तेरा वर्षांचा होतों! त्या वयात, तेव्हाच्या सामाजिक, सांस्कृतिक वातावरणात "पिजरा" आवडला, आमच्या गिरगावातील सेन्ट्रल चित्रपटगृहात अप्पर

स्टॉल दोन रुपये वीस पैसे अशा तिकीट दरात कुटुंबासह पाहिला होता! त्यानंतर वयाच्या वाढत्या टप्प्यांवरही "पिंजरा" सतत एक आवडता चित्रपट राहिला. टाळ्या शिट्यानी पिक्चर एन्जॉय करणारी हाऊसफुल्ल गर्दीतील एक पब्लिक ते प्रसार माध्यमातील चित्रपट विश्लेषक अशा चढत्या भाजणीत "पिंजरा" कायमच माझ्या आवडत्या चित्रपटातील एक चित्रपट आहे!

सिंगल स्क्रीन थिएटर्स अर्थात एकपडदा चित्रपटगृह ते मल्टीप्लेक्स, ओटीटी असा या काळात पब्लिकपर्यंत पिक्चर पोहचण्याच्या पध्दतीने बदलता प्रवास करताना रसिकांच्या पिढ्या बदलल्या तरी "पिंजरा" ची हवा कायम! आणि तेच तर महत्वाचे असते! हे देखील त्या चित्रपटाचे यश!

'पिंजरा'ची एकूणच यशाची 'स्टोरी' वेगळीच! मराठी चित्रपटाच्या खणखणीत इतिहासातील सर्वोत्तम दहा यशस्वी चित्रपटात 'पिंजरा'चा उल्लेख होतोच ही तर केवढी मिळकत! या चित्रपटाच्या निर्मितीमागची गोष्ट विलक्षण रंजक. प्रत्येक पिक्चरच्या जन्माच्या कळा वेगळ्याच असतात!

चित्रपती व्ही. शांताराम हे मूकपटाच्या काळापासून या माध्यम व व्यवसायात कार्यरत! माझ्या आवडत्या दिग्दर्शकातील एक! अतिशय आदर बाळगावा असे व्यक्तिमत्व! त्यांच्याच 'राजकमल कला मंदिर'च्या युवा विभागाच्या वतीने' निर्माण करण्यात आलेल्या 'किरण शांताराम निर्मित व सचिन पिळगावकर दिग्दर्शित "अशी ही बनवाबनवी" (१९८८) या सुपरहिट

यशाच्या सेलिब्रेशन पार्टीत.. आदरणीय "सन्मा. किरण शांतारामजी" यांच्या भेटीचा सुखद योग आला होता! (योगायोगाने त्याच दरम्यान.. माझे "टॉकिजची गोष्ट" हे पुस्तक नुकतेच प्रकाशित झाले होते! हे पुस्तक खुप गाजलं, हं सुदैव!)




व्ही. शांताराम म्हणताच झनक झनक पायल बाजे, दो आँखें बारह हाथ, नवरंग, पिंजरा हे चित्रपट पटकन डोळ्यासमोर यायलाच हवेत आणि ते अगदी स्वाभाविकच आहे!

'पिंजरा' (पुणे शहरात रिलीज ३१ मार्च,

१९७२) अनेक संदर्भात  सतत चर्चेत असतोच, त्याची गाणी 'यू ट्यूब'च्या काळातही लोकप्रिय आहेत! हे यश प्रामुख्याने चित्रपती व्ही. शांताराम यांचे! चित्रपटाची संस्था, चित्रपट माध्यम व व्यवसायाचे विद्यापीठ असे आपण त्यांच्याबद्दल अतिशय आदर आणि कौतुकाने म्हणू शकतो!

सामाजिक आशयाची थीम, त्यावरची पटकथा आणि संकलन, दर्जेदार अभिनय, उत्तम गीत संगीत नृत्य यांची केमिस्ट्री, प्रतिकात्मक दृश्य (शांताराम टच असे आवर्जून म्हटले जाई!), एक वेगळा रंग (अगदी आपल्या ब्लॅक ॲण्ड व्हाईट अर्थात कृष्ण धवल चित्रपटालाही त्यांचा एक वेगळा रंग असे), चित्रपटाच्या नावानुसार श्रेयनामावली ( येथे दिग्दर्शक दिसतो असे आपण म्हणू शकतो. त्यांच्या चित्रपटाची श्रेयनामावली

अभ्यासावी अशीच!), बोलके पोस्टर!, फोकस्ड पूर्वप्रसिध्दी! आणि नियोजनबध्द प्रदर्शन अर्थात रिलीज. हे एकूणच इतकं आणि असं असे की एकीकडे त्यांच्या चित्रपटाच्या नावातच त्या चित्रपटाचे व्यक्तीमत्व असते/ दिसते!

त्यांच्या चित्रपटांची ही नावेच बघा.. 'दो आंखे बारह हाथ', 'झनक झनक पायल बाजे', 'नवरंग', 'सेहरा', 'गीत गाया पत्थरोने' वगैरे वगैरे! चित्रपटांच्या परंपरेतीलच "पिंजरा" (मुंबईत प्लाझा, सेन्ट्रल आणि भारतमाता चित्रपटगृहात १४ एप्रिल १९७२!). त्या काळात काही अंतराने मराठी, हिंदी चित्रपट प्रदर्शित होत! ('लिंक्स' पहा)

"पिंजरा"ने मुंबई, पुणे, सांगली, सातारा, कोल्हापूर, नाशिक, नागपूर अशा एकूण नऊ शहरात ज्युबिली हिट यश प्राप्त केले यात आश्चर्य

नाही. पिक्चरच तसा दमदार/कसदार/मनोरंजक होता. हे होतानाच सामाजिक, सांस्कृतिक आणि माध्यम क्षेत्रात जबरा सकारात्मक उर्जा निर्माण केली आणि सर्वत्रचे वातावरण ढवळून निघाले! आपल्या देशात पिक्चर चालतो तेव्हा त्यासह आजूबाजूचे एकूण वातावरणही ढवळून निघते. तो हिट चित्रपट फक्त पडद्यावर राहत नाही. ते एक प्रकारचे झपाटेपण असते.

मराठी चित्रपटसृष्टीतील रंगीत सिनेमाचे पर्व सुरु केलेला चित्रपट म्हणूनही "पिंजरा"ची विशेष ओळख! तत्पूर्वी, व्ही शांताराम यांनीच "इये मराठीचियें नगरी" ( १९६५) हा मराठीतील पहिला रंगीत चित्रपट निर्माण केला! पण "पिंजरा" च्या खणखणीत यशाने मराठी चित्रपटसृष्टीत रंगीत चित्रपटाचे पर्व सुरु झाले. ते पूर्ण रुळायला चक्क

म्हणजे साधारण दशकभरचा काळ गेला..! कारण, मराठीत चित्रपट निर्मितीचे तेव्हा बजेट नव्हते! ब्लॅक अँड व्हाईट अर्थात कृष्ण धवल चित्रपट परवडत होता. रसिक स्वीकारत होते!

'पिंजरा'चे मध्यवर्ती कथासूत्र रसिकांच्या मनाची चलबिचल करणारे आणि उत्सुकता वाढवणारे! सामर्थ्य आहे, मांडणीत याचाही प्रत्यय यात येतोय..!

'पिंजरा'.. त्यो कुनाला चुकलाय? अवो मानसाचं घरतरी काय असतं? त्योबी एक पिंजराच की?' हे तत्त्वज्ञान आपल्या रांगड्या भाषेत सांगणारी तमाशातील एक नर्तकी कोल्हाटीण 'चंद्रकला' (संध्या) आणि 'व्यक्ती मेली तरी चालेल समाजातील आदर्श जिवंत राहिले पाहिजेत!' या महान तत्त्वावर श्रद्धा असलेला एक माणूस! तोही

गावाला आदर्श शिकवणारे, सुसंस्कृत, उच्चवर्णिय शाळामास्तर (अभिनेता डॉ. श्रीराम लागू)! या दोघांच्या संघर्षाची कथा 'पिंजरा त अतिशय रोमांचकपणे, उत्कटतेने आणि प्रभावीपणे पडद्यावर आली आहे. यातील संघर्ष तोपर्यंतच्या तमाशापटांपेक्षा अतिशय वेगळा आणि नाट्यपूर्ण होता. अनीती, महत्वाकांक्षा, लोभ मोहाचे आगर समजले जाणारे अथवा तशी ओळख असलेले तमासगीर आणि "या गावाला आपल्याला जायचे नाही" असे जणू तत्वज्ञान असलेले आणि आदर्श समजली जाणारी नीतीमूल्ये यांच्यातील एक वेगळा तात्विक "सामना" येथे आकार घेतो!, रंगत जातो आणि एका बेसावध क्षणी एक नवीन वळण घेतो. ते वळण म्हणजेच "सामना"...! हॉलीवूडच्या "ब्ल्यू एंजल" या चित्रपटाच्या जर्मवरुन मध्यवर्ती

सूत्रावर आधारित अनंत माने यांनी "पिंजरा" ची कथा साकारताना हा ग्रामीण पार्श्वभूमीवरील आणि लावणी, तमाशा नृत्याला भरपूर वाव आहे याचे पूर्ण भान ठेवले! गीत संगीत व नृत्य यांच्या माध्यमातून/मांडणीतून कथा-आशय आकार घेतो, पुढे सरकतो. चंद्रकला आणि गुरुजी यांच्यावर चित्रीत झालेले प्रत्येक दृश्य आणि संवाद त्या काळातील आणि नंतरच्याही पिढीतील सिनेरसिकांच्या आजही लक्षात आहे. प्रत्येकाच्या मनःपटलावर "पिंजरा" कलाकृतींच एक वेगळंच हुकमी  स्थान आहे. याचं कारण, ही कलाकृतीच तशी सर्वोत्तम दर्जाची आहे! एकदा पडद्यावर ती सुरु झाली की आपण त्यात गुंतत/ गुरफटत जातो. व्ही. शांताराम, अनंत माने आणि शंकर पाटील या तिघांनी मिळून बंधिस्त व प्रभावी पटकथा रचली.

हा चित्रपट अनंत माने यांनी दिग्दर्शित करावा असे व्ही. शांताराम यांनी सुचवले होते, पण व्ही. शांताराम यांनी दिग्दर्शन करावे आपण सहाय्यक म्हणून काम करु असे अनंत माने यांनी म्हटले. असा एकमेकांबाबत आदर व विश्वास दाखवणे हे त्या काळाचे जगण्यातील एक वैशिष्ट्य! यातून समाजही घडतो आणि कर्तबगार माणसेही घडतात. डॉ. श्रीराम लागू यांची भूमिका असलेला हा पहिला चित्रपट आहे हेदेखील विशेषच! चित्रपट माध्यम म्हणजे काय हे फारसं माहित नसताना व्ही. शांताराम यांच्यावर पूर्ण विश्वास ठेवून लागू यांनी होकार दिला. यातच डॉ. श्रीराम लागू यांचा व्ही. शांताराम यांच्या कलाकृतीवरचा विश्वास दिसतो. लागू इतक्यावरच थांबले नाहीत. कोल्हापूरला शांतकिरण स्टुडिओत 'पिंजरा'चे

शूटिंग होत असताना आपले दृश्य नसले तरी व्ही. शांताराम यांचे दिग्दर्शन पाहण्यासाठी आणि त्यांची कार्यशैली जाणून घेण्यासाठी श्रीराम लागू सेटवर बसत. तशी त्यानी व्ही. शांताराम यांना अगोदरच कल्पना दिली होती आणि व्ही. शांताराम यांनी लागू यांना यासाठी आवर्जून होकार दिला. डॉ. श्रीराम लागू यांनी साकारलेला आदर्शवादी गुरुजी रसिकांना भावला. विशेषतः ज्या पध्दतीने ही व्यक्तिरेखा चंद्रकलाच्या "पिंजरा 'मध्ये सापडते आणि गुंतत, गुरफटत जाते याच्याशी प्रेक्षकांना सहानुभूती निर्माण होत गेली. आणि ती कायम राहिली. जेव्हा जेव्हा 'पिंजरा' आठवतो तेव्हा ही गोष्ट विशेषत्वाने आठवते. संध्या यांनी अभिनय आणि नृत्य यात आपला प्रभाव दाखवला. व्ही.शांताराम यांच्या दिग्दर्शनातील 'झनक झनक

पायल बाजे', 'नवरंग' इत्यादी संगीतमय चित्रपटात त्यांनी तत्पूर्वी भूमिका साकारल्याने दिग्दर्शक व कलाकार यांचे छान नाते जुळले गेले होते. 'पिंजरा'तही संध्या यांनी गीत संगीत व नृत्य यांची केमिस्ट्री अतिशय उत्तम रितीने साकारलीय. थीमच्या मांडणीत आणि चित्रपटाच्या यशात त्याचा मोठाच वाटा. निळू फुले यांची "सोंगाड्या"ची भूमिका वेधक ठरली. लोकप्रिय झाली. या कलाकारांसोबतच या चित्रपटात वत्सला देशमुख, माणिकराज, गोविंद कुलकर्णी, कृष्णकांत दळवी, सरला येवलेकर, आबू, भालचंद्र कुलकर्णी, बर्चीबहाद्दर इत्यादींच्याही भूमिका आहेत. या चित्रपटाचे संवाद शंकर पाटील यांचे आहेत. 'पिंजरा' ही एका तत्वनिष्ठ व ब्रह्मचारी शिक्षकाची केवळ एका नर्तकीच्या क्षणीक

मोहाच्या पिंजऱ्यात अडकून झालेल्या त्याच्या नैतीक, आत्मीक व सामाजीक अध:पतनाची कथा आहे. त्यात संवाद हा महत्वाचा घटक आहे. या चित्रपटाची ती एक ओळख आहे! चित्रपटातील गीते जगदीश खेबूडकर यांची आहेत तर संगीत राम कदम यांचे आहे. विशेष म्हणजे, व्ही. शांताराम यांचे पूर्ण समाधान होईपर्यंत जगदीश खेबूडकर आणि राम कदम यांनी एकेका गाण्याची अनेकदा तरी  रचना आणि चाली रचल्या. याच्या अनेक कथा, किस्से , गोष्टी प्रसिद्ध आहेत! ‘आली ठुमकत नार..‘, ‘दे रे कान्हा चोळी लुगडी..‘, ‘छबीदार छबी मी तोऱ्यात उभी..‘, ‘तुम्हावर केली मी मर्जी बहाल..’ ‘मला इष्काची इंगळी डसली..‘, 'दिसला ग बाई दिसला..', 'कशी नशिबानं थट्टा आज मांडली..' ही आणि अन्य सर्व गाणी/लावण्या

आजही लोकप्रिय आहेत. आजही या सर्वच गाण्यांची लोकप्रियता कायम आहे! 'पिंजरा'ची ती ताकद आहे! रसिकांच्या किमान तीन साडेतीन पिढ्या ओलांडूनही ही गाणी आणि चित्रपट लोकप्रिय आहेत. या चित्रपटाचे छायाचित्रण शिवाजी सावंत यांचे, कला दिग्दर्शन बाबूराव जाधव, नृत्य दिग्दर्शन रंजन साळवी यांचे आहे! या चित्रपटाचे सगळे शूटिंग कोल्हापूरच्या शांतकिरण स्टुडिओत झाले. (आज हा स्टुडिओ दुर्दैवाने इतिहासजमा झाला आहे. तेथे अशा अनेक अजरामर कलाकृती निर्माण झाल्या. कोल्हापूर येथील जयप्रभा स्टुडिओ व शांतकिरण स्टुडिओ यावर भरपूर माहितीपूर्ण लघुपट तयार करण्यात यायला हवा. एक सांस्कृतिक ठेवा होईल तो!)

या चित्रपटाला उत्कृष्ट चित्रपटाचा राष्ट्रीय

पुरस्कार प्राप्त झाला ही वृत्तपत्राची पहिल्या पानावरची बातमी ठरली!

"पिंजरा" हा मराठी तर झालेच पण अगदी भारतीय चित्रपटसृष्टीच्या चौफेर वाटचालीला एक उल्लेखनीय आणि सर्वोत्कृष्ट चित्रपट आहे. याच मराठी "पिंजरा"ची व्ही. शांताराम यांनी वर्षभरात "पिंजडा"(मुंबई रिलीज ३० नोव्हेंबर १९७३) या नावाने हिंदीत रिमेक केली. त्यात डॉ. श्रीराम लागू आणि संध्या यांच्या प्रमुख भूमिका आहेत. मुंबईत मेन थिएटर मराठा मंदिर येथे प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाला मराठी "पिंजरा"ची सर आली नाही. मूळ चित्रपटाशीही तुलना झाली. आणि मूळ चित्रपटाचा ठसा कायम होताच.

मराठी "पिंजरा" त्यानंतर दूरदर्शन, व्हिडिओ-कॅसेट, उपग्रह वाहिनीवर, ओटीटीवर

असा पुढील पिढीसमोर येत राहिलाच. तसेच तो अधूनमधून रिपीट-रनला पुन्हा पुन्हा प्रदर्शित होत असतोच आणि या चित्रपटातील लोकप्रिय गाणी आजही रिॲलिटी शो, संगीत शो, वाद्यवृंद, यू-ट्यूब, यातून रसिकांसमोर येत आहेत. डिजिटल मिडियात 'पिंजरा'ची छोट्या छोट्या गोष्टींतून दखल घेतली जातेय आणि "पिंजरा"चे महत्व आणि अस्तित्व पुन्हा पुन्हा अधोरेखित होत आहे. हे या चित्रपटाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य आहे. सहज एक योगायोग सांगतो, पुणे शहरात 'पिंजरा' रिलीजच्याच दिवशी अलका टॉकीजमध्ये दादा कोंडके यांचा 'एकटा जीव सदाशिव' ही रिलीज झाला आणि दोन्ही चित्रपट सुपर हिट ठरले. असे एकाच शुक्रवारी प्रदर्शित होणारे दोन्ही चित्रपट सुपर हिट व्हावेत असे सुखद योग कायमच यावेत!

कितीही वर्षे झाली तरी 'पिंजरा' सारख्या महान कलाकृती कायमच 'आजच्याच' असतात हे त्यांचे मोठेच वैशिष्ट्य. पुन्हा 'पिंजरा' निर्माण झाला नाही! होणेही नाही! आणि तशी अपेक्षाही ठेवू नये! चित्रपती व्ही. शांताराम यांचे भारतीय चित्रपट सृष्टीतील मानाचे स्थान त्यांच्या अनेक कलाकृतींनी अधोरेखित होते, त्यात 'पिंजरा'ची ओळख आणि स्थान वैशिष्ट्यपूर्ण! या चित्रपटातील सगळीच गाणी आजही लोकप्रिय आहेत. आणि या गाण्यांच्या निर्मिती प्रक्रियेत त्यांची संगीतकार राम कदम यांच्याशी जोडी जमली! चित्रपती शांताराम बापू कडक शिस्तीचे आणि पूर्णपणे समाधान होईपर्यंत अव्याहतपणे काम करणारे दिग्दर्शक होते. यातील एकेका गाण्यासाठी संगीतकार राम कदम यांनी अक्षरशः दहा-दहा चाली लावल्या

होत्या. त्याचप्रमाणे गीतकार जगदीश खेबुडकर यांनी देखील एकेका गाण्यासाठी वीस वीस कडवी लिहिली होती. शांताराम बापूंचे समाधान होईपर्यंत गीतकार आणि संगीतकार दोघेही अक्षरशः राब राब राबत होते. म्हणूनच तर आपण पन्नास वर्षे झाली तरी 'पिंजरा' चित्रपटातील प्रत्येक गाण्याचे शब्द त्यातील म्युझिक-पिसेससहित आपल्याला पाठ आहेत. आपल्या देशातील चित्रपट संगीताचे हे वैशिष्ट्य आहे. यामागे या सर्व टीमची प्रचंड मेहनत होती. "पिंजरा" चित्रपटात 'देरे कान्हा चोळी लुगडी …!' हे लता मंगेशकर यांनी रागात गायलेले गीत होते! या गाण्याच्या निर्मितीचा किस्सा भन्नाट आहे! शांताराम बापूंनी सिच्युएशन सांगितली. गीतकार जगदीश खेबुडकर गाणे लिहायला बसले. पण बापूंचे काही केल्या समाधान होत नव्हतं. त्यांनी

तब्बल १६ गाणी नापसंत केली. शेवटी सतरावे गाणे जेव्हा खेबुडकर यांनी बापूंच्या हातात ठेवले त्या वेळेला बापूंचे डोळे चमकले. त्यांना हेच गाणे हवे होते. गाणं फायनल झालं! बापूंनी गाण्याचा कागद राम कदम यांच्याकडे सरकवला. आता संगीतकार राम कदम  यांची परीक्षा सुरू झाली. दिवसभर ते बापूंना वेगवेगळ्या चाली ऐकवत होते पण बापूंना त्यातील एकही आवडत नव्हती. दिवसभर काम करून ते कंटाळले.

शेवटी संगीतकार राम कदम वैतागले ते शांताराम बापूंना म्हणाले, "मला तुम्ही पुण्याचे तिकीट काढून द्या. मी पुण्याला जातो!.." बापूंनी लगेच राम कदम यांच्यासाठी पुण्याचे रिटर्न तिकीट काढून दिले. राम कदम संध्याकाळी डेक्कन क्वीनमध्ये बसले. संपूर्ण प्रवासात त्यांच्या

डोक्यात तेच गाणे होते. काही केल्या चाल सापडत नाही. काय करावे? राम कदम अक्षरशः वैतागले होते इतकं कुठल्याच गाण्याने त्यांना थकवलं नव्हतं. स्वतः वर चिडले होते. शेवटी खडकी स्टेशन आले. राम कदम यांनी डोळे मिटून घेतले आणि मनातल्या मनात आपल्या गुरूंची आराधना केली. ते म्हणाले, ”खान साहेब, मुझे माफ कीजिए. मै आपका काबील शागीर्द नही बन सका. मैने आपके नाम को धब्बा लगाया..” इतकं म्हटल्यानंतर त्यांना तंद्री लागली आणि गुरुने जणू त्यांच्या कानात आशीर्वाद देत चाल सांगितली आणि म्हणाले, ”हा स्वर घे आणि बांध चाल!” थोड्यावेळाने राम कदम यांना जाग आली तेव्हा गाडी पुण्याला पोहोचली होती. राम कदम गाडीतून उतरलेच नाही. पुढे ती गाडी यार्डात गेली.

तरी राम कदम गाडीतच बसून राहिले. आपल्या गुरूंचे खान साहेबांचे 'गोपाला मेरी करुणा...' चे स्वर त्यांच्या कानात गुंजारव करू लागले होते. त्यांच्या चित्तवृत्ती एकदम जागा झाल्या आणि त्यांनी त्या सुरावटीवर गाण्याला चाल लावली. 'देरे कान्हा चोळी अन लुगडी..!' पिलू रागावर ही चाल बांधली. रात्रभर ते डेक्कन क्वीनच्या अंधाऱ्या डब्यामध्ये यार्डात बसून होते आणि कागदावर ते नोटेशन लिहित होते!

दुसऱ्या दिवशी सकाळी पुन्हा त्याच डेक्कन क्वीनने ते मुंबईला निघाले. बापूंनी त्यांना रिटर्न तिकीट दिले होतेच. मुंबईला राजकमल कलामंदिर स्टुडिओत गेल्यानंतर बापूंना त्यांनी ही ३९वी चाल ऐकवली आणि बापूच्या चेहऱ्यावर पसंतीची मोहर उमटली ते फार खुश झाले ते म्हणाले, "राम आपण

हे गाणं लताकडून घेऊया!,," त्यावर राम कदम म्हणाले, "ठीक आहे चालेल. पण लतादीदीला मात्र फोन तुम्हीच करा." या गाण्याच्या रिहर्सलसाठी मान्यवरांना पाचारण करण्यात आले. बासरीसाठी हरिप्रसाद चौरसिया, संतूरसाठी शिवकुमार शर्मा, वादक इनॉक डॅनियल आणि वायब्रोफोनसाठी केरसी लॉर्ड! शांताराम बापूंनी लता मंगेशकर यांना विचारून एक तारीख निश्चित केली आणि राम कदम यांना तसे सांगितले. पण रामभाऊ म्हणाले, "अहो, त्या दिवशी मला मिरजेला जायचे आहे तिथे आमच्या दर्ग्यामध्ये उरूस असतो आणि मी कुठल्याही परिस्थितीमध्ये हा उरूस चुकवत नाही. मला जाणे गरजेचे आहे..!" बापूंना राम कदम यांचे हे बोलणे रुचले नाही. ते म्हणाले, "लता मंगेशकर पुढच्या दोन महिन्यासाठी परदेशात

जाणार आहेत. त्यामुळे रेकॉर्डिंग याच दिवशी करावे लागेल.” राम कदम यांनी हरतऱ्हेने समजावून सांगितले पण बापू ऐकायला तयार नव्हते. शेवटी शांताराम बापू चिडले आणि म्हणाले, ”तुला मिरजेला जायचे असेल तर जा. पण जाताना तुझा सगळा हिशोब पूर्ण करून पैसे घेऊन जा. पुन्हा परत यायची गरज नाही!” त्याप्रमाणे संगीतकार राम कदम यांचा संपूर्ण हिशेब बापूंनी पूर्ण केला आणि त्यांची रवानगी केली. राम कदम यांना वाटले आता हे गाणे ते वसंत देसाई यांच्याकडून ते स्वरबद्ध करून घेतील.

ते निश्चिंत मनाने मिरजेला आपल्या मुलांना आणि पत्नीला घेऊन गेले आणि पुन्हा पुण्यात आले. आता राजकमलला जाण्याचा काही प्रश्नच नव्हता कारण सर्व हिशोब पूर्ण झाला होता. परंतु घरी

आल्या आल्या त्यांना एक तार मिळाली. ही तार शांताराम बापूंचे पुत्र किरण शांताराम यांनी केली होती. त्यात लिहिले होते, "ताबडतोब मुंबईला या!" राम कदम दुसऱ्या दिवशी मुंबईला राजकमल स्टुडिओत गेले. तेव्हा त्यांना त्याचा उलगडा झाला. लता मंगेशकर यांचे परदेश जाण्याचा दौरा पुढे ढकलला गेला होता! त्यामुळे त्या गाण्याची रेकॉर्डिंग झालेच नव्हते. दुसऱ्या दिवशी राजकमलच्या रेकॉर्डिंग स्टुडिओमध्ये या गाण्याचे रेकॉर्डिंग झाले. पिल्लू रागावरील 'देरे कान्हा चोळी अन लुगडी…' हे गाणे रेकॉर्ड झाले आणि मागच्या बावन्न वर्षापासून मराठी रसिकांची ते आवडते गीत बनले आहे! राम कदम यांच्याकडे लता मंगेशकर यांनी अतिशय कमी गाणी गायली. त्यातील सर्वात लोकप्रिय हेच गाणे ठरले. मधू

पोतदार यांनी त्यांच्या संगीतकार राम कदम या पुस्तकात ही आठवण सांगितली आहे.

'पिजरा म्हणजे व्ही शांताराम आणि व्ही. शांताराम म्हणजेच पिंजरा' या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल पिढीने यू-ट्यूबवर या पिक्चरचा आनंद घ्यावाच. निदान गाणी तरी पहावीत! या पिक्चरच्या व्यक्तिमत्वाला ती कशी फिट्ट आहेत हे दिसेल!

माझे आवडते दिग्दर्शक आणि आवडते चित्रपट अनेक! आमचे गिरगावकर दिग्दर्शक मनमोहन देसाई यांचा "अमर अकबर अँथनी", यश चोप्रा दिग्दर्शित "दीवार" यापासून ते नागराज मंजुळे दिग्दर्शित "सैराट"! अशी बरीच नावे आहेत. त्या प्रत्येक चित्रपटावर मी भरभरून लिहू शकतो, बोलू शकतो, वाचू शकतो, पाहू शकतो नि ऐकू

**शकतो! त्यांतील एक "पिंजरा"!!**

**तो कुनाला चुकलाय?!**

**© दिलीप ठाकूर**
**('चित्रांगण' - दिवाळी अंक २०२५)**
**♥**









## लेख क्र. ७

## 'मेरे जीवन साथी' @५३ वर्षे...
## आर. डी. बर्मन-राजेश खन्ना दोस्ती फॉर्मात!




चित्रपटसृष्टीतील खास मैत्रीची काही उदाहरणे बहुचर्चित आहेत!

'राज कपूर' व 'राजेंद्र कुमार' ही एक चांगली मैत्री. कालांतराने राजेंद्रकुमारचा मुलगा कुमार गौरव व राज कपूरच्या मुलीचा साखरपुडाही झाला. पण काही कारणास्तव हे लग्न होवू शकले नाही. त्यामुळे ही खास मैत्री नात्यात बदलली

नाही!

'अशोक सराफ' व 'सचिन पिळगावकर' हीदेखील एक खास मैत्री! सचिन पिळगावकर दिग्दर्शित प्रत्येक चित्रपटात अशोक सराफची भूमिका आहेच. अशोक सराफना 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार जाहीर झाला, 'पद्मश्री पुरस्कार' जाहीर झाला आणि लगोलग सचिन व सुप्रिया या पिळगावकर दाम्पत्याने अशोक सराफ यांचे त्यांच्या घरी जाऊन अभिनंदन केले!

जितेंद्र, राकेश रोशन व ऋषि कपूर यांचीही अतिशय खास मैत्री होती. तिघेही मुंबईत असल्यावर प्रत्येक शनिवार रशियन ते जुहू चौपाटीवरील सन ॲण्ड सॅण्ड हॉटेलमधील सूटसमध्ये मैत्री एन्जॉय करत! (हे गाणे पहा.)

महेश कोठारे व लक्ष्मीकांत बेर्डे यांचीही मैत्री

गाजलेली. लक्ष्मीकांत बेर्डेने रंगभूमीवर पाऊल टाकले असतानाच महेश कोठारेने लक्ष्मीकांत बेर्डेवर विश्वास दाखवला आणि ही जोडी जमली! त्यातून महेश कोठारेच्या "धूम धडाका" या चित्रपटापासून रंगत आली.

अशीच एक मैत्रीची जोडी. संगीतकार व पार्श्वगायक राहुल देव बर्मन आणि सुपर स्टार राजेश खन्ना यांची!

या मैत्रीतून सत्तर व ऐंशीच्या दशकात हिंदी चित्रपटातून चित्रपट रसिकांना अनेक लोकप्रिय गाणी ऐकायला, पाह्यला व गुणगुणायला मिळाली. आजही चाळीस पन्नास वर्षांनंतरही ती गाणी लोकप्रिय आहेत. त्या गाण्यांनी ग्रामोफोन रेकार्ड, रेडिओ, लाऊडस्पीकर, इराणी हॉटेलमधील ज्युक बॉक्स यापासून दूरदर्शन, व्हिडिओ, उपग्रह

वाहिनी, यू-ट्यूब, ओटीटी असा यशस्वी प्रवास केला. लोकप्रिय गीत संगीत व नृत्याने एका पिढीतील चित्रपट पुढील अनेक पिढ्यांपर्यंत पोहचत असतात. तसे या जोडीबद्दल झाले!

राहुल देव बर्मनबद्दलचा एक किस्सा भारीच लोकप्रिय आहे!

शक्ती सामंता निर्मित व दिग्दर्शित 'कटी पतंग' (१९७१) सुपर हिट ठरला. (मुंबईत रॉक्सी चित्रपटगृहात रौप्य महोत्सवी यश संपादन केले!) आणि सुपर स्टार राजेश खन्ना व संगीतकार राहुल देव बर्मनची छान गट्टी जमली! दोघांनीही या पिक्चरच्या 'ज्युबिली हिट' यशाने आपली पोझिशन आणखीन भक्कम केली. शक्ती सामंता निर्मित व दिग्दर्शित 'आराधना'च्या (१९६९) खणखणीत यशाने राजेश खन्नाचे युग रंगात आले

(हा चित्रपटही मुंबईत रॉक्सी चित्रपटगृहात पन्नास आठवडे चालला!) राहुल देव बर्मनने नासिर हुसेन निर्मित व विजय आनंद दिग्दर्शित 'तिसरी मंझिल' (१९६६) च्या लोकप्रिय गीत संगीताने आपली ओळख निर्माण केली होतीच. 'कटी पतंग' आर. डी. व राजेश खन्ना या दोघांसाठी महत्त्वाचा टप्पा ठरला आणि तेव्हापासून या दोघांची मैत्री जमतानाच यांच्या खास मैत्रीत आणखीन एक मित्र होता, किशोरकुमार! एव्हाना जुन्या पिक्चरचे शौकिन जुन्या आठवणीत रमले असतील. तिघांनी मिळून हिंदी चित्रपट संगीतात अनेक श्रवणीय गाणी दिली. 'अमर प्रेम' पासून 'कुदरत' पर्यंतचे त्यांचे प्रगती पुस्तक भारीच आहे! तो चित्रपट संगीताचा बहरलेला काळ होता. चित्रपट गाण्यावरचे वाद्यवृंदाचे अनेक कार्यक्रम

हाऊसफुल्ल गर्दीत एन्जॉय केले जात! एवढेच नव्हे तर त्या काळात प्रति राजेश खन्ना व तसेच प्रति किशोरकुमार निर्माण झाले! नकली कलाकार यशस्वी कसे ठरतील? पण सगळेच ओरिजिनल कसे असतील?

या मैत्रीत आर. डी. बर्मन कसा जागला? तर जेव्हा जेव्हा त्याला अन्य कलाकारांच्या चित्रपटासाठी वा अगदी सहजच चांगल्या चाली सुचत त्या तो काकासाठी अर्थात राजेश खन्नासाठी बाजूला काढून ठेवायचा आणि राजेश खन्नाचा चित्रपट त्याच्याकडे आला रे आला की त्या चाली राहुल देव बर्मन वापरे...! हा किस्सा लोकप्रिय आहे. याला खरी मैत्री म्हणतात. चित्रपटसृष्टीत अशी मैत्री झाली आहे, होतेदेखील!

'ओ मेरे दिल के चैन...'

'चला जाता हू किसीकी धूनमे..'

'दीवाना लेके आया है...'

ही आजही लोकप्रिय असलेली आणि सहज गुणगुणता येतील अशी गाणी अशीच जन्माला आल्याची आख्यायिका प्रसिद्ध आहेच बरं! तसेच असेल अथवा नसेलही कदाचित, पण पन्नास बावन्न वर्षांनंतरही ही गाणी लोकप्रिय असली तरी ही गाणी असलेला हरिश शहा व विनोद शहा निर्मित व रविकांत नगाईच दिग्दर्शित 'मेरे जीवन साथी' (प्रदर्शन २२ सप्टेंबर १९७२... म्हणजेच पिक्चरला त्रेपन्न वर्षे झाली.) मात्र बराचसा विसरला गेला आहे! अपवाद राजेश खन्नाच्या तेव्हाच्या निस्सीम चाहत्यांचा! एव्हाना त्यांनी वयाची पन्नाशी/साठी नक्कीच ओलांडली असेल. आणि त्याना आपले तरुणपणीचे दिवस नक्कीच आठवले असतील.

चित्रपट चाहत्यांचाही आपला एक फ्लॅशबॅक असतो. जुन्या काळातील चित्रपटांबाबत आजही विलक्षण हळवे होणारे, त्या दिवसात रमणारे चित्रपट रसिक आहेत. तो त्यांचा भावनिक आनंद व आधार असतो. अशा सुवर्ण कामाचे अनेक व्हॉटसअप ग्रुप आहेत. ते कायमच जुन्या काळातील चित्रपटांवर फोकस टाकतात. 'मेरे जीवन साथी'ची गाणी आजही तरुणच आहेत. यापुढेही ती तारुण्यात राहतील. ही तीनही गाणी किशोरकुमारने राजेश खन्नाच गातोय अशाच स्टाईलने गायलीत! हे त्या गाण्याचे व्यक्तिमत्व सांगतेय. एक्सप्रेशन 'मेलडी' म्हणजेच गाण्याचा भावार्थ व कलाकाराचे व्यक्तिमत्व, शैली यात गुंतली आहे. ही गाणी मजरुह सुल्तानपुरी यांनी लिहिली आहेत. मजरुह व राहुल देव बर्मन

हीदेखील एक जमलेली अशी गीतकार व संगीतकार जोडी!

ही गाणी आजही लोकप्रिय असली तरी फर्स्ट रनला पिक्चर 'फ्लॉप' झाले त्याचे हो काय? हरीश शहा व विनोद शहा या चित्रपटाचे निर्माते आहेत! माझ्या मते या पिक्चरच्या अपयशाचे महत्त्वाचे कारण म्हणजे, हा चित्रपट दिग्दर्शक रविकांत नागाईच यांच्या स्टाईलचा नव्हता. यांच्याच दिग्दर्शनातील 'द ट्रेन' (१९७०) मध्ये राजेश खन्नाच हीरो होता. हा रहस्यरंजक म्युझिकल हिट पिक्चर आजही पुन्हा पुन्हा पहावासा वाटतो. त्यालाही राहुल देव बर्मनचे सुपर हिट संगीत!

रविकांत नागाईच यांच्या दिग्दर्शनातील 'फर्ज' (१९६७, जितेंद्र व बबिता), 'द ट्रेन' (१९७०, राजेश खन्ना व नंदा), 'किमत' (१९७३, धर्मेंद्र व

रेखा), 'सुरक्षा' (१९७९, मिथुन चक्रवर्ती व रंजिता) या पिक्चर्समध्ये एक कॉमन सूत्र आहे, हे जेम्स बाँड स्टाईल हिंदी फिल्म आहेत. मूळ विदेशी कल्पनेचे हिंदीकरण!

रविकांत नागाईच यांच्याच अन्य पिक्चर्सपेक्षा वेगळे. 'मेरे जीवन साथी' तर योगायोगाने खच्चून भरलेल्या गोष्टीची पटकथेत फसलेली मांडणी. त्यात पुन्हा एक लोच्या होताच, राजेश खन्नाने एकाच वेळेस इतके पिक्चर स्वीकारले होते की, त्याची शूटिंगसाठी धावपळ होई, या सेटवरुन त्या सेटवर तो सारखी पळापळ करीत असे. मुळात तो उशीराच यायचा! आणि त्यातूनच त्याच्या अभिनयात तोचतोचपणा अथवा नाटकीपणा येत गेला आणि हे पब्लिक का स्वीकारेल? त्याने असे करायला नको होते! पण

यशाच्या शिखरावर असताना त्याची जाणीव होत नसते! आपण काय करतोय याचे भान नसते! गाणी लोकप्रिय असल्याने नंतर मॅटीनी शोला पिक्चरला चांगला रिस्पॉन्स मिळत राहिला. ते अपेक्षित होते. हिट गाणी चित्रपटाला असे जिवंत ठेवते. आणि चित्रपटाला पुढील पिढीत नेते!

पिक्चरची थोडक्यात गोष्ट अशी...

गोष्टीचा नायक प्रकाश (राजेश खन्ना) एका श्रीमंत बापाचा (के. एन. सिंग) मुलगा, जो आर्टिस्ट आहे, चित्र रेखाटतो, पण एक दिवस बाप आपल्या या मुलाला चॅलेंज देतो की जर स्वतःच्या बळावर तुला श्रीमंत व्हायचे असेल तर तुला स्वतःला स्वतःच्या कर्तृत्वावर सिद्ध करावं लागेल, हे ऐकल्यावर प्रकाश घर सोडतो आणि स्वतःला सिद्ध करायला निघतो, आता त्याची ओळख

कामिनीशी (हेलन) होते आणि तो प्ले-बॉय होऊ पाहतो (येथेच गोष्टीची गाडी घसरते ती सावरतच नाही. अरेरे!), त्याची स्वतःची ओळख पेंटिंगमधून पण तो आता मॉडर्न आर्ट करायला लागतो. एक कलाकार म्हणून नवीन ओळख झालेल्या प्रकाशला लंडनवरुन डॉक्टर झालेल्या ज्योती (तनुजा) च्या एका फंक्शनचे आमंत्रण मिळतं आणि प्ले-बॉय प्रकाश आणि ज्योती यांचे सूर ('ओ मेरे दिल के....') हळूहळू जुळू लागतात, (गोष्ट अजून एक वळण घेते. ते फार नाट्यमय नसते!) ज्योतीच्या वडिलांना प्रकाशची प्ले-बॉयची इमेज आवडत नाही, पण एक दिवस त्यांना प्रकाशमधला चांगला माणूस दिसतो आणि ते या लग्नाला होकार देतात, या आनंदाच्या भरात प्रकाश ज्योतीला भेटून निघालेला असताना ('चला जाता हू..' हे गाणे

उत्फूर्तपणे गात गात) अचानक त्याच्या गाडीचे ब्रेक फेल झाल्याने अपघात होतो आणि या अवस्थेत त्याला कामिनी वाचवते, अपघातानंतर प्रकाशचे डोळे जातात आणि त्याच्या असहाय्य परिस्थितीचा कामिनी फायदा घेते, पण एक दिवस प्रकाश पळून जातो, त्याचा शोध घ्यायच्या नादात कामिनी कड्यावरून खाली पडते आणि तिचा मृत्यू होतो, दरम्यान प्रकाश डोळे नसल्याने वाट सापडेल तिकडे जात असतो, अशा अवस्थेत प्रकाशला कॅप्टन विनोद (सुजितकुमार) भेटतो आणि तो त्याला आपल्या घरी घेऊन येतो. आता विनोदचे आई आणि वडील (सुलोचना आणि उत्पल दत्त) प्रकाशची चांगली काळजी घेतात, प्रकाशला अपघात झाल्याचे समजताच ज्योतीला धक्का बसतो पण यथावकाश ती सावरते आणि

विनोद तिच्या आयुष्यात येतो, विनोदचे आई आणि वडील ज्योतीवर विनोदशी लग्न करण्यासाठी प्रयत्न करतात, ज्योती घरी येते तेव्हा तिच्या वडलांना (नासिर हुसेन) हृदय विकाराचा झटका आलेला असतो आणि ते ज्योतीने लग्न करावे म्हणून वचन मागतात, मग ज्योती विनोदबरोबर साखरपुडा करते आणि याच पार्टीत प्रकाश विनोदसाठी एक गाणं ('दीवाना ले के आया है, दिल का तराना..') सादर करतो तेव्हा त्याच्या आवाजावरुन ज्योतीला समजते की प्रकाश जिवंत आहे.....आता चित्रपट क्लायमॅक्सकडे वळतो. आणि अपेक्षित गोष्टी घडतात!

....या नाट्यपूर्ण घटनांबाबत रसिकांना फारसा रस वाटला नाही, मांडणीही फसली होती आणि राजेश खन्नाची जबरा क्रेझ असूनही पिक्चर

नाकारला गेला. याचे मुंबईतील मेन थिएटर 'अप्सरा' होते!

१९७२च्या पहिल्याच शुक्रवारी राजेश खन्नाचा प्रेमजी निर्मित व दुलाल गुहा दिग्दर्शित 'दुष्मन' प्रदर्शित झाला तोच फर्स्ट डे फर्स्ट शोपासूनच सुपर हिट! (मुंबईतील ताडदेवच्या 'गंगा' व 'जमुना' या थिएटरचे उदघाटन याच पिक्चरने झाले! काही वर्षांपूर्वीच ही जुळी चित्रपटगृहे पाडली गेलीत. पण तेथे प्रदर्शित झालेले चित्रपट विविध कारणास्तव चर्चेत आहेत!) , १९७२ सालीच शक्ती सामंता दिग्दर्शित 'अमरप्रेम' (रॉक्सीत), जम्बो दिग्दर्शित 'अपना देश'(लिबर्टीत) हे तीन चित्रपट अंतरा अंतराने सुपरहिट! राजेश खन्नाचे युग होते हो! हृषिकेश मुखर्जी दिग्दर्शित 'बावर्ची' सेमीहीट ठरला! (मेट्रोत प्रदर्शित झाला

होता) पण 'जोरु का गुलाम' (रिलीज १५ सप्टेंबरला 'अलंकार' चित्रपटगृहात!) आणि 'मेरे जीवन साथी' हे लागोपाठच्या शुक्रवारी प्रदर्शित झाले आणि राजेश खन्नाच्या व्यावसायिक शत्रू, टीकाकार, मिडिया यांना आयतीच संधी मिळाली! आणि त्यात राजेश खन्नाच्या आणखीन काही फ्लॉपची भर पडली. हा सगळा एकाच वेळेस अनेक चित्रपट साईन करणे, मग पटकथेत फेरफार करणे, आता कामाची घाई असल्याने पाठ केल्यागत संवाद बोलणे आणि त्याच्या चित्रपटाच्या वितरकांचा अतिआत्मविश्वास यातून ही पडझड झाली! तनुजाबरोबरचा राजेश खन्नाचा हा चिन्नापा देवरच्या 'हाथी मेरे साथी' (१९७१) या सुपर हिट चित्रपटानंतरचा चित्रपट! तर त्यानंतर जम्बो दिग्दर्शित 'हमशकल' (१९७४) मध्ये पुन्हा एकत्र

आले. त्याचीही गाणी आजही लोकप्रिय आहेत. पण तोही फ्लॉप ठरला!

'मेरे जीवन साथी'ची एकच जमेची बाजू म्हणजे राहुल देव बर्मनचे तरुण आणि सदाबहार संगीत. ती त्याची खासियतच!

'ओ मेरे दिल के चैन' हे गाणं त्याच्या स्वप्नात आलं असाही एक भारीच किस्सा आहे! गंमत म्हणजे, हे गाणं आधी राजेश खन्नाने चक्क विशेष दम नाही असे म्हणतच नाकारले! (अनेकदा तो आपल्या गीत संगीतावर विशेष लक्ष देई. रेकॉर्डिंगलाही हजर राही.) पण १५ मिनीटात आर. डीने राजेश खन्नाची समजून घातली आणि हे गाणं सिनेमात आलं. आजही हे गाणे लोकप्रिय आहे!

हिट गाण्यानी अनेक चित्रपट अनेक वर्षे 'फोकस' मध्ये ठेवलेत. तसाच हा एक! गीत संगीत

व नृत्य ही आपल्या समाजाची आणि चित्रपटांची मोठीच ओळख आहे. 'मेरे जीवन साथी' हा चित्रपट कायमच त्यातील लोकप्रिय गीत संगीत व राजेश खन्नाची शैली यासाठी कायमच लक्षात राहिलाय!

© दिलीप ठाकूर
(महाराष्ट्र दिनमान-शनिवार लेख)
♥









## लेख क्र. ८

## 'आझाद 'ची वैशिष्ट्यपूर्ण सत्तेचाळीस वर्षे!




एक नाव.. दोन वा अनेक चित्रपट ही देखील चित्रपट संस्कृतीतील एक विशेष गोष्ट.! कधी त्यातला पहिलाच सर्वकालीन वैशिष्ट्यपूर्ण ठरला! मात्र चित्रपती व्ही.शांताराम यांचा "दो आंखे बारह हाथ" या चित्रपटाची आपली एक खास ओळख आहे! नव्वदच्या दशकातही गोविंदाचाही याच नावाचा चित्रपट पडद्यावर आला.. तोच गेला! तात्पर्य एकाच नावाचे दोन चित्रपट सारख्याच

दर्जाचे असतील असे अजिबात नाही! प्रत्येक पटकथाकार व दिग्दर्शकाची कुवत वेगळी असते यात त्याचे उत्तर आहे!

'आझाद' नावाचा चित्रपट चक्क तीनदा आला! पहिल्यांदा दिलीपकुमार त्याचा नायक होता आणि तिसऱ्या वेळेस अनिल कपूर! तर या दोन चित्रपटांच्या दरम्यान निर्माता-दिग्दर्शक प्रमोद चक्रवर्ती दिग्दर्शित 'आझाद' [१९७८] हा चित्रपट आला! (१ सप्टेंबर रोजी या 'आझाद' ला चक्क सत्तेचाळीस वर्षे झालीत!) दिलीपकुमारने "आझाद" या चित्रपटात काम करण्याचे कारण वेगळे होते. अमिया चक्रवर्ती दिग्दर्शित दाग, बिमल रॉय दिग्दर्शित "देवदास" अशा काही चित्रपटातून शोकात्म नायक (ट्रॅजेडी किंग!) साकारल्याने एक प्रकारेची निराशाजनक मानसिकता आपल्याला

ग्रासतेय की काय असे वाटत असताना आपण एकादी हलकीफुलकी भूमिका साकारायला हवी असे वाटल्याने दिलीपकुमारने "आझाद" या चित्रपटात भूमिका साकारली! आणि चित्रपट रसिकांना असाही दिलीपकुमार आवडला! चित्रपट सुपर हिट झाला! अनिल कपूरचा "आझाद" फार काही चमक दाखवू शकला नाही! टीनू आनंद दिग्दर्शित "मै आझाद हू" (अमिताभ बच्चन व शबाना आझमी!), के. सी. बोकाडिया निर्मित "आझाद देश के गुलाम" (ऋषि कपूर, रेखा, जॅकी श्रॉफ) या चित्रपटांच्या नावातही "आझाद " आहे! मै आझाद हू अमिताभसाठी वेगळा चित्रपट होता. पण रसिकांनी तो नाकारला! "मिस्टर बो" या विदेशी चित्रपटावर आधारित तो होता!

## सत्तरच्या दशकाच्या उत्तरार्धातील सिनेमा

"आझाद" हा धर्मेंद्र व हेमा मालिनी यांचे प्रेमप्रकरण विलक्षण जोरात असतानाच्या दिवसातील हा पारंपरिक लोकप्रिय मसाला मनोरंजन चित्रपट आहे. हे प्रेम प्रकरण रमेश सिप्पी दिग्दर्शित "सीता और गीता" ( १९७२) च्या सेटवर सुरु झाले, प्रमोद चक्रवर्ती दिग्दर्शित "जुगनू" (१९७३) च्या सेटवर पुढे गेले, दुलाल गुहा दिग्दर्शित "प्रतिज्ञा" (१९७५)च्या सेटवर ते विकसित होत गेले.

रमेश सिप्पी दिग्दर्शित "शोले" ( १९७५) च्या कर्नाटक राज्यातील रामनगर येथील रामगढ गावातील सेटवर ते भक्कम झाले! तो विवाहित आणि ती ड्रीम गर्ल यांच्यातील नाजूक साजूक रिश्ता म्हणजे गॉसिप्स मॅगझिनमधून "काय काय वाट्टेल ते" शिजवले, पिकवले, ढवळले गेले! मॅगझिन विकले जाण्यासाठीच अशा स्टोरीज

असतात असे म्हटले गेले तरी त्यात तथ्य होतेच की!

प्रमोद चक्रवर्ती हे कायमच मध्यममार्गी यशस्वी निर्माता-दिग्दर्शक म्हणून ओळखले गेले. अंधेरी कुर्ला रोडवरील नटराज स्टुडिओच्या पाच मालकांपैकी ते एक (त्यांचे भागीदार होते, रामानंद सागर, शक्ती सामंता, आत्माराम व एफ. सी. मेहरा!) काही वर्षांपूर्वीच हा स्टुडिओ पाडला जावून तेथे टोलेजंग इमारत उभी राहिलीय. मुंबईतील अनेक लहान मोठ्या चित्रपट स्टुडिओची हीच कथा झालीय). दिग्दर्शक प्रमोद चक्रवर्ती म्हणजे, प्रेक्षकांची दोन घटका करमणूक करायची व आपला चित्रपट सहकुटुंब सहपरिवार पाहणारा असावा याकडे त्यांचे कायमच विशेष लक्ष. त्या काळातील अनेक निर्माता व दिग्दर्शकांचे ते वैशिष्ट्य! प्रत्येक काळातील काही वैशिष्ट्य

असतातच. त्यांच्याच दिग्दर्शनातील 'नया जमाना', 'जुगनू', 'ड्रीम गर्ल' या चित्रपटातही धर्मेंद्र व हेमा हीच जोडी होती. त्यांच्याच 'बारुद' मध्ये हे दोघे पाहुणे कलाकार होते! त्या काळात चित्रपट रसिकांना नायक व नायिका अशी जोडी आवडे! सतत एकत्र काम केल्याने त्यांच्यातील रोमॅन्टीक दृश्य जास्त खुलत. राज कपूर व नर्गिस या जोडीपासूनची ही खासियत! सत्तरच्या दशकात राजेश खन्ना व शर्मिला टागोर, राजेश खन्ना व मुमताज, अमिताभ बच्चन व रेखा, जितेंद्र व रेखा, ऋषि कपूर व नीतू सिंग, विनोद मेहरा व मौशमी चटर्जी या सत्तरच्या दशकातील सुपरहिट रुपेरी जोड्या! धर्मेंद्र व हेमा मालिनी त्यात कुछ खास है अशीच. यांच्या गोडी गुलाबी नातेसंबंधांवर काही वाह्यात लिहिले म्हणून धर्मेंद्र बहुचर्चित

सिनेपत्रकार देवयानी चौबळ व कृष्णा यांच्यावर धावून गेल्याची बातमी गाजली. हे गॉसिप्स मॅगझिनमधून आपल्याबद्दल उगाच बढाचढाके लिहितात याचा राग धर्मेंद्रच्या मनात (की फौलादी हातात?) होताच. मुंबईत निघालेल्या दुष्काळ ग्रस्तांसाठीची मदत फेरीचा समारोप महालक्ष्मी येथील टर्फ क्लबवर संपत असतानाच गरम धरमची नजर देवयानी चौबळवर पडली आणि त्यात त्याचा राग उफाळून आला. या गोष्टीला पंचेचाळीस वर्षे होऊनदेखील त्याची चर्चा होतेय, मग त्याकाळात केवढे गाजले असेल याची कल्पना करा. तेव्हापेक्षा आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल-मिडियात वाह्यात गॉसिप्स असते त्याचे काय? 'शोले' च्या (१९७५) खणखणीत यशानंतर हिंदी चित्रपटातून हिंसा खूप वाढली. त्याचाच एक

भाग म्हणून काही चित्रपटातून दोन खलनायकही आले. तेवढाच नायक अधिकाधिक तुटून पडणार. ढिश्यूम ढिश्यूम ही तर भन्नाट करमणूक. 'आझाद'मध्ये अजित व प्रेम चोप्रा असे दोन खौफनाक खलनायक होते! दोघांची थटण्याची, बोलण्याची, ऐकण्याची, बघण्याची, चालण्याची शैली भिन्न. त्यानुसार चित्रपटात ॲक्शन वाढली. चक्कीदा (प्रमोद चक्रवर्ती यांचे चित्रपटसृष्टीतील नाव!). आपल्या नटराज स्टुडिओतच बरेचसे इनडोअर शूटिंग केले आणि गाणी व ॲक्शन यांचे बाह्यचित्रीकरण स्थळावर काम केले.

गुलशन नंदा यांच्या कादंबरीवर आधारीत या चित्रपटाची पटकथा सचिन भौमिक यांची तर संवाद एहसान रिझवी यांचे. चक्कीदांचे हुकमी कॅमेरामन व्ही. के. मूर्ती होते. कॅमेऱ्यातून

प्रेक्षकांपर्यंत चित्रपट पोहचवण्यात ते हुशार होते. गरीबी विरुद्ध श्रीमंत आणि नायिकेच्या संपत्तीवर खलनायकांचा डोळा हाच यातील फॉर्म्युला. त्यात नवीन काहीही नसते. जे असते ते मांडणीत. ते पटकथाकार व दिग्दर्शकाचे कसब व कौशल्य! प्रेक्षकांच्या माफक अपेक्षा असत. पिक्चरने टाईमपास करायला हवा, पैसा वसूल मनोरंजन हवे. पिक्चर हिट व्हायला आणखीन काहीही नकोच. इतर भूमिकांत केश्तो मुखर्जी (हुकमी रुपेरी दारुड्या), सुलोचना दीदी, विजू खोटे, जानकीदास इत्यादी! राहुल देव बर्मनच्या संगीतातील गाणी लोकप्रिय ठरली. 'जान की कसम..', 'राजू चल राजू..', 'मै लैला का मजनू..', 'मै हू तेरी प्रेम दीवानी..', 'कौन मिल गया..'.. ही यातील गाणी होत!

या चित्रपटाच्या मेन थिएटरची गोष्ट विशेषच उल्लेखनीय आहे. ती सांगायलाच हवी!

मिनर्व्हात 'शोले 'ने १५ ऑगस्ट १९७५ ते ३१ ऑगस्ट १९७८ असा सलग तीन वर्षांत रोज तीनही खेळ हाऊस फुल्ल असा खणखणीत प्रवास केला हे सर्वज्ञात आहेच! आज शोलेची पन्नास वर्षे साजरी केली जात असताना हा संदर्भ सतत चर्चेत आहे. ते यशच तसे घवघवीत खणखणीत आहे. आणि मग मिनर्व्हात १ सप्टेंबर १९७८ रोजी 'आझाद' प्रदर्शित झाला आणि त्यानेही तिथे रौप्य महोत्सव आठवड्याचे यश संपादले! 'शोले' आता मॅटीनीला म्हणजेच सकाळच्या खेळात शिफ्ट करण्यात आला व आणखीन दोन वर्षे त्याने प्रवास केला. 'शोले' एकूण पाच वर्षे मिनर्व्हात होता. शोले पुन्हा पुन्हा पाहण्यासाठी चित्रपट रसिक मिनर्व्हात जात

त्यांची तीच सवय 'आझाद'च्या पथ्यावर पडली की काय? 'आझाद' नंतर याच मिनर्व्हात धर्मेंद्र व हेमा यांची प्रमुख भूमिका असणारा उमेश मेहरा दिग्दर्शित 'अलिबाबा और चालीस चोर' प्रदर्शित झाला. 'आझाद' चे यश उल्लेखनीयच! धर्मेंद्र व हेमा मालिनी या जोडीने बप्पी सोनी दिग्दर्शित 'तुम हसी मै जवा', हरमेश मल्होत्रा दिग्दर्शित 'पत्थर और पायल', रामानंद सागर दिग्दर्शित 'चरस' व 'बगावत', जे. ओम प्रकाश दिग्दर्शित 'आसपास', बासू चटर्जी दिग्दर्शित 'दिल्लगी', चिन्नाप्पा देवर निर्मित 'माँ' इत्यादी चित्रपटात एकत्र भूमिका साकारत चित्रपट रसिकांचे भरपूर मनोरंजन केले. त्यात "आझाद" विशेष उल्लेखनीय!

© दिलीप ठाकूर
(महाराष्ट्र दिनमान-शनिवार लेख)
♥

## लेख क्र. ९

## "अभिमान"@५२ वर्षे
## 'तेरे मेरे मिलन की ये रैना..!'




सलिम जावेद यांची पटकथा व संवाद आणि प्रकाश मेहरा निर्मित व दिग्दर्शित "जंजीर" मुंबईत प्रदर्शित ११ मे १९७३) मधील अमिताभ बच्चनचे सूडनायकाचे ('अॅन्ग्री यंग मॅन!'चे) वादळ घोंघावतेय! प्रेक्षकांचा मूड बदलतोय आणि अशातच हृषिकेश मुखर्जी दिग्दर्शित "अभिमान" प्रदर्शित करायचा? बाप रे!

आपल्यापेक्षा आपल्या पत्नीला आपल्याच क्षेत्रात यश मिळतयं, मागणी वाढतेयं, ती वरचढ होतेय, ती स्टार झाली! यात पतीच्या पोटात दुखण्यासारखं काय आहे? त्याला इतकं असुरक्षित का वाटावे? पण वाटतं काहींना तसं! एकाद्या पतीचा अहंकार, "अभिमान" डिवचला जाऊ शकतो... कल्पना एक वास्तव असू शकते!

आजच्या गतिमान व स्पर्धात्मक युगात असे कार्पोरेट जगापासून मनोरंजन क्षेत्रापर्यंत आणि क्रीडा जगापासून राजकीय उलाढालीपर्यंत जर कुठे असेच घडत असेल तर तो आजच्या काळाचा महिमा आहे! आज काहीसं 'मी'पण भारी देवा अशी वृत्ती, प्रवृती, कृती वाढलीय! आणि काही जोडपी वेगळी आपापली राहतात, सुरक्षित अंतर ठेवतात, काही घटस्फोट घेऊन आपापलं आयुष्य

जगू लागतात. कोणी दुसरं लग्न करतात. त्यातही इगो प्रॉब्लेम आहेतच!

पन्नास पंचावन्न वर्षांपूर्वी असं एकाच क्षेत्रातील पती पत्नीतील नात्यात पत्नीच्या यशाने पतीचं कावरंबावरं होणे, तो निराश होणे हे तेव्हाच्या सामाजिक कौटुंबिक परंपरेत काहीसं धक्का देणारं होत! सुखाचा संसार म्हणजे पती पत्नीची सुख दुःखात घट्ट साथ आणि एकमेकांच्या यशात एकत्र असणे हीच आपली परंपरा, सभ्यता, मूल्य! सुखी संसाराचा तो मंत्र. अनेक जोडपी असे एकमेकांना घट्ट बिलगत जगली!

अशातच गायक सुबीरकुमार (अमिताभ बच्चन) आपल्या गावी गेला असता दूरवरुनही श्रवणीय वाटत असलेले उमाचे (जया भादुरी) सूर ऐकून प्रभावित होतो! दोघांची ओळख होते आणि

मग लग्न करुनच तो उमाला मुंबईत आणतो! उमा छान गातेय असे समजल्याने लग्नानिमित्तच्या पार्टीत तिला पाहुण्यांकडून गाण्याची विनंती होते. दोघेही गातात पण उमाच्या गायनाने सगळेच इम्प्रेस होतात आणि मग तिला गायनाचे लाईव्ह कार्यक्रम, ध्वनिमुद्रिका यांच्या ऑफर वाढत वाढत गेल्याने सुबीरकुमार अस्वस्थ होत जातो! आपली मागणी कमी होत चाललीय हे त्याला सहजी पचत नाही. दोघांत तणाव वाढत वाढत जातो....दोनों के रिश्ते मे दरार निर्माण होते. एक भावनिक पेच निर्माण होतो!

हृषिकेश मुखर्जी दिग्दर्शित 'अभिमान' (रिलीज २७ जुलै १९७३) ची ही थीम! मध्यवर्ती कथासूत्र! या चित्रपटाला तब्बल बावन्न वर्षे होत असतानादेखील हा चित्रपट कायमच 'आजचा

चित्रपट' म्हणून ओळखला जातोय याचं कारण एकाच क्षेत्रातील काही दाम्पत्यात असं घडत, कधी ते माणसाचा स्वभाव पाहता स्वाभाविकही मानले जाते. महत्वाचे आहे ते, हा चित्रपट क्लासिक म्हणून ओळखला जातोय!

ह्षिदांना ही गोष्ट सुचली कशी यावरुन भिन्न मतप्रवाह आहेत. १९३७ च्या 'अ स्टार इज बॉर्न' या इंग्लिश चित्रपटावर 'अभिमान' बेतल्याचे म्हटले जाते! विदेशी चित्रपटावर बेतलेले हिंदी, मराठी वा अन्य भारतीय प्रादेशिक भाषेतील चित्रपट हा एक वेगळाच रंजक व माहितीपूर्ण विषय! 'सबकुछ' किशोरकुमार व त्याची पहिली पत्नी उमादेवी यांच्यात याच पध्दतीचा तणाव निर्माण झाल्याने ते वेगळे झाले, त्यावरुन आपण कथा तयार केली असं ह्षिदा त्या काळातील काही पत्रकारांशी

बोलल्याचं म्हटलं जाते. पंडित रविशंकर आणि अन्नपूर्णा (लग्नापूर्वीच्या रोशन आरा) या पती पत्नीतील नात्यात असाच इगो प्रॉब्लेम झाला आणि त्यावर हा चित्रपट बेतल्याचे म्हटले जाते! काही असले तरी 'अभिमान' चित्रपटाला आपली स्वतःची ओळख आहे, आपलं एक व्यक्तिमत्व आहे! ते जास्त महत्वाचे. गंमत म्हणजे, अधूनमधून या चित्रपटाचा संदर्भ उपयोगी पडतो. काही वर्षांपूर्वी अभिषेक बच्चन व ऐश्वर्या हे एका इव्हेन्टसला गेले असता फोटोग्राफर्सनी अभिषेकला बाजूला उभा राहण्याचे सुचवत एकट्या ऐश्वर्याचे फोटो काढले तेव्हा वृत्तवाहिन्यांवर 'अभिमान' म्हणतच ही स्टोरी दिली. त्यात खरा संदर्भ अभिषेक बच्चन हा बच्चनपुत्र आहे असाही आहे!

हृषिकेश मुखर्जींनी गीत संगीताच्या

क्षेत्रातील हा 'अभिमान' असल्याने अगोदर या चित्रपटाचे नाव 'राग रागिणी ' ठेवले होते! तशी ट्रेड पेपर्समध्ये जाहिरातही प्रसिद्ध झाली. पण निर्मिती अवस्थेत चित्रपट असतानाच ते बदलून 'अभिमान' केले ते परफेक्ट आहे. याची गाणी आजही लोकप्रिय आहेतच. 'अब तो है तुमसे..' (लता मंगेशकर), 'लूटे कोई मन का नगर..' (लता मंगेशकर व मनहर उदास), 'मीत ना मिला रे मनका..' (किशोरकुमार), 'नदीया किनारे..' (लता मंगेशकर), 'पिया बिना..' (लता मंगेशकर), 'तेरे मेरे मिलन..' (लता मंगेशकर व किशोरकुमार ), 'तेरी बिंदीया रे..' (लता मंगेशकर व मोहम्मद रफी).... गाण्याचा मुखडा आठवला तरी 'अभिमान' आठवतो हे या चित्रपटाचे यशच! सगळीच गाणी सुमधूर व सरस! (मात्र गायक नटासाठी तीन

पार्श्वगायक का? हे समजले नाही!) ही गीते मजरुह सुल्तानपुरी यांची असून संगीत सचिन देव बर्मनचे आहे! कथा ह्रषिकेश मुखर्जी यांचीच असून पटकथा नबेन्दू घोष, ब्रजेश चटर्जी आणि मोहिनी सिप्पी यांची आहे! तर संवाद राजेन्द्रसिंग बेदी यांचे आहेत. छायाचित्रण जयवंत पाठारे यांचे तर संकलन दास दायमाडे यांचे आहे. या चित्रपटात अमिताभ बच्चन, जया भादुरी, दुर्गा खोटे, असरानी आणि बिंदू यांच्या प्रमुख भूमिका आहेत. तसेच, डेव्हिड, ए. के. हनगल, राजू श्रेष्ठ इत्यादींच्याही भूमिका आहेत. मुंबईत या चित्रपटाचे मेन थिएटर 'लिबर्टी' हे होते. शंभर दिवसाचे यश प्राप्त केले! ठसा मात्र कायमचा उठवला!

'गुड्डी' पासूनच जया भादुरीवर ह्रषिदांचा विश्वास आणि माया. त्यात सुरुवातीला अमिताभच

होता. पण त्याच वेळेस ह्रषिदांना 'आनंद' मधील डॉक्टरच्या भूमिकेसाठी अमिताभ फिट्ट वाटला म्हणून 'गुड्डी'त 'समित भांजा' आला! अमिताभ व जया बी. आर. इशारा दिग्दर्शित 'एक नजर', प्रकाश वर्मा दिग्दर्शित 'बन्सी बिरजू' या चित्रपटात एकत्र काम करता करता अधिकच जवळ आले! त्यांच्यात प्रेमाचे नाते विणले जात असतानाच प्रकाश मेहरा दिग्दर्शित 'जंजीर' आणि ह्रषिकेश मुखर्जींच्या 'अभिमान' मध्ये पुन्हा एकत्र आले. हे घडलं आणि 'जंजीर' पडद्यावर आला! तो रिलीज झाल्यावर अमिताभ, जया आणि त्यांचे मित्र लंडनला फिरायला जाणार होते पण हरिवंशराय बच्चन यांनी सुचवले, लग्न करुनच जा! बरं दिसेल! तसं करायला मुहूर्त सापडला तो 'अभिमान'चे शूटिंग संपल्यावर ३ जून १९७३ रोजी! (मराठी

वृत्तपत्रात तेव्हा या लग्नाची बातमी देताना हा शूटिंग संपल्याचा उल्लेख होता!) आता 'अभिमान' प्रदर्शित होताना अमिताभ जयाचा लग्नानंतरचा पहिला चित्रपट ठरला! अशातच अमिताभला वाटलं, 'जंजीर' ने आपली ॲन्ग्री यंग मॅन इमेज झालीय तर 'अभिमान' मध्ये इतकी गाणी कशाला? त्याने चित्रपटाचा ओघ मंदावतो! एक दोन कमी करुयात. पण हृषिदा व एस. डी. बर्मन यांना हे अजिबात मान्य नव्हते. खरं तर श्रवणीय गाण्यांनीच चित्रपट फोकसमध्ये राहिला आणि थीमवर यशस्वी ठरला. लोकप्रिय गीत संगीत एका पिढीतील चित्रपट पुढील अनेक पिढ्यांत नेत असतातच. चित्रपट हा एक प्रवाही विषय आहे! या 'अभिमान' ची निर्मिती होती, अमिया फिल्म! अमिताभमधला 'अमि' आणि जया भादुरीतील 'या'

असं मिळून 'अमिया' झालं. पण निर्माते म्हणून नावे होती.. पवनकुमार व सुशीला कामत!

पती पत्नीतील नात्यात काही इगो प्रॉब्लेम झालाच तर अनेकांना 'अभिमान' पटकन आठवतो, यात या चित्रपटाचे मोठेच यश! आजच्या काळात तर घटस्फोटाचे वाढते प्रमाण पाहता 'अभिमान' चा सिक्वेल यायला हरकत नाही असे वाटते.... त्यात अभिमान असेल की दुराभिमान? की अभिनयातून उदभवलेले विवाहबाह्य संबंधाची गोष्ट जन्माला येणार? पन्नास पंचावन्न वर्षांत सामाजिक सांस्कृतिक स्थितीत केवढा तरी बदल (की घसरण?) झाली आहे. मात्र अमिताभ- जया हे मात्र आदर्श दाम्पत्य म्हणून आजही ओळखले जातेय. तीच आपली भारतीय परंपरा! सभ्यता, सुसंस्कृतपणा आहे!

आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल पिढीने ओटीटीवर "अभिमान" नक्कीच पहावा! आशययुक्त स्वच्छ मनोरंजक चित्रपट म्हणून ते हा चित्रपट एन्जॉय करु शकतात! (मी मात्र इथे तुमच्यासाठी "अभिमान" ची "यू ट्यूब"वर उपलब्ध असलेली मस्त "एच. डी. फिल्म" ची लिंक देतोय. त्यावर "क्लिक" करा.. आणि थेट तुमच्या "स्मार्ट टीव्हीवर" नक्की पहा!)

© दिलीप ठाकूर
(महाराष्ट्र दिनमान-शनिवार लेख)
♥




♥

## <u>लेख क्र. १०</u>

# रजनीगंधा @ ५१ वर्षे
# स्वच्छ कलाकृती, कितीदाही पहावा!




**सत्तरच्या दशकातील एक विशेष गोष्ट!**

**एकिकडे अमिताभ बच्चनचा सूडनायक ('अॅन्ग्री यंग मॅन!') विलक्षण जोरात होता! चित्रपटगृहावर अनेक आठवडे हाऊसफुल्लचा फलक कायम असे. मल्टी स्टार कास्ट चित्रपटाचे युग होते. रमेश सिप्पी दिग्दर्शित "शोले"ने मिनर्व्हात हाऊसफुल्ल मुक्काम ठोकलेला!**

दुसरीकडे दिग्दर्शक मृणाल सेन, श्याम बेनेगल, रवींद्र धर्मराज यांच्या समांतर चित्रपटाची वाटचाल! समांतर चित्रपटाची 'बीजे' याच काळात रुजत होती! हा नवप्रवाहातील चित्रपट जगभरातील अनेक आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात दाखल होत होता! या दोन्हीच्या मध्ये आणखीन एक स्वच्छ मनोरंजक चित्रपट होता. याला मध्यममार्गी चित्रपट असेही म्हणत. आणि विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे या चित्रपटाचाही आपला एक स्वतंत्र प्रेक्षकवर्ग निर्माण झाला होता!

तसे ते दिवस खूपच वेगळे होते!... चित्रपटावर भरभरुन बोलले, लिहिले, ऐकले नि वाचले जात होते! पडद्यावरच्या चित्रपटाला, त्यातील गोष्टीला, रसिकांच्या आवडीनिवडीला, संवेदनशीलला होती! चित्रपटातील गोष्ट ही

आकर्षणच्या केंद्रस्थानी होती! विशेषत: मराठी चित्रपट उत्तम आशयासाठी ओळखला जात असे! हिंदी चित्रपटातही अनेक चांगल्या गोष्टी पाह्यला मिळत.

प्रमोशन, मार्केटिंग, निर्मितीचे भले मोठे खरे खोटे वा वाढवलेले फुगवलेले आकडे, चित्रपट यशाचे तसेच अवाढव्य बेगडी आकडे! (पण मुव्हीज पाह्यला फार कोणी नाही, असल्यास मोजकेच प्रेक्षक असा अनुभव! ) असे युग येण्यापूर्वीच ते छान दिवस होते! आगाऊ तिकीट विक्रीलाही त्या काळात बरीच मोठी रांग लागे! सोशल मिडियात शोलेच्या आगाऊ तिकीट विक्रीसाठीची लांबलचक रांग पहा! अथवा चंद्रा बारोट दिग्दर्शित 'डॉन'साठीची न्यू एक्सलसियर थिएटरवरची अशीच केवढी तरी लांबलचक रांग पहा. ते आश्चर्य

नाही. ती वस्तुस्थिती आहे. त्या काळात चित्रपट रसिकांच्या आवडीनिवडीवर यशस्वी ठरत असे. (प्रमोशनच्या बातम्यांवर नव्हे.) आणि जगभरातील चित्रपटाचे यशापयश रसिकांच्या आवडी निवडीवर अवलंबून असते!

रसिकांच्या संवेदनशीलतेचा, प्रेमाचा आदर ठेवला जात असे आणि त्यातील एक तजेलदार चित्रपट असे, "रजनीगंधा"! चित्रपटाचे नाव ऐकताच रसिकांच्या किमान तीन पिढ्या एव्हाना 'रजनीगंधा फुल तुम्हारे.' या गाण्यात हरखून गेल्या असतील. दर्जेदार चित्रपटाचे हेही एक वैशिष्ट्य!

हा चित्रपट मुंबईत १३ सप्टेंबर १९७४ रोजी प्रदर्शित झाला! (त्याला एकावन्न वर्षे पूर्ण झालीदेखील! तरीदेखील हा चित्रपट आजही ताजा टवटवीत आहे. असे भाग्य आजच्या ग्लोबयुगातील

डिजिटल पिढीतील चित्रपटाला मिळेल?)

राजश्री वितरण हे त्याचे वितरक. राजश्री प्रॉडक्शन्सचेच हे भावंड! देशभरातील अनेक शहरांत त्यांची वितरक व्यवस्था. ती खूप महत्वाची. खुद्द राजश्री प्रॉडक्शन्सचे चित्रपट म्हणूनच तळागाळातील प्रेक्षकांपर्यंत पोहचले. त्यातील जे आवडले, त्यांनी ज्युबिली हिट यश संपादले. (पण आश्चर्य वाटेल बराच काळ या "रजनीगंधा" चित्रपटाला कोणी वितरकच मिळत नव्हता!) तेव्हा हिंदी चित्रपटसृष्टीत एक स्वच्छ मनोरंजक चित्रपट (क्वालिटी चित्रपट) असे युग येईल अशी कोणी कल्पना केली नव्हती. तत्पूर्वी आणि त्यानंतरही स्वच्छ मनोरंजक चित्रपट पडद्यावर आले. पण सुरेश जिंदाल निर्मित "रजनीगंधा" प्रदर्शित व्हायचे दिवस काही वेगळे होते. राजेंद्रसिंग बेदी दिग्दर्शित

"दस्तक", बी. आर. इशारा दिग्दर्शित "चेतना" (धाडसी कथानक आणि तशा थीमनुसार दृश्य झालंच, पण पोस्टरवरही "ए" मोठा!), प्रकाश मेहरा दिग्दर्शित "जंजीर" ( सूडनायक) , नासीर हुसेन दिग्दर्शित "यादों की बारात" (सूडकथा) अशा चित्रपटांच्या यशाने हिंदी चित्रपट कूस बदलत होता. त्यात भरच पडत होती! मृणाल सेन दिग्दर्शित "भुवन शोम"ने हिंदीत समांतर चित्रपटाची बीजे रुजवली आणि श्याम बेनेगल दिग्दर्शित "अंकूर" ने ती वाढवली, यात आणखीन एका प्रवाहाने आपली एक वाट निर्माण केली, स्वच्छ मनोरंजक चित्रपट. जो क्लिष्ट नसेल आणि सवंगही नसेल, याचा मध्यममार्ग म्हणजेच स्वच्छ चित्रपट. मल्टीप्लेक्स युगात अशा चित्रपटांची गरज आहे. याचं कारण आज अनेक थीमनुसार चित्रपट

**निर्माण होताहेत. नवीन पिढीतील पटकथाकार व दिग्दर्शकांना काही वेगळे पडद्यावर आणायचे आहे. ते जगभरातील अनेक देशांतील अनेक भाषेतील चित्रपट पाहताहेत. ते हिंदीत काही वेगळे दाखवू पाहताहेत. कमी वा आटोपशीर बजेटमध्ये हे चित्रपट बनतात.**

**बासू चटर्जी त्याचे एक प्रकारचे फाऊंडर मेंबर! "रजनीगंधा" मुंबईत आकाशवाणी चित्रपटगृह (चर्चगेट, मंत्रालय परिसरात) होते. ऐंशीच्या दशकात ते बंद झाले. अगदी छान चित्रपटगृह होते! मागील पिढीतील चित्रपट रसिकांना ते आठवत असेलच!, जेमिनी (वांद्रा) आणि मायनॉर (अंधेरी). तेही बंद! अंबर, ऑस्कर व मायनॉर अशी तिळी चित्रपटगृह होती, त्याजागी शॉपर्स-स्टॉप आले आहे. सोशल मिडियात या**

चित्रपटगृहाचा फोटो पाह्यला मिळतोय तेवढीच आठवत काढायला संधी! अशा मोजून तीन चित्रपटगृहात प्रदर्शित झाला आणि तीनही ठिकाणी पंचवीस आठवड्यांचा मुक्काम केला. मुंबईत रौप्य महोत्सवी आठवडा सुरु होताच अहमदाबाद येथील नटराज चित्रपटगृहात हा चित्रपट प्रदर्शित झाला. त्या काळात असेच टप्प्याटप्प्याने चित्रपट प्रदर्शित होताना त्याची महती आणि माहिती मुद्रित माध्यमातून आणि रेडिओ, लाऊड-स्पीकरवरील गाण्यातून दूरवर पोहचत असे. म्हणून चित्रपटात गीत संगीत व नृत्य अतिशय उत्तम हवे. ते लोकप्रिय व्हायला हवे. गाण्यांनी एका पिढीतील चित्रपट पुढील अनेक पिढीत जात असतात. रजनीगंधा चित्रपटाचे ते एक वैशिष्ट्य! ‘रजनीगंधा’ ची गोष्ट अमोल पालेकर,

विद्या सिन्हा, दिनेश ठाकूर या तिघांभोवतीची! तीन प्रमुख व्यक्तिरेखांभोवती! बासूदांनी सुरुवातीस या चित्रपटासाठी शशी कपूर, शर्मिला टागोर व अमिताभ बच्चन यांच्या नावाचा विचार केला होता अशी चर्चा आजही सुरु आहे (अमिताभचा हा सुरुवातीचा काळ होता. तो चाचपडत होता. एकेक चित्रपट त्याला महत्वाचा होता.), पण ते शक्य न झाल्याने समित भांजा व अपर्णा सेन यांच्या नावाचा विचार केला. अशातच मुंबईत एका भेटीत त्यांनी अमोल पालेकरना मनू भंडारी यांचे १९६० साली प्रकाशित झालेले "यही सच है" हे पुस्तक वाचावयास दिले. अमोल पालेकरनी एकाच बैठकीत हे पुस्तक वाचले आणि बासूदांना या चित्रपटांसाठी होकार दिला! आणि अमोल पालेकरनी मराठीतून हिंदी चित्रपटसृष्टीत पाऊल

टाकले. (त्या काळात अमोल पालेकर आमच्या गिरगावातील गावदेवीत राह्यचा. आजही अमोल पालेकर गावदेवी, गिरगाव विसरलेला नाही. आज तो पुण्यात राहतो. नुकताच अमेरिकेतील मराठी चित्रपट महोत्सवाला जावून आला!)

"रजनीगंधा" नावावरुनच नायिकाप्रधान. साठ व सत्तरच्या दशकात नायिकाप्रधान चित्रपट बरेच निर्माण होत. 'बंदिनी', 'सुजाता', 'ममता', 'मेमदीदी', 'अनुपमा' वगैरे अनेक! या सिनेमाचे संवादलेखन आणि दिग्दर्शन बासू चटर्जी यांचे. कथा साधारण अशी.. दीपा कपूर (विद्या सिन्हा) आणि संजय (अमोल पालेकर) या दोघांची ओळख आणि मग त्याचे हळूहळू रुपांतर प्रेमकथा व मग त्या नात्याचा लग्नापर्यंत पोहचण्याचा हा प्रवास आहे. दीपा संजयच्या मागे लग्न करूया म्हणून

लागलीय आणि संजय नोकरीत स्थिरसावर झाल्यावर, प्रमोशन झाल्यावर लग्न करूयात या मताचा अर्थात मध्यमवर्गीय मानसिकतेचा. दररोज सायंकाळी भेटत राहणे हा त्यांचा उपक्रम. लहान मोठ्या खेळकर, खोडकर गोष्टींतून चित्रपट रंगतो. गोष्ट आकार घेते. अशातच दीपा मुंबईमध्ये प्राध्यापक पदाच्या नोकरीसाठी अर्ज करते आणि तिला मुलाखतीसाठी संधी मिळते. संजयही या गोष्टीवर खुश होतो आणि तुला मुंबईत नोकरी मिळाली तर मी बदली करून मीही येतो असे सांगतो. संजय दीपाला सोडायला नेहेमीप्रमाणे "रजनीगंधा"ची फुले घेऊन रेल्वेस्टेशन वर येतो. हा खास दिग्दर्शक टच! मुंबईत पोहचल्यावर तिला रिसिव्ह करायला येतो तो नेमका तिचा भूतपूर्व प्रेमी नवीन (दिनेश ठाकूर)! दीपाच्या मैत्रिणीने इराने

(रजनी ठाकूर) त्याला तिथे पाठवल असत. नवीन तिला तिच्या मैत्रिणीच्या घरी सोडतो, एवढंच नाही तर अतिशय मैत्रीत तिला तिथे कॉफीही करुन देतो. दीपा यामुळे अवघडलेली असते. तिला वाटू लागते, नवीन किती बदलल्यासारखा वाटतोय. तरीही तो असा अनपेक्षित आलेला नि भेटलेला तिला आवडत नसते. तिला ते खटकते! कधी काळी एकमेकांवर जीवापाड प्रेम करणारे हे युगुल नवीनच्या हेकेखोर स्वभावामुळेच दुरावलेले असते. ही या गोष्टीची दुसरी बाजू! नातेसंबंधाची ही हळुवार गोष्ट. बासूदा ती अनेक छोट्या गोष्टींसह खुलवतात. प्रियकर आणि अचानक भेटलेला पूर्वायुष्यातील प्रियकर, आणि प्रेयसीची झालेली घुसमट हे रंगलेय. अशा प्रकारचे नायिकेचे व्यक्तिमत्व हे त्या काळात हिंदी चित्रपटात काहीसे

नवीन होते. योगेशच्या गीतांना सलिल चौधरी यांचे संगीत याने चित्रपटाच्या तरलतेत भर घातलीय. "रजनीगंधा फूल तुम्हारे.." (लता मंगेशकर) , "कई बार यूंही.." (मुकेश) दोन्ही गाणी क्लासिक! "कई बार यूंही.." गाण्यात एकावन्न वर्षांपूर्वीच्या मुंबईचे दर्शन घडते. चित्रपटातील जुनी मुंबई हाही एक अभ्यासाचा विषय. "चित्रपटातून बदलते मुंबई दर्शन". एक दीर्घकालीन प्रवास! अमोल पालेकर यांची भूमिका असलेले पहिले तीन चित्रपट दिग्दर्शक बासू चटर्जी यांचे आणि तीनही रौप्य महोत्सवी हिट. "रजनीगंधा", "छोटी सी बात" (मुंबईत मेन थिएटर "अप्सरा" मॅटीनी शो) आणि चितचोर (अंधेरीतील ऑस्कर चित्रपटगृहात रौप्य महोत्सवी) हे ते चित्रपट! आणि स्वच्छ मनोरंजक चित्रपट रुजण्यात ते पूरक ठरले. त्यात गुलजार

दिग्दर्शित "आंधी", "खुशबू", "किनारा", "मौसम", "किताब", हृषिकेश मुखर्जी दिग्दर्शित "अभिमान", "नमक हराम", "गोलमाल", "नरम गरम", "मिली", "बेमिसाल", "जुर्माना" बासू भट्टाचार्य दिग्दर्शित "आविष्कार" व "गृहप्रवेश", रजत रक्षित दिग्दर्शित "दामाद", बी. आर. चोप्रा दिग्दर्शित "पती पत्नी और वो", "कर्म" अशा आणखीन अर्थपूर्ण चित्रपटांची भर पडली! रजनीगंधाची कालांतराने म्हणजेच २०१२ साली बंगालीत "होथन शेडिंग" या नावाने रिमेक आली. या चित्रपटाची फारशी चर्चा मात्र झाली नाही. आज मल्टीप्लेक्समध्ये अनेक जुने चित्रपट पुन्हा प्रदर्शित होत असतानाच "रजनीगंधा" पुन्हा दरवळावा असे मनापासून वाटणे स्वाभाविक! काही चित्रपट कधीच जुने होत नाहीत, पडद्याआड जात नाहीत,

ते कायमच ताजे नि आजचे राहतात. "रजनीगंधा" अगदी तसाच! कालचा आणि आजचाही! इतकेच नव्हे तर उद्याचाही...! आज मल्टीप्लेक्समध्ये अनेक जुने चित्रपट पुन्हा ओटीटीवर उपलब्ध असेल तर आवर्जून पहा! (मी तुमच्यासाठी उपरोल्लेखित सर्व चित्रपटांच्या "लिंक्स" दिल्या आहेत. त्यावर "क्लिक" करा.. आणि थेट तुमच्या "स्मार्ट टीव्हीवर" नक्की पहा!) एका मल्टीप्लेक्स ग्रुपने रोज बारा वाजताचा खेळ मॅटीनी शो म्हणून दाखवताना असे जुने चित्रपट प्रदर्शित करण्याची आखलेली योजना प्रत्यक्षात अंमलात आली तर त्यात "रजनीगंधा" नक्कीच असेल...

© दिलीप ठाकूर
(महाराष्ट्र दिनमान-शनिवार लेख)
♥

## लेख क्र. ११

# खास महिला दिनानिमित्त
# मदर इंडिया... सर्वोत्कृष्ट नायिकाप्रधान चित्रपट!




मराठी असो, हिंदी असो अथवा अन्य प्रादेशिक भाषेतील चित्रपट असो, नायिकाप्रधान चित्रपटाचे आपले एक वैशिष्ट्यपूर्ण अस्तित्व, महत्व, वाटचाल आहे. नायिकाप्रधान चित्रपट अनेक गोष्टी आपल्यासमोर घेऊन आले आहेत, येत आहेत. काळासोबत त्यात काही बदल झाले इतकेच! हिंदी चित्रपटसृष्टीतील बहुचर्चित

नायिकाप्रधान चित्रपट सांगायचे तर, आठवण सांगायची तर वर्मा फिल्म्सचा "औरत" (१९५३), नंतर.. मेहबूब खान दिग्दर्शित "मदर इंडिया", बिमल रॉय दिग्दर्शित "बंदिनी" व "सुजाता", बी. आर. चोप्रा दिग्दर्शित "साधना" आणि "तवायफ", शक्ती सामंता दिग्दर्शित "आराधना", कमाल अमरोही दिग्दर्शित "पाकिजा" आणि "रझिया सुल्तान", समीर गांगुली दिग्दर्शित "शर्मिली", असित सेन दिग्दर्शित "खामोशी", राज कपूर दिग्दर्शित "बॉबी" आणि "राम तेरी गंगा मैली", गुलजार दिग्दर्शित "आंधी", ह्रषिकेश मुखर्जी दिग्दर्शित "गुड्डी", "मिली" व "खुबसुरत", रघुनाथ झालानी दिग्दर्शित "अनामिका", अनिल गांगुली दिग्दर्शित "तपस्या", मुजफ्फर अली दिग्दर्शित "उमराव जान", महेश भट्ट दिग्दर्शित "अर्थ", यश

चोप्रा दिग्दर्शित "चांदनी", रणधीर कपूर दिग्दर्शित "हीना", प्रकाश झा दिग्दर्शित "मृत्युदंड", मधुर भांडारकर दिग्दर्शित "चांदनी बार", "कार्पोरेट", "फॅशन", विशाल भारद्वाज दिग्दर्शित "सात खून माफ", मोहनजी प्रसाद यांची "औरत तेरी यहीं कहानी", मेघना गुलजार दिग्दर्शित "छपाक", सुजॉय घोष दिग्दर्शित "कहानी", प्रदीप सरकार दिग्दर्शित "परिणिता", गौरी शिंदे दिग्दर्शित "इंग्लिश विंग्लीश" असे अनेक सांगता येतील!

यातील "मदर इंडिया" हा चित्रपट सर्वकालीन लोकप्रिय आहे. समाजाच्या खालच्या माणसापर्यंत हा चित्रपट पोहचला!

मेहबूब खान दिग्दर्शित 'मदर इंडिया' (सेन्सॉर संमत १४ फेब्रुवारी १९५७, रिलीज २५ ऑक्टोबर १९५७!) त्या काळात टप्प्याटप्प्याने विविध

शहरांतून चित्रपट प्रदर्शित होत जाई!) अशीच एक महान कलाकृती आहे. बहुचर्चित असा नायिकाप्रधान चित्रपट!

आज हाच चित्रपट पाहताना 'राधाचा (नर्गिस) स्वाभिमान आणि बंडखोरी यांची प्रभावी कथा' असा हा चित्रपट दिसतो! पण जेव्हा तो अडुसष्ट वर्षांपूर्वी पडद्यावर आला तेव्हा सोशिक राधा या व्यक्तिरेखेला प्रेक्षकांची विलक्षण सहानुभूती होती. पडद्यावरील त्या व्यक्तीरेखेशी प्रेक्षक जोडला गेला! राधाच्या आयुष्यातील सततची संकटे, आव्हाने, अडचणी यांना तिने धैर्यानं लढा देऊनही तिची न संपणारी व्यथा आणि अखेर आपला एक मुलगा बिरजू (सुनील दत्त) याच्या विरोधात शस्त्र हाती घेतलेली आई अशा दृष्टीकोनातून याकडे पाहिले गेले! याचे कारण

म्हणजे, तेव्हाचे समाजमन/समाजभान तसे होते. नायिकेला जेवढी अधिकाधिक सहानुभूती तेवढं चित्रपटाचे यश जास्त अशी तेव्हा पटकथा लेखक, दिग्दर्शक आणि निर्माता यांचे व्यावसायिक धोरण असे! पण तेवढे आणि तसे म्हणजेच हा चित्रपट नाही! ही कलाकृती अशा बेरजेच्या गणिता पलिकडे गेली आणि हिंदी चित्रपटाच्या तर झालेच पण अगदी एकूणच भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासातील एक सर्वोत्तम चित्रपट म्हणून 'मदर इंडिया'ने स्थान मिळवले! ऑस्करसाठीची भारताची अधिकृत प्रवेशिका म्हणून 'मदर इंडिया'ची निवड तर झालीच पण विदेशी चित्रपट विभागात या चित्रपटाने नामांकनही प्राप्त केले! अगदी काही मोजक्या गुणांनी ऑस्कर हुकले अन्यथा आपल्या देशातही उत्तम कलाकृती निर्माण

होतात हे जगाला समजले असते. चित्रपटसृष्टीची वाटचाल काहीशी बदलली गेलीही असती. तशी क्षमता व गुणवत्ता आपल्या देशातील चित्रपट क्षेत्रात नक्कीच होती. त्यानंतर त्याचे अर्थकारण महत्वाचे झाल्यावर समीकरणे बदलत गेली.

दिग्दर्शक मेहबूब खान यांनी आपल्याच 'औरत' या चित्रपटाची रिमेक म्हणून 'मदर इंडिया' साकारला. रिमेक ही अत्यावश्यक गोष्ट आहेच! 'मदर इंडिया' हे नाव त्यांना 'कॅथेरिन मायो' यांच्या याच नावाच्या १९२७ च्या पुस्तकांवरुन सुचले. या दोन्ही चित्रपटाच्या वेळची आपल्या देशातील ग्रामीण भागातील गरीबी, दारिद्र्य, जातीयवाद, सावकाराची दादागिरी आणि या सगळ्यामुळे वाटेला आलेले हलाखीचे आयुष्य दुर्दैवाने हे एक खूप मोठे 'वास्तव' होते. (आपल्याकडील मुख्य

प्रवाहातील चित्रपटातील या 'वास्तवा"वर त्या दृष्टिकोनातून 'फोकस' टाकला न जाणे आश्चर्याचे!) 'औरत' मध्ये राधा (सरदार अख्तर), तिचा पती शम्बू (अरुणकुमार अहुजा), एक वाह्यात मुलगा बिरजू (याकूब), दुसरा सरळमार्गी मुलगा रामू (सुरेन्द्र) आणि जमिनदार सुखी (कन्हय्यालाल) अशा व्यक्तिरेखा (आणि कलाकार) होते! यातील कन्हय्यालाल 'मदर इंडिया'मध्ये त्याच व्यक्तिरेखेत आहे. आणि नावही 'सुखीलाल लाला' हेच आहे. तसाच आर्थिक पिळवणूक करणारा, उधारीचे पैसे वसूल करण्यासाठी झपाटलेला आणि स्त्री लंपट आहे! हीच थीम 'मदर इंडिया'त अतिशय दाहकपणे परिणामकारकपणे आपल्यासमोर येते. आणि आपण अस्वस्थ होतो. राधा आपल्या पती शंभूच्या (राजकुमार) निधनानंतर अतिशय कष्टाने,

प्रसंगी शेतात खूप हिकमतीने नांगर चालवून घाम गाळून चांगले पीक काढून जमिनदाराचे कर्ज फेडण्याचा प्रयत्न करते! पण जमिनदाराची तिच्यावर पडलेली बुरी नजर तिला सहन होणे शक्यच नव्हते! मुले मोठी होतात, एक मुलगा बिरजू (सुनील दत्त) प्रतिकूल परिस्थितीने डाकू बनतो, आपल्या आईवरच्या अत्याचाराचा विलक्षण संताप त्यांच्या मनात आहे! दुसरा सरळमार्गी मुलगा रामू (राजेन्द्रकुमार)चे गावातील मुलगी चम्पा (कुमकुम) हिच्यावर प्रेम जमते. क्लायमॅक्सला राधाच आपला मुलगा बिरजूवर खरं तर त्याच्या बिघडलेल्या प्रवृत्तीवर गोळी घालते आणि त्यात त्याचा मृत्यू होतो! त्या काळात चित्रपटाचा असा शेवट हे विलक्षण धक्कादायक होते आणि अशी आई हे सूत्र करणारे होते.

चित्रपटाच्या इतिहासात असे काही अनपेक्षितपणे दाखवलेले चित्रपट रसिकांना आवडलेत. पण ते करताना प्रेक्षकांचा पूर्ण विश्वास बसेल, ते जोडले जातील अशी पटकथा हवी. या चित्रपटाची पटकथा मेहबूब खान, वजाहत मिर्झा आणि अली रझा यांची आहे. राधाच्या व्यक्तिरेखेभोवती संपूर्ण चित्रपट आकार घेत जातानाच तिला सहानुभूती लाभेल असा घटनाक्रम आहे. राधाचा जीवनसंघर्ष प्रतिकूल परिस्थितीतून आला आहे. या चित्रपटाच्या आगीच्या दृश्याच्या शूटिंगच्या वेळी सेटवर खरोखरच आग लागली आणि त्यात दुर्दैवाने सापडलेल्या नर्गिसजीना सुनील दत्तने वाचवले आणि त्या घटनेनंतर त्यानी लग्न केले!

खरं तर दिलीपकुमार शंभू अथवा बिरजू यापैकी एका भूमिकेसाठी इच्छुक होता. पण

आपला 'अनोखा प्यार' (१९४८), 'मेला' ( १९४८), 'अंदाज' (१९४९), 'बाबुल' (१९५०), 'जोगन' (१९५०), 'दीदार' (१९५०), 'हलचल' (१९५०) चित्रपटातील नायक, या चित्रपटात पुत्र म्हणून प्रेक्षक स्वीकारणार नाहीत असे नर्गिसजींचे मत ठरले! ते योग्यही असेल! नर्गिसजींच्या आयुष्यातील तर झालेच पण अगदी एकूणच भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासातील ही एक सर्वोत्तम भूमिका आणि त्यासाठीचा अभिनय आहे! या चित्रपटात मुकरी, सितारादेवी वगैरे वगैरे बरेच लहान मोठे कलाकार आहेत! या चित्रपटाचे छायाचित्रण फरेदून ए. इराणी यांचे आहे तर संकलन शमसुद्दीन कादरा यांचे आहे. चित्रपटाचे इनडोअर शूटिंग वांद्र्याच्या मेहबूब स्टुडिओत झाले तर आऊटडोअर्स शूटिंग महाराष्ट्र, गुजरात आणि

उत्तर प्रदेशातील ग्रामीण भागात झाले. चित्रपटाची थीमच ग्रामीण भागातील आहे. आणि हा चित्रपटही देशाच्या खेड्यापाड्यातील तेव्हाच्या सिंगल स्क्रीन थिएटर्स, तंबू थिएटर आणि टूरिंग-टॉकीजमध्ये पोहचला. त्या काळात वाहतुकीची फारशी साधने नव्हती, प्रसार माध्यमात वृत्तपत्र आणि रेडिओ होता. संपर्काची साधने नव्हती, पण एक क्लासिक कलाकृती अशाही अडथळ्यांवर मात करण्यात यशस्वी ठरली. सत्तरच्या दशकात अतिशय मोठ्याच प्रमाणावर 'मदर इंडिया' रिपीट रनला प्रदर्शित होत असे! आणि आता मागची व पुढची पिढी हा चित्रपट एकत्र पाहत असे! मागील पिढीतील चित्रपट रसिक त्यामुळे आठवणीत जात. माझे ते महाविद्यालयीन वय होते. मी दूरदर्शनवर एका रविवारी संध्याकाळी 'मदर इंडिया' पाहून

भारावून गेलो! (हल्लीच 'यू-टयूब'वर पाहिला!)

दर्जेदार लोकप्रिय गीत संगीत व नृत्य त्या काळातील चित्रपटाचे मोठेच वैशिष्ट्य! या चित्रपटाची गीते शकील बदायुनी यांची असून संगीत नौशाद यांचे आहे. 'नगरी नगरी व्दारे व्दारे..' (लता मंगेशकर), 'दुनिया मे हम आये है तो..' (लता मंगेशकर, मीना मंगेशकर आणि उषा मंगेशकर), 'मतवाला जिया डोले पिया..' (लता मंगेशकर आणि मोहम्मद रफी), 'दु:ख भरे दिन बीते रे..' (मोहम्मद रफी, मन्ना डे आणि आशा भोसले), 'होली आयी रे..' (शमशाद बेगम), 'घुंघट नही खोलूंगी सैया..' (लता मंगेशकर), 'ना मै भगवान हू..' (मोहम्मद रफी), 'ओ गाडीवाले गाडी धीरे हाक रे..' (शमशाद बेगम आणि मोहम्मद रफी), 'ओ जानेवाले जावो ना..' (लता मंगेशकर), 'ओ मेरे लाल आजा..' (लता

मंगेशकर).... त्या काळात एकाच चित्रपटात दहा बारा गाणी असणे स्वाभाविक होते! आणि सर्वच गाणी हिट! दिग्दर्शक मेहबूब खान यांची दिग्दर्शनीय वाटचाल खूप मोठी आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे! काही नावे सांगायची तर, 'रोटी' (१९४२), 'तकदीर' (१९४३), 'अनमोल घडी' (१९४६), 'अंदाज' (१९४९) ची सांगायला हवीतच!

'मदर इंडिया' तेव्हा फर्स्ट रनला पाहिलेल्या चित्रपट रसिकांतील आज अनेकांनी वयाची पंचाहत्तरी/ऐंशी पार केली आहे! ऐशीच्या दशकात त्याची एका दिवसाचे दहा रुपये भाडे अशी व्हिडिओ कॅसेट घेऊन पुन्हा पुन्हा पाहिला! हे मी का सांगतो? जुने अनेक दर्जेदार चित्रपट पुढील पिढीत विविध माध्यमातून पोहचत असतात. पूर्वी वृत्तपत्र, इतर नियतकालिकांमध्ये अशा जुन्या

चित्रपटावर फोकस टाकणारी सदरे असत, ती पुढील पिढीत हे चित्रपट नेत! आजच्या चॅनेलीय आणि डिजिटल मिडियाने हे आवर्जून लक्षात घ्यावे. 'मदर इंडिया' सारखे क्लासिक चित्रपट पाहून आजच्या ग्लोबल युगातील रसिकांना 'दर्जेदार चित्रपटाचे महत्व अधोरेखित होत राहिल आणि चित्रपट कसा पहावा याचे प्रत्यक्ष अप्रत्यक्ष मार्गदर्शन होईल'! ओटीटीवर हा चित्रपट उपलब्ध असेल तर आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल पिढीने तो आवर्जून पहावा. (मी तुमच्यासाठी उपरोल्लेखित सर्व चित्रपटांच्या "लिंक्स" दिल्या आहेत. नक्की आस्वाद घ्या!) चित्रपटसृष्टीतील नवीन पिढीतील लेखक, दिग्दर्शक, कलाकार व तंत्रज्ञ यांच्यासाठी हा चित्रपट उत्तम आदर्श आहे!

'मदर इंडिया' ची तेलगू भाषेत 'बंगारु तल्ली'

(१९७१) नावाने तर तमिळ भाषेत 'पुनिया बूमी' (१९७८) या नावाने रिमेक करण्यात आली. अर्थात, एकाच वेळेस समाजावर प्रभाव आणि व्यावसायिक यश असा समतोल साधलेल्या चित्रपटाची रिमेक झाली नसती तर नवलच! सिनेमाच्या जगात कायमच 'यशासाठीचा हुकमी फॉर्म्युला लागतो' तो त्या क्षेत्राचा स्वभाव आहे! कधी या चित्रपटाची थेट रिमेक झाली तर कधी चातुर्याने! गुलशन रॉय निर्मिती, त्रिमूर्ती फिल्मचा यश चोप्रा दिग्दर्शित 'दीवार' (१९७५) मध्ये तो मोठ्या हिंदी चित्रपटांचा जर्म पटकथा संवाद लेखक सलिम जावेद यांनी एकत्र आणला. 'मदर इंडिया'ची करारी माँ आणि नीतिन बोस दिग्दर्शित 'गंगा जमुना' मधील दोन भिन्न स्वभावाचे भाऊ. (दिलीपकुमार आणि त्याचा सख्खा भाऊ नासिर

खान यांनी या भूमिका साकारल्या!) ही केमिस्ट्री जमवताना सत्तरच्या दशकाच्या काळाचे भान ठेवले. 'दीवार' मधील आईदेखील (निरुपा रॉय) अतिशय खस्ता खाऊनच आपल्या दोन मुलाना मोठे करते! एक कष्टकरी स्वाभिमानी मुलगा मोठेपण अपप्रवृत्तीसाठी काम करु लागतानाच 'मेरे पास बंगला है, गाडी है..' अशा श्रीमंतीचे दर्शन घडविताना दुसरा भाऊ शांतपणे म्हणतो 'मेरे पास माँ है..' हा सरळमार्गी भाऊ (शशी कपूर) पोलीस इन्स्पेक्टर आहे! क्लायमॅक्सला अर्थात, 'मदर इंडिया' सारखाच! 'दीवार' खणखणीत यशस्वी झाल्याने त्याच्याही कधी काही बदल करुन तर कधी काही नवीन आकार देण्याचा प्रयत्न करत रिमेक आल्याच! काही नावे सांगायची तर दिग्दर्शक राजेन्द्रसिंग बाबूचा 'मेरा फैसला'

(अखेरीला चुकीच्या रस्त्याने गेलेल्या मुलाला आईच गोळी घालते. निरुपा रॉय आणि संजय दत्त यांच्या भूमिका आहेत), महेश भट्ट दिग्दर्शित 'नाम' (१९८६) एक सरळमार्गी भाऊ (कुमार गौरव) आणि एक वाममार्गी (संजय दत्त) आणि दोनो के बीच करारी माँ.. ची (नूतन) 'दीवार'! याशिवाय, 'जीवन एक संघर्ष', 'प्रतिकार', 'फलक' यात 'दीवार'ची मूळे ठळकपणे पण फसलेली दिसतात! विशेष म्हणजे, 'जीवन एक संघर्ष' ची पटकथा जावेद अख्तरची आहे, तर 'फलक', 'नाम' हे सलिम खानने लिहिलेत! म्हणजे, मुळातील 'मदर इंडिया' त्यांनी किती प्रकारे आणि प्रमाणात खेळवला ते पहा! (खरं तर 'दीवार' वगळता कोणताही चित्रपट पाहण्यासारखा नाही!), तर अरविंद सामंत निर्मित अष्टविनायक चित्रच्या 'अरे

संसार संसार' (दिग्दर्शक राजदत्त) या चित्रपटावरही 'मदर इंडिया' चा प्रभाव आहे. रंजनाने मध्यवर्ती भूमिका साकारलीय. तरी या चित्रपटाला स्वतंत्र व्यक्तीमत्व देण्यात यश लाभले आणि चित्रपट लोकप्रिय झाला!

'मदर इंडिया' चा प्रभाव आणि प्रवास असा आहे, पण मूळ चित्रपटातील ग्रामीण भागातील सामाजिक परिस्थिती आज खरंच बदलली आहे का हा प्रश्न कायम आहे! कष्टकरी वर्गाची आर्थिक पिळवणूक आजही कायम आहे. गरीबीमुळे होणारी ससेहोलपटही संपलेली नाही! तर दुसरीकडे शहरात पहावे तर अनेक कुटुंबात आईला वृध्दाश्रमात ठेवण्याची पद्धत वाढलीय अथवा गावच्या घरी पाठवले जातेय.

'मदर इंडिया' पुन्हा पुन्हा पाहताना वेगळा

दिसतो याला बरीच सामाजिक पार्श्वभूमी आहे! काही चित्रपट पडद्यावरच राहत नाहीत, तर त्यांचा असाही प्रवास सुरू असतो हे त्या कलाकृतीचे यशच!

महिला दिनानिमित्त "मदर इंडिया" या चित्रपटाची आवर्जून आठवण हवीच. हिंदी चित्रपटसृष्टीतील एक क्लासिक कलाकृती म्हणून हा चित्रपट कायमच गौरविण्यात येतो.

© दिलीप ठाकूर
(महाराष्ट्र दिनमान-शनिवार लेख)
♥




♥

## लेख क्र. १२

### 'कहो ना...प्यार है' ला पंचवीस वर्षे झालीदेखील....!




अगदी कालपरवाची गोष्ट वाटते. मनोरंजन उपग्रह वाहिन्यांवर अवघ्या काही सेकंदाच्या एका तजेलदार नवीन टीझरने आपलं लक्ष वेधून घेतले होते. ते नवीन चेहरे होते, हृतिक रोशन व अमिषा पटेल! आणि चित्रपट, 'कहो ना... प्यार है'. एका छोट्याश्या म्युझिक पिसवरचा न्यूझीलंडच्या प्रसन्न समुद्र किनाऱ्यावरील या दोघांचे नवीन शैलीतील नृत्य.....नवीन शतकातील प्रवेश करणारी युवा

पिढी तर झालेच पण मागील दशकातील म्हणजे ऐंशी नव्वदच्या दशकातीलही युवा पिढी या टीझरने भारी इम्प्रेस झाली!

'कहो ना प्यार है' च्या आगमनाबाबत अतिशय तरुण आल्हाददायक वातावरण निर्माण झाले, तरी या चित्रपटाची आणि त्यातही हृत्विक रोशनची क्रेझ निर्माण होईल असे कोणाला हो वाटले होते!? राकेश रोशनचा चित्रपट दिग्दर्शनातील ग्राफ चढउताराचा असला तरी त्याने तरी या चित्रपटाच्या घवघवीत यशाची अपेक्षा कुठे हो ठेवली होती?

आणि आज पंचवीस वर्षे पूर्ण झाल्यावरही हा चित्रपट तितकाच फ्रेश आहे. त्यातील हृत्विक रोशनची नवीन स्टाईलमधील नृत्य शैली आणि राजेश रोशनचे तरुण संगीत हेही तितकेच आज

तारुण्यात आहे!

'कहो ना....' मुंबईत रिलीज १४ जानेवारी २०००. मेन थिएटर इरॉस!! फर्स्ट शोपासूनच पिक्चर युवा रसिकांना आवडले. आणि तरुणांना आवडलेले चित्रपट कायमच हाऊसफुल्ल गर्दीत एन्जॉय केले जातात हे तर अनेक वर्षाचे हुकमी समीकरण! आजही हा चित्रपट 'जुना' अथवा मागील पिढीतील, इतकेच नव्हे तर सिंगल-स्क्रीन थिएटर्सच्या काळातील म्हणूनही गणला जात नाही. (तोपर्यंत मल्टीप्लेक्स युगाला गती आली नव्हती.)

हा चित्रपट पडद्यावर आला रे आला आणि सगळं वातावरणच बदलून गेले. जणू वातावरण तारुण्याने चार्ज झाले! कहो ना.... प्रदर्शित होईपर्यंत 'आल्सो चित्रपट' असं म्हटलं जाई.

म्हणूनच म्हणतो, पिक्चर रिलीज झाल्यावरच तो हिट की फ्लॉप हे समजते नि तो हक्क तिकीट काढून येणाऱ्या पब्लिकचा! सर्व हक्क प्रेक्षकांच्या स्वाधीन!!

मला आठवतय, या चित्रपटाची पूर्वप्रसिध्दी सुरु होताच अनेक पत्रकारांनी निर्माता व दिग्दर्शक राकेश रोशनच्या मुलाखतीला पसंती दिली. तोपर्यंत मी 'खुदगर्ज' व 'करण अर्जुन' या चित्रपटांच्या निमित्ताने राकेश रोशनची दोनदा सविस्तर व एक्सक्लुझिव्ह मुलाखत केल्याने मी ह्रतिक रोशनच्या मुलाखतीला पसंती दिली! (राकेश रोशनजींच्या चित्रपटांच्या "शीर्षकात" इंग्रजी आद्याक्षर "के" हमखास असते.. हे तर तुम्ही जाणताच!) तर.. नवीन पिढीसोबत जोडून राह्यला हवे हा मंत्र.. चित्रपटाचे जगही देतो! राकेश

रोशनच्या 'फिल्म-क्राफ्ट' या निर्मिती संस्थेचे ऑफिस तेव्हा सांताक्रूझ पश्चिमेला होते, तेथून निरोप आला, जुहू येथील अमिताभ बच्चनच्या प्रतिक्षा बंगल्याच्या मागच्या रस्त्यावरील कविता बिल्डिंगमधील पाचव्या मजल्यावर राकेश रोशनचे घर आहे, तेथे हृतिक रोशनची भेट घेता येईल! त्यानुसार मी गेलो! एक लक्षात घ्या, तोपर्यंत "हृतिक रोशन" या नावाला अजिबात ओळख नव्हती! ग्लॅमर नव्हते! राकेश रोशनचा मुलगा अशी व इतकीच त्याची ओळख होती आणि ती जपूनच सवडीनुसार तो दररोज एक मुलाखत देत होता! तशा पध्दतीनुसार मुलाखत घेणे नि देणे यांचे ते छान दिवस होते. आठवणीत राहिलेत. त्या घरात राकेश रोशनने एके काळी भूमिका केलेल्या 'घर घर की कहानी', 'पराया धन', 'खेल खेल मे', 'झूठा

कहीं का', 'हत्यारा' अशा चित्रपटांच्या यशाच्या स्मरणचिन्ह (अर्थात ट्रॉफिज) पाहून मी हृतिक रोशनला प्रश्न केला, हे चित्रपट तू पाहिले आहेस का? तो छान हसला आणि नाही म्हणाला! पण माझं हिंदी ऐकून मी महाराष्ट्रीय आहे हे लक्षात येताच तो म्हणाला, शाळेत असताना मला पन्नास गुणांचे मराठी होते. त्याचा हा प्रांजळपणा मला आवडला! (डिजिटल मिडियात हीच जणू बातमी!). मला आठवतय, त्या घरातील दूरसंचवाणीवर भारत विरुद्ध न्यूझीलंड कसोटी क्रिकेट सामना सुरु होता. थोडा वेळ तो आम्ही एन्जॉय केल्यावर मग आमची मुलाखत रंगली. तोपर्यंत तो 'चित्रपटात आलेला नवीन चेहरा' होता, त्यामुळेच त्याच्या वागण्या/ बोलण्यात/ पाहण्यात/ ऐकण्यात एक प्रकारचे साधेपण होते! आजही आहे, हे विशेष!

या चित्रपटाच्या अंधेरीतील एक पंचतारांकित स्थळी गाण्याच्या ध्वनिफित प्रकाशन सोहळ्यातही हृतिक रोशनचं एकूणच वागणं/वावरणं हे अगदीच सर्वसाधारण असेच होते! इतकेच की त्याची मैत्रीण 'सुझान खान' आपले पिता संजय खान व आईसोबत आली होती! राकेश रोशन मात्र अतिशय रुबाबात वावरत होता आणि अगदी अपेक्षेप्रमाणेच त्याचे मित्र जितेंद्र व ऋषि कपूर यांच्या शुभ हस्ते ऑडिओ रिलीज झाले! विशेष उल्लेखनीय गोष्ट! जया बच्चन या इव्हेन्टसला हजर होत्या! ते दिवसच वेगळे होते. अशा सोहळ्याच्या आठवणी मनात जागा मिळवत. चित्रपटसृष्टीत प्रत्यक्षात भटकंती/ निरीक्षणे करण्यातून हे आले. मनात राहिले!!

मुंबईतील आम्हा चित्रपट समीक्षकांसाठी गोरेगावच्या दादासाहेब फाळके चित्रनगरीतील 'मिनी-थिएटर'मध्ये झाला. छान मनोरंजक चित्रपट अशीच आमची सर्वसाधारण प्रतिक्रिया होती. आणि असे ढिगभर पिक्चर पाहिल्याने त्यात आणखीन एक भर असाच एकूण मामला होता!

पिक्चरची गाणी हा कायमच महत्वाचा ॲसेट! आपल्या देशातील चित्रपट संस्कृतीतील जान. मराठी व हिंदीसह तब्बल पस्तीस भाषेत चित्रपट निर्माण होताहेत त्यातील गीत संगीत व नृत्य संस्कृती बहुस्तरीय! 'कहो ना...' ची गाणी अतिशय वेगाने लोकप्रिय झाली. युवा पिढीला कॅची वाटली! ही एम टीव्ही पिढी होती! अजून हातोहाती मोबाईल आला नव्हता! पण तरुण संगीत हवं होते! त्यातच नृत्य दिग्दर्शिका फराह खानने ह्रतिक

रोशनला दिलेल्या नृत्य स्टेप्स भन्नाट व स्टाईलीश! 'कहो ना... प्यार है..', 'ना तुम जानो ना हम..', 'प्यार की कश्ती मे..', 'चांद सितारे..', 'दिल ने दिल को पुकारा..', 'एक पल का जीना..'! तरुणाईवर या प्रत्येक गाण्याची विलक्षण जादू! गाण्यांसाठी पुन्हा पुन्हा हा चित्रपट पाहू जाऊ लागला! गाण्यांसाठी आपल्या देशातील चित्रपट रसिकांनी अनेक चित्रपट पुन्हा पुन्हा एन्जॉय केलेत. चित्रपटात हृतिक रोशनची रोहित व राज चोप्रा अशी दुहेरी भूमिका! एकसारखेच दिसणारे दोघे आणि प्रेमकथा व सूडाची गोष्ट याभोवतीची हनी इराणीची पटकथा! चित्रपटातील राज आणि सोनिया सक्सेना (अमिषा पटेल) यांच्या पहिल्या भेटीचा प्रसंग हा हृतिक रोशन व सुझानच्या प्रत्यक्षातील पहिल्या भेटीसारखाच अशी 'स्टोरी'

रंगली! अशा गोष्टी चित्रपटाला फोकसमध्ये ठेवतात. मध्यंतरनंतर न्यूझीलंडच्या अतिशय अप्रतिम अशा दिलखुलास मोकळ्याढाकळ्या निसर्ग सौंदर्यात! (न्यूझीलंडला शूटिंगला जा.. हा सल्ला गीतकार व दिग्दर्शक सावनकुमार यांचा! 'सनम हरजाई'चं त्यांनी तेथेच शूटिंग केले होते.)




'कहो ना...' च्या देखणेपणात न्यूझीलंडचा वाटा खूपच महत्वाचा! अहो, पिक्चर हिट होताच चक्क न्यूझीलंडचे पर्यटन वेगाने वाढले! चित्रपटाचे यश बरेच काही घडवत असतेच असते. काही

महिन्यांनी याची परतफेड करण्यासाठी की काय न्यूझीलंडचे विदेश मंत्री भारत भेटीवर आले आणि दक्षिण मुंबईतील एका शानदार हॉटेलमध्ये एक शानदार खाना आयोजित केला होता! मला आठवतय त्यात राकेश रोशनला किती बोलू नि किती नको असे झाले होते. चित्रपटाच्या जगात यश हेच चलनी नाणे असल्यानेच अशा अनेक लहान मोठ्या गोष्टी घडत असतात!

पिक्चर सुपरहिट झाला आणि अनेकांना करिना कपूरची आठवण आली!

यामागे एक 'स्टोरी' आहे. चित्रपट सरळ रेषेत बनतीलच याची खात्री नसते!

'कहो ना...प्यार है'मध्ये तीच हृतिक रोशनची नायिका होती. मुंबईत महालक्ष्मी येथील फेमस स्टुडिओतील पहिल्या चित्रीकरण सत्रात तिने

भागही घेतला. त्या शूटिंगच्या बातम्या आल्या. त्यात हृतिक रोशनपेक्षा करिनाचे अर्थात बेबोचे पारडे जड वाटत होते. काही झाले तरी ती कपूर! तीच 'रोशन' असणार! अभिषेक बच्चन अभिनय क्षेत्रात आला आणि कहानी मे ट्विस्ट आला. अमिताभ बच्चनचा मुलगा म्हणजे, अतिशय वजनदार गोष्ट! करिना अर्थात बेबोच्या अतिशय महत्वाकांक्षी आई बबिताला वाटलं, ह्य!!... हृतिक रोशन काय? त्यापेक्षा अभिषेक बच्चन मोठ्ठ नाणे! सोनेरी संधी. त्याच्यासोबत करिनाचा पहिला चित्रपट असावा. तिने तशी राकेश रोशनला कल्पना देत 'कहो ना...' मधून करिनाला बाहेर काढून जे. पी. दत्ता दिग्दर्शित 'रिफ्यूजी' मध्ये करिनाला अभिषेक बच्चनची नायिका केले! स्टार माँचा फिल्मी हट्ट दुसरं काय? ... आणि अमिषा

# पटेलला 'कहो ना....' ची जणू लॉटरी लागली!




चित्रपटाच्या जगातील पडद्यामागच्या गोष्टी जास्त रंगतदार असतात. त्यालाही चित्रपटाच्या प्रवाहात स्थान आहे हो!!

हृतिक रोशनने बालकलाकार म्हणून आपले आजोबा जे. ओम प्रकाश यांच्या दिग्दर्शनातील 'आशा', 'आसपास', 'भगवानदादा' या चित्रपटात भूमिका साकारल्याने 'चित्रपट कॅमेरा' साधारण माहित होता! वयात येताना आपले दिग्दर्शक पिता राकेश रोशनच्या 'करण अर्जुन', 'कोयला',

'कारोबार'च्या वेळेस सहाय्यक दिग्दर्शक म्हणून उमेदवारी करताना चित्रपटाच्या सेटवरचे वातावरण आणि हे माध्यम याच्याशी त्याचा परिचय वाढला! राकेश रोशनचा मुलगा म्हणून त्याला स्पेशल ट्रीटमेंट अजिबात नव्हती! चित्रपटसृष्टीत येताना अशा लहान मोठ्या फारच उपयुक्त असतात याचा धडा या क्षेत्रात येणाऱ्यांसाठी खूप महत्वाचा. हृतिक रोशनमधील नवीन गोष्टी शिकण्याची प्रवृत्ती त्यालाच हितकारक ठरली. त्याचं फिजिक्स (दणकट शरीरयष्टी!), वेगळीच नृत्य शैली या गोष्टीवरचे त्याचे लक्ष आणि त्यावरची त्याची मेहनत उल्लेखनीय! स्टार एका दिवसात घडत नसतो. त्यामागे असा एक प्रवास असतो. कहो ना... च्या यशाच्या मंतरलेल्या वातावरणातील त्याच्या

अफाट क्रेझने शाहरुख, आमिर, सलमान या खानावळीलाही मागे सारले. त्यांचा एक उत्तम स्पर्धक निर्माण झाला!

..... हे सगळं कलरफुल घडून चक्क पंचवीस वर्षे झाली देखील? म्हणजे रसिकांच्या दोन पिढ्या ओलांडूनही हा चित्रपट सतेज, तारुण्यात, त्याचं आकर्षण कायम आहे. आजही यातील 'एक पल का जीना...' गाण्यावर क्लब, पब, पार्टीत आजची तरुणाई नाचायला लागते, तेव्हा चित्रपटाचे नाव सार्थ होते, कहो ना... प्यार है!!

© दिलीप ठाकूर
(राम प्रहर-झूम प्रहर-रविवार लेख)
♥

## लेख क्र. १३

# पिक्चरमधला "सोंगाड्या" ५४ वर्षांचा झाला...!




काय तो गबाळा वेष. ढगाळ हाफ पॅन्ट. सदराही मापाचाच असावा का असा प्रश्न. काही तरी हरवल्यासारखी अथवा अचानक काही गवसल्यासारखी नजर. भाषा अगदी गावरान! दिसायला तसा येरा गबाळा असला तरी मनाने सच्चा, भाबडा, निरागस. सांगायचं तर गावाकडचा एक वेडाबागडा, भोळाभाबडा तरुण!

असा 'सोंगाड्या' चक्क चोपन्न वर्षांचा झाला!

तो आठवला तरी हसे फुटते तर मग आणखीन काय हवे? वर्षे कशी सिनेमाच्या रिळापेक्षाही अधिकच वेगाने मागे सरकत असतात बघा. दादा कोंडके निर्मित व अभिनित "सोंगाड्या" (प्रदर्शन १२ मार्च १९७१! पुणे) च्या प्रदर्शनास चक्क इतका कालावधी व्हावा? 'सोंगाड्या' म्हटलं की, दादा कोंडके यांच्या उपदव्यापी, धसमुसळ्या रुपडासह तो अख्खा धमाल पिक्चर गीत संगीत नृत्यासह डोळ्यासमोर येतोच. सिंगल स्क्रीन थिएटर्स अर्थात एकपडदा चित्रपटगृह ते ओटीटी असा या काळात पब्लिकपर्यंत पिक्चर पोहचण्याच्या पध्दतीने बदलता प्रवास करताना रसिकांच्या पिढ्या बदलल्या तरी 'सोंगाड्या' ची हवा कायम. आणि तेच तर महत्वाचे असते!

बरं, तसे अनेक पिक्चर हिट/सुपर हिट

होतात. 'सोंगाड्या' ची एकूणच 'स्टोरी ' वेगळीच!

मराठी चित्रपटाच्या खणखणीत इतिहासातील सर्वोत्तम दहा यशस्वी चित्रपटात 'सोंगाड्या'चा उल्लेख होतोच ही तर केवढी मिळकत. निर्मितीमागची गोष्ट विलक्षण रंजक. प्रत्येक पिक्चरच्या जन्माच्या कळा वेगळ्याच असतात. आणि पिक्चर पडद्यावर कसे येईल हेही अनेकदा सांगता येत नाही. 'विच्छा माझी पुरी करा' या वगनाट्यामुळे शाहीर दादा कोंडके हे नाव महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यात पोहचले होते. तात्कालिक सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक घटनांवर दादा कोंडके अतिशय मार्मिक, मिश्किल कोटी करीत स्टेजवर धमाल उडवत. त्यांचा हजरजबाबीपणा विलक्षण होता. तो अंगभूत होता, त्यांच्या मूळ स्वभावाशी सुसंगत होता. ही विनोदी

टिप्पणी या वगनाट्याचे आणि दादा कोंडके यांचे खास वैशिष्ट्य होते. अशातच निर्माता आणि दिग्दर्शक भालजी पेंढारकर यांनी आपल्या 'तांबडी माती' (१९६९) या चित्रपटात दादा कोंडके यांना संधी देऊन मराठी चित्रपटाच्या विश्वात आणले. या




चित्रपटाला व्यावसायिक यश लाभले नाही आणि दुसरं म्हणजे दादा कोंडके यांचा चित्रपट या माध्यम व व्यवसायाकडे अजिबात ओढा नव्हता. ते आपलं माध्यम नाही, कॅमेरा आपल्याला जखडून टाकतो असेच ते मानत. रंगभूमीवर आपण ज्या पध्दतीने मोकळ्याढाकळ्या पध्दतीने वावरतो, ते कॅमेराच्या

चौकटीत जमणे शक्य नाही, अशी दादा कोंडके यांना भीती वाटत होती. चित्रपट या चित्रचौकटीची त्यांना ओळख नव्हती. त्यामुळे त्यांनी 'विच्छा माझी पुरी करा' मधून मिळत असलेल्या पैशातून गिरणगावात अर्थात मध्य मुंबईत खाणावळ टाकावी असा एकाद्या मध्यमवर्गीय पारंपरिक मराठी माणसाप्रमाणेच एक विचार भालजी पेंढारकर यांच्यापुढे व्यक्त केला. पण चित्रपट क्षेत्रावर मनस्वी प्रेम असलेल्या भालजीना हे पटणे अजिबात शक्य नव्हतेच. त्यांनी दादा कोंडके यांना सांगितलं, कलेच्या माध्यमातून मिळालेला पैसा कलेच्या क्षेत्रातच गुंतवा'. दादा कोंडके यांना भालजींचा सल्ला नाकारता येणे शक्यच नव्हते. तशी हिम्मत नव्हती असंही म्हणता येईल. त्यानी सदिच्छा चित्र ही आपली चित्रपट निर्मिती संस्था

स्थापन केली आणि आपल्याच "विच्छा माझी पुरी करा" मधील सहकारी साहित्यिक वसंत सबनीस यांना चित्रपट लिहायला सांगितले. आता दादा कोंडके 'नायक' साकारणार म्हणजे कथेचा बाजही त्यांच्या लवचिक ढसमुसळ्या शैलीला साजेसा हवा होता. वसंत सबनीस यांनी दादांच्या सगळ्या गोष्टींचा आणि मर्यादांचा विचार केला आणि 'सोंगाड्या'ची कथा/पटकथा/संवाद लिहिले. ग्रामीण चित्रपटाची निर्मिती करायची हे अगोदरच ठरले होते. तसा 'फोकस' ठेवूनच सगळ्या गोष्टी घडत गेल्या. या चित्रपटाचे दिग्दर्शन गोविंद कुलकर्णी यांजकडे सोपवले. त्या सुमारास त्यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या कथेवरून 'मुरळी मल्हारी रायाची' हा तमाशापट दिग्दर्शित केला होता. त्यांचा तोच अनुभव उपयोगात येईल अशाच

हेतूने त्यांच्याकडे 'सोंगाड्या 'चे दिग्दर्शन सोपवले. नायिका म्हणून उषा चव्हाणला संधी मिळाली. तिला एका मोठ्या ब्रेकची गरज होती. तोपर्यंत तिने काही चित्रपटात काम केले तरी तिला ओळख मिळत नव्हती. व्यावसायिकदृष्ट्या ती अडथळत होती. नृत्यात ती विलक्षण पारंगत होतीच. 'सोंगाड्या 'च्या मित्राच्या भूमिकेत निळू फुले यांची निवड होणे अगदी स्वाभाविक होतेच. दादा कोंडके आणि निळू फुले हे तत्पूर्वी राष्ट्र सेवा दलाच्या कथापथकात एकत्र होतेच आणि दादा कोंडके यांचा पहिलाच चित्रपट असल्याने निळू फुले यांचा सहभाग अपेक्षित होताच. अनंत माने दिग्दर्शित 'एक गाव बारा भानगडी' या चित्रपटाच्या यशाने निळू फुले लोकप्रिय झाले होतेच. दादा कोंडके नायक तर निळू फुले त्यांचा

मित्र.. अशा एकमेकांना पूरक भूमिकानी 'सोंगाड्या' मध्ये एक समतोल राखण्यासाठी तशी पात्ररचना करण्यात आली. निळू फुले यांच्या व्यक्तिरेखेचे स्वतंत्र अस्तित्व राखून दादा कोंडके यांच्या 'सोंगाड्या' नायकाला आवश्यक अशी उर्जा पुरवायची अशी मांडणी केली. पण असे असले तरी चित्रपट निर्मितीला पैसा हवा. नुसता उत्साह उपयोगाचा नसतो. या चित्रपटाच्या निर्मितीत जस जसे दादा कोंडके आणि त्यांचे युनिट पुढे जाऊ लागले तस तसा वाढता खर्चही लक्षात येत गेला. हे वास्तव फार विचित्र असते. पुढचे पाऊल तर टाकलेले असते आणि माघार घेता येत नाही. सगळा चित्रपट कोल्हापूरला जयप्रभा स्टुडिओ आणि आजूबाजूच्या परिसरात चित्रीत करायचे ठरवले होतेच. विच्छा माझी पुरी कराच्या

प्रयोगांतून मिळणारे पैसे या चित्रपटाच्या निर्मितीसाठी वापरले जाऊ लागले. तोच एक आर्थिक स्रोत होता. ही एक प्रकारची ओढाताण होती! असे करत करत 'सोंगाड्या' ची ६५ हजार रुपयांत निर्मिती झाली. बावन्न वर्षांपूर्वी ही रक्कम फार मोठी होती. त्यावेळी शहरात मध्यमवर्गीय मराठी माणसाला मासिक पाचशे रुपये पगार प्रचंड सुख देणारा होता, ही वस्तुस्थिती आहे!

चित्रपट पूर्ण झाला, पण त्याला वितरकच मिळेना. त्या काळात मराठी चित्रपटाचा निर्माताच वितरक बनत असे अथवा तोच एक मार्ग होता. तरी दादा कोंडके यांनी त्या काळातील हिंदी चित्रपटसृष्टीतील दादा वितरक गुलशन रॉय यांच्यासाठी या चित्रपटाची ट्रायल ठेवली! त्यांनी फक्त ३५ हजार रुपयांत वितरण हक्क

मागितल्यावर दादा कोंडके यांनी निर्णय घेतला की आपला चित्रपट आपणच रिलीज करु. त्या काळात मराठी चित्रपट निर्माता आपल्या चित्रपटाच्या जेमतेम चारच प्रिन्ट काढू शकत होता आणि तीच रिळे तो एका शहरातून इतरत्र प्रदर्शित करायचा. त्यात वावगं काही नव्हतेच. तीच तर पध्दत होती. दादा कोंडके यांनी कामाक्षी चित्र ही आपली चित्रपट वितरण संस्था स्थापन केली आणि पुणे शहरात अलका टॉकीज तर काही महिन्यांनी मुंबईत कोहिनूर टॉकीज येथे 'सोंगाड्या' रिलीज केला. 'सोंगाड्या' दादा कोंडके यांचे हाफपॅन्टमधील भोळे भाबडे रुप, त्यांचा अतिशय साधेपणा, आपल्या आयेशी अर्थात आईशी असलेले विलक्षण जिव्हाळ्याचे नाते, नायिका उषा चव्हाणसोबत पडद्यावर उडवलेली धमाल आणि

लोकप्रिय गीत संगीत व नृत्य यामुळे हा चित्रपट अक्षरशः धुंवाधार सुपर हिट झाला. प्रत्येक शो हाऊसफुल्ल गर्दीत दणक्यात रंगू लागला. अशातच मुंबईत दोन आठवडे कधी सरले हे समजलेच नाही आणि पूर्वकरारानुसार दादरच्या कोहिनूर टॉकीजच्या मालकाने हा चित्रपट उतरवून विजय आनंद दिग्दर्शित नवकेतन फिल्मचा 'तेरे मेरे सपने' रिलीज करायचे ठरवले! हे पाहून दादा कोंडके निराश होऊन शिवसेना प्रमुख



बाळासाहेब ठाकरे यांच्या भेटीसाठी मातोश्री बंगल्यावर गेले. मराठी चित्रपटावर अन्याय होतो आहे हे बाळासाहेबांना सहन होणे शक्यच नव्हते! त्यांनी तडक आदेश दिला, कोहिनूर टॉकीजवर 'तेरे मेरे सपने' रिलीज होता कामा नये, 'सोंगाड्या'च कायम राहिल. शिवसैनिकांनी कोहिनूर टॉकीजला जबरदस्त गराडा घालून जोरदार आंदोलन केले आणि 'तेरे मेरे सपने' ची सगळी पोस्टर, होर्डिंग्स फाडली आणि 'सोंगाड्या'चे प्रदर्शन पुढे कायम ठेवण्यास भाग पाडलं! त्यानंतर याच कोहिनूर टॉकीजमध्ये 'सोंगाड्या' ने तब्बल पन्नास आठवड्यांचा मुक्काम केला आणि दादा कोंडके पर्व सुरू झाले ते जणू कायमचेच. हे कोहिनूर टॉकीज म्हणजे आजचे नक्षत्र थिएटर होय!

'सोंगाड्या 'चे कथासूत्र छोटेसेच आहे. पण विनोदाचे टायमिंग, काही भावपूर्ण प्रसंग यांच्या जोडीला गीत संगीत व नृत्य यांची रेलचेल यावर चित्रपट धमाल उडवत मनोरंजन करतो. या चित्रपटाला तमाशाची पार्श्वभूमी असली तरी त्याचा बाज वेगळा होता. तोपर्यंतच्या तमाशापटापेक्षा हे वेगळेपण ठरले आणि नेमके तेच प्रेक्षकांना आवडले. कथेच्या केन्द्रस्थानी तमाशातील सोंगाड्या होता. सुरुवातीला त्याची खूपच थट्टा, टवाळी केली जाते पण आपले वागणे आणि गीत नृत्य कला या गुणांनी तो नायिका आणि तो तमाशाचा फड असे दोघांनाही जिंकतो. अतिशय भाबडा, निरागस, मनाने सच्चा, नीतीची आणि न्यायाची उपजतच जाण असलेला असा हा ग्रामीण नायक होता. दादा कोंडके यांच्या व्यक्तिमत्त्वाची

आणि स्वानुभवाची बरीचशी जोड यात होती. त्यामुळे ते जास्तच खुलले. जोडीला सतत साथ देणारा मित्र होताच. तो निळू फुले यांनी रंगवला. तसे पाहिले तर जवळपास हा रंगभूमीवरील एक प्रकारचा तमाशाच सिनेमाच्या पडद्यावर साकारला आहे. पण विनोदाचे टायमिंग विशेषतः हजरजबाबीपणा या चित्रपटाची गंमत ठरला. ग्रामीण जीवनातील निरागसता आणि त्यातून होणारी सहजसुंदर तितकीच निरागस विनोद निर्मिती हे 'सोंगाड्या 'च्या यशाचे वैशिष्ट्य ठरले आणि मग दादा कोंडके यांनी तीच आपल्या गोष्टीची आणि चित्रपटाची चौकट सांभाळत प्रेक्षकांचे भरपूर मनोरंजन केले. तीन चार चित्रपटांतच ते द्व्यर्थी संवादात/ विनोदात रमले.

या चित्रपटात रत्नमाला यांनी दादा कोंडके

यांच्या आयेची भूमिका साकारली आणि मग त्यांचे हे नाते अनेक चित्रपटांत कायम राहिले. गणपत पाटील, गुलाब मोकाशी, संपत निकम, वसंत खेडेकर, भालचंद्र कुलकर्णी, दामोदर गायकवाड, मधु भोसले, शांता तांबे इत्यादीच्या प्रमुख भूमिका आहेत. या चित्रपटाचे छायाचित्रण अरविंद लाड यांचे तर संकलन एन. एस. वैद्य यांचे आहे. 'सोंगाड्या'ची सगळीच गाणी खेड्या पाड्यात दूरवर प्रचंड लोकप्रिय झाली याचे कारण म्हणजे त्याचा लोकसंगीताचा असलेला बाज. दादा कोंडके मूळात कथापथकात घडल्याने जनसामान्यांना कशा पद्धतीची गाणी आवडतील याची त्यांना चांगली कल्पना होती आणि ते या चित्रपटाच्या गीत संगीताच्या पथ्यावर पडले. या चित्रपटाची गीते वसंत सबनीस, जगदीश खेबूडकर आणि खुद्द

दादा कोंडके यांची आहेत तर त्याना राम कदम यांचे संगीत आहे! त्यांनी प्रत्येक गाण्यात लोकसंगीताचा ठेका उत्तम पकडलाय. 'राया चला घोड्यावरती बसू..', 'माळ्याच्या मळ्यामध्ये कोण गं उभी..', 'बिब घ्या बिब..', 'राया मला पावसात नेऊ नका..', 'गेला सोडूनी मजसी कान्हा..' आणि 'काय ग सखू बोला दाजिबा..' अशा गाण्यांचा समावेश आहे. यातील मळ्याच्या मळ्यामध्ये कोण गं उभी आणि काय ग सखू बोला दाजिबा ही गाणी तर अधिकच लोकप्रिय ठरली आणि ती गाणी पाहण्यासाठी अनेक प्रेक्षकांनी पुन्हा पुन्हा थिएटरमध्ये जाणे पसंत केले. लोकप्रिय गाणी पिक्चरचा थिएटरमधला मुक्काम वाढवत आणि पब्लिकच्या टाळ्या शिट्ट्यांनी हीच गाणी एन्जॉय केली जात. राज्य चित्रपट महोत्सवात या

चित्रपटाला सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा आणि दिग्दर्शनाचा तिसरा क्रमांक मिळाला. या यशोगाथेला चक्क चोपन्न वर्षे झाली!

'सोंगाड्या म्हणजे दादा कोंडके आणि दादा कोंडके म्हणजेच सोंगाड्या' या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल पिढीने 'यू-ट्यूब'वर या पिक्चरचा आनंद घ्यावाच. निदान गाणी तरी पहावीत. या पिक्चरच्या व्यक्तिमत्वाला ती कशी फिट्ट आहेत हे दिसेल!

काय ग सखू? बोला दाजिबा!!

© दिलीप ठाकूर
(राम प्रहर-झूम प्रहर-रविवार लेख)
♥

## लेख क्र. १४

## मेरे दिल मे आज क्या है.... 'दाग'@५२!




**बी. आर. फिल्म बॅनरचा सेफ झोन, सपोर्ट सिस्टीम सोडून यश चोप्रा बाहेर पडलेले.....!**

बी. आर. चोप्रा यांच्यासारख्या यशस्वी चित्रपट निर्माता व दिग्दर्शक आपला मोठा भाऊ याच्याकडे दिग्दर्शनाचे धडे गिरवले आणि भावाकडेच 'धुल का फूल' (१९५९), 'धर्मपुत्र' (१९६१), 'वक्त' (१९६५), 'इत्तेफाक' (१९६९), 'आदमी और इन्सान' (१९६९ ) हे चित्रपट दिग्दर्शित

केलेले. (आपल्या सख्या.. अशा मोठ्या भावाच्या मनाला वेदना देणं कितपत योग्य हे ज्यांचे त्यांना ठावे!) याचं पुढचं पाऊल म्हणून त्याने स्वतःची "यशराज फिल्म" ही चित्रपट निर्मिती संस्था स्थापन करताना चित्रपती व्ही. शांताराम यांचे आशीर्वाद लाभले आणि त्यांनीच यश चोप्रा यांना आपल्या परेल येथील राजकमल कलामंदिर स्टुडिओत ऑफिससाठी जागा दिली. (अशी मदतीचा हात पुढे करणारी माणसं त्या काळात होती.) त्या काळातील चित्रपट वितरणातील दादा.. गुलशन रॉय यांनी आपल्या मॉडर्न मुव्हीज या वितरण संस्थेची भक्कम अशी 'चित्रपट रिलीज सिस्टीम' यश चोप्रा यांच्या मागे उभी केलेली!

'इत्तेफाक' मुळे राजेश खन्नाशी छान सूर जुळल्याने तोच यशराज फिल्मच्या पहिल्या

चित्रपटाचा 'सुपर स्टार' हीरो! त्याची हुकमी नायिका शर्मिला टागोर आणि या दोघांच्या जोडीला राखी! राजेश खन्ना व शर्मिला टागोर शक्ती सामंता दिग्दर्शित 'आराधना' (१९६९) पासूनची हिट जोडी. 'अमर प्रेम', 'राजा रानी', 'मालिक' वगैरे चित्रपटांसह अधिकच एकरुप झाली, शोभली!

दिलीपकुमारच्या शुभ हस्ते राजकमलमध्ये 'दाग' चा शानदार मुहूर्त झाला आणि यशराज फिल्म बॅनरचे नवीन पर्व सुरु झाले! आणि वर्षेभरात २७ एप्रिल १९७३ रोजी 'दाग' प्रदर्शित झाला, त्याला यशस्वी बावन्न वर्षे पूर्ण झाली आहेत. मुंबईत मेन थिएटर मिनर्व्हात ज्युबिली हिट!

मला आठवतय, सत्तरच्या दशकाच्या सुरुवातीला गॉसिप्स मॅगझिनचे पेव फुटले होते.

"स्टार्स-वॉर्स", बोल्ड फोटो सेशन, फिल्मी पार्ट्यांची बिनधास्त व बेधडक वर्णने आणि सनसनाटी मुलाखती अशी खमंग मेजवानी त्यात असे. आणि अशातच एक 'कव्हर स्टोरी' प्रसिद्ध झाली आणि वाचता वाचता ती गाजू लागली! इंग्लिश मॅगझिनमधून हा खुराक मराठीतही आला. (तरी त्याला 'स्पेस' जेवणातील लोणच्यापुरती असे!) 'दाग' च्या सेटवर शर्मिला टागोर व राखीमध्ये धुसफूस! 'इगो प्रॉब्लेम'! चिडचिड वगैरे वगैरे! कोणी म्हटलं, राजेश खन्नाच्या 'ऑफ द स्क्रीन' सहवासावरुन दोघींत जुंपली! कोणी म्हटलं, राजेश खन्नाबरोबरच्या रोमॅन्टीक दृश्यावरुन वाद झालाय! एकदा का दोन अभिनेत्रींत वाद झाला की त्यात तिखट मीठ, खारट, हिंग टाकणारे बरेच असतात.

गॉसिप्सवालेही आपापल्या पध्दतीने त्यात रंगत आणणात. या भांडणाने 'दाग' पडद्यावर येण्यापूर्वीच गाजू लागला! त्यात चांगली भर पडली ती साहीर लुधियानवी यांची गीते आणि लक्ष्मीकांत प्यारेलाल यांच्या संगीताने! 'हम और तुम..' (किशोरकुमार व लता मंगेशकर), 'अब चाहे माँ रुठे या बाबा..' (किशोरकुमार व लता मंगेशकर), 'मेरे दिल मे आज क्या है..' (किशोरकुमार), 'एक चेहरे पे कयीं चेहरे..' (लता मंगेशकर), 'हवा चले कैसे..' (लता मंगेशकर), 'नी मै यार मनानानी..' (लता मंगेशकर व मिनू) या गाण्यांची तबकडी म्युझिक सेंटर अथवा म्युझिक शॉपमध्ये कधी आली आणि हिट कधी झाली ते समजलेच नाही! आणि गाणी हिट म्हणजे पिक्चरच्या आगमनाची वाढती उत्सुकता! अशातच २३ मार्च १९७३ रोजी

कोणाच्याही ध्यानीमनी नसतानाच राजेश खन्नाने 'बॉबी गर्ल' डिंपल कापडियाशी लग्न केले. एव्हाना 'बॉबी'चे शूटिंग संपले नव्हतेच!

'दाग' च्या एका पोस्टरने उत्सुकता निर्माण केली! शर्मिला टागोर व राखी यांच्या खांद्यावर हात टाकलेला राजेश खन्ना, म्हणजेच हा प्रेम त्रिकोण असणार हा पहिला सिग्नल! (पोस्टर बोलली पाहिजेत ती अशी! सिनेमाचे पोस्टर त्याची महत्वाची ओळख!) 'एक नायक व दोन नायिका ' हा फंडा कसा असेल याचे कुतूहल. ट्रेलरने त्यात भर घातली (त्या काळात अनेकदा पिक्चर रिलीज व्हायच्या आठ दिवस अगोदर ट्रेलर येत आणि वातावरण हाईपला जाई.)

पिक्चरसाठीच्या मिनर्व्हा थिएटरच्या ॲडव्हान्स बुकिंगची लांबलचक रांगच सांगत

होती, 'दाग'ची हवा निर्माण करण्यात यश मिळालयं.... मिनर्व्हातच गुरुवारी म्हणजे २६ एप्रिल रोजी ग्लॅमरस प्रीमियर रंगला! राजेश खन्नाचा लग्नानंतर रिलीज होणारा हा पहिलाच चित्रपट! साहजिकच डिंपलला घेऊन आला! थिएटरला पब्लिकचा भारी वेढा होता. त्या काळात 'पिक्चर चालवणारा मास' नवीन पिक्चरच्या स्वागताला असा उत्फूर्त असे. बीबीसीने त्या काळात राजेश खन्नावर बनवलेल्या डॉक्यूमेंटरीत याची झक्कास झलक दिसतेय!

'दाग'ची थीम पन्नास वर्षापूर्वी भारी होती..असंच असतं म्हणा! अमूक काळात सॉलीड वाटणारे नंतरच्या युगात 'ऑल्सो रन' वाटत असते! गुलशन नंदा यांच्या लेखनावर तेव्हा बरेच हिंदी फिल्मवाले फिदा होते! 'कटी पतंग' वगैरे अनेक

चित्रपट बनले! यशजींनाही तेच वाटलं! अख्तर अल इमान यांनी पटकथा लिहिली. तीच कमाल ठरली. सुनील कोहली (राजेश खन्ना) व सोनिया (शर्मिला टागोर) यांच्या प्रेमाचे रुपांतर लग्नात होते! हनिमूनला गेले असता धीरज कपूरची (प्रेम चोप्रा)ची बुरी नजर सोनियावर पडते आणि तो तिच्यावर जबरदस्तीचा प्रयत्न करतो. तेव्हा सुनीलकडून धीरजचा खून होतो आणि त्याला कठोर शिक्षा होते! अशा वेळी त्याला घेऊन जात असलेल्या पोलीस व्हॅनचा अपघात होतो आणि या संधीचा फायदा घेत सुनील पळतो आणि नवं आयुष्य जगायचे ठरवतो. (आपल्यावरचा गुन्हेगाराचा शिक्का सोनियाच्या नात्यात विघ्न ठरेल अशी त्याला भीती वाटत असते.) आता रुपडं बदललेला (मिशी लावलेल्या) सुनील आता

लग्नापूर्वीच गरोदर राहिल्याने प्रियकराने दगा फटका केलेल्या चांदनी (राखी) हिच्याशी लग्न करतो. काही वर्षांनी सोनिया एका हिल स्टेशनवर आपल्या लहान मुलासह राह्यला आल्यावर तिचा चांदनीशी परिचय होतो आणि तेव्हा तिच्या लक्षात येते, सुनील जिवंत आहे...! एका नाट्यमय वळणावर गोष्ट येते. अशा गोष्टीचा शेवट कसा असावा यावरुन यशजी व राजेश खन्नात ताणाताणी झाल्याची कुजबूज होती!

पिक्चरमध्ये मदन पुरी, कादर खान, ए. के. हनगल, बेबी पिंकी, मास्टर राजू, मनमोहन कृष्ण, अचला सचदेव, करण दिवाण, हरी शिवदासानी, जगदीश राज, मनमोहन, पद्मा खन्ना वगैरेच्या छोट्या छोट्या भूमिका आहेत! के. जी. यांचे छायाचित्रण (यशजींचे ते हुकमी होते), आर. सी.

गायकवाड यांचे कला दिग्दर्शन, सुरेश भट्ट यांचे नृत्य दिग्दर्शन यांचा उल्लेख हवाच. सिनेमा हे दिग्दर्शकाचे व्हिजन असले तरी टीम वर्क. आणि अशी सपोर्ट सिस्टीम भारीच हवी! राजेश खन्नाने मंतरलेले असे ते दिवस होते (तरी 'दाग'च्या दिवसांत काही फ्लॉपमुळे त्याला सॉलीड हिट पिक्चर हवा होताच.) त्याचा रोमान्स यात मस्त खुललाय, अशात त्याला शर्मिला टागोरची रुपेरी साथ (आमच्यावरील रोमॅन्टीक दृश्याच्या शूटिंगच्या वेळेस सेटवर फक्त आणि फक्त आवश्यक तेच असावेत अशी शर्मिला टागोरची अट होती म्हणे!) राखी भाव खाऊन जाताना फिल्म फेअर पुरस्कारही पटकावण्यात यशस्वी ठरली! असा हा 'दाग'!! गॉसिप्स व म्युझिक यांनी गाजवला आणि पब्लिकने उचलून घेतला!

यशजींना पहिल्यांदा 'चांदनी" या पिक्चरच्या वेळेस गवसली! मग 'सिलसिला' त रेखाचे नाव 'चांदनी' ठेवलयं आणि मग आपल्या कारकीर्दीतील सर्वोत्कृष्ट प्रेमपट 'चांदनी' (श्रीदेवी) घडवला! एका दिग्दर्शकाचा एकाद्या व्यक्तीरेखेचा प्रवास असा.....'दाग 'मध्ये जे पेरले ते १९८९ साली असे उगवले. तेलगूत १९७८ साली 'दाग 'ची रिमेक आली! आज 'मेरे दिल मे आज क्या है..' आठवलं तरी संपूर्ण 'दाग' डोळ्यासमोर येतोच. एकाद्या सुपर हिट चित्रपटाचा प्रभाव असा असतोच... मिशीधारी राजेश खन्ना आणि गालावर खळी पडलेली शर्मिला टागोर अशी जोडीही 'दाग' म्हणताच डोळ्यासमोर येतेच, आणखीन काय हवं?

© दिलीप ठाकूर
(राम प्रहर-झूम प्रहर-रविवार लेख)

♥

## लेख क्र. १५

## 'चल चल मेरे साथी'..... 'हाथी मेरे साथी' @ ५४




रमेश देव मला एकदा गंमतीत म्हणाले होते, मी शक्यतो प्राण्याभोवती गोष्ट असलेल्या चित्रपटात भूमिका साकारणे टाळतोच! कारण मग कायमच त्या प्राण्याच्याच कामाची चर्चा होत राहते आणि हीरो बाजूला पडतो! त्याने कशी मेहनत घेतली. तोच जास्त भाव खाऊन गेला..वगैरे....!!

रमेश देव हे सांगत असताना माझ्या डोळ्यासमोर चिन्नाप्पा देवर निर्मित व एम. ए.

थिरुमुगम दिग्दर्शित 'हाथी मेरे साथी' (मुंबईत रिलीज २१ मे १९७१) पिक्चर होता! त्यांच्या बोलण्यात तथ्य होते! आजही या पिक्चरचे नाव घेतले रे घेतले त्यातील रामू आणि त्याच्यासोबतचे हत्तीच पटकन आठवतात! तरी बरं! चार पिढ्यांनंतरही हा चित्रपट मॅटीनी 'शो' ते 'यू-ट्यूब' चॅनेल असा 'फोकस 'मध्ये आहे! राजेश खन्नाच्या अतिशय चलतीच्या काळातील हा पिक्चर म्हणजे यशाचे जवळपास सगळेच श्रेय त्याच्याकडेच जायलाच हवे ना? त्यातच 'आराधना' (१९६९) पासून त्याचे ओळीने पंधरा चित्रपट ज्युबिली हिट ठरले त्यातला हा एक! पण तरीही पिक्चरमध्ये रामू हत्तीने केलेले काम (त्याच्याकडून करुन घेतलेला अभिनय म्हणूया का?), क्लायमॅक्सला तोच हीरोचे (अर्थात राजेश खन्ना) प्राण वाचवतो आणि रामूला

खलनायक सुखनकुमारची (के. एन. सिंग) गोळी लागून त्याचा दुर्दैवी मृत्यू होतो! त्याची प्रेतयात्रा निघते आणि मोहम्मद रफीच्या दर्दभऱ्या आवाजात गाणे सुरु होते, 'नफरत की दुनिया छोडके....' थिएटरमधल्या अख्ख्या हाऊसफुल्ल गर्दीची सहानुभूती त्या रामू हत्तीला गेली!

अरेरे, पिक्चरचा खरा हीरो रामू हत्ती ठरला आणि राजेश खन्नाच्या खात्यात 'एका सुपर हिट चित्रपटाची' भर पडली इतकेच!

राजेश खन्नाने हा पिक्चर साईन करण्यामागची स्टोरी वेगळीच आहे. सुपर स्टार असताना तो वय वर्षे सात ते सत्तर असा प्रचंड लोकप्रिय होता! त्याची तेव्हाची क्रेझ एक प्रकारचा हिस्टेरिया होता! तो शब्दात पकडता येणार नाही असाच भारी होता! अशातच त्याला चेन्नईचे (तेव्हाचे

मद्रास) निर्माते चिन्नाप्पा देवर यांनी सायनिंग अकाऊंट म्हणून चार लाख रुपये दिले आणि या चित्रपटाची 'मूळे' ज्या तमिळ चित्रपटात होती त्यावर रिमेक करण्याची ऑफर दिली! तेव्हाचे चार लाख आजचे केवढे तरी होतात! राजेश खन्नाला आता आमच्या गिरगावातील ठाकूरव्दार नाक्यावरील सरस्वती निवासमधून फिल्म वाल्यांच्या 'इलाका'मध्ये (त्या काळात बरेच फिल्मवाले वांद्रे, कार्टर रोड ते जुहू या पट्टय़ात राहत!) राह्यला जायचे होते आणि कार्टर रोडवरील 'डिंपल बंगला' राजेंद्रकुमार विकत होता! तो विकत घेण्यासाठी लागणारा भारी पैसा चिन्नाप्पा देवर यांजकडून मिळत होता! (काही पैसा 'इत्तेफाक' साईन केल्यावर निर्माते बी. आर. चोप्रा आणि दिग्दर्शक यश चोप्रा यांनी दिला!) त्याच

पैशातून राजेश खन्नाने 'डिंपल' बंगला विकत घेऊन.. त्याचे नाव 'आशीर्वाद' केले!

एकाद्या चित्रपटाच्या 'निर्मितीमागची गोष्ट' अशी कशीही असू शकते. बरं हे सलिम खान यांनी एका मुलाखतीत सांगितलयं! सलिम जावेद जोडीच्या पटकथेवरचा हा पहिला चित्रपट! जावेद अख्तर यांनी एका मुलाखतीत म्हटलंय, एकदा राजेश खन्ना सलिम खानला घेऊन त्यांच्याकडे गेला आणि देवर आपल्याला चांगले मानधन देत आहेत तुम्ही दोघांनी 'Deiva Cheyal' ( १९६७) या तमिळ चित्रपटावरुन हिंदी चित्रपट लिहा म्हटलं. हत्तीभोवतीची गोष्ट लिहायचीय एवढाच फोकस ठेवून, जास्त ताण न देता आपण हा चित्रपट लिहिल्याचे जावेद अख्तर म्हणतात.

'एकाद्या चित्रपटाचा जन्म असा' होतो!

थीम काय होती? जंगलातून जात असलेल्या एका गाडीला अपघात होतो त्यात एक लहान मूल वाचते, ते हत्ती आणि आणि अन्य प्राणी पक्षी यांच्या सहवासात वाढते. आता नायक राजकुमार 'राजू' (राजेश खन्ना) आणि नायिका तनू (तनुजा) यांची जंगलात तिच्या बंद पडलेल्या गाडीला चार  हत्ती धक्का मारतात तेव्हा ओळख होते, मग प्रेम होते, लग्नही होते! तिच्या पित्याचा विरोध मावळतो. यात हत्तींचीही संगत असते. पण खलनायकाच्या गोळीने रामू हत्तीचे निधन होते. चित्रपटात के. एन. सिंग, मदन पुरी, ज्युनियर मेहमूद, डेव्हिड अब्राहम, सुजीतकुमार इत्यादींच्या प्रमुख भूमिका आहेत. पिक्चरचं शूटिंग जयपूर, म्हैसूर, चेन्नईत झाले. आनंद बक्षी यांच्या गीतांना लक्ष्मीकांत प्यारेलाल यांचे संगीत यांनी त्या काळात अनेक

सुपर हिट गाणी दिलीत. तशीच यातील 'चल चल मेरे साथी..', 'दुनिया मे रहना है तो काम कर प्यारे..', 'सुन जा आहा थंडी हवा..', 'दिलबर जानी..' अशी सगळीच गाणी आजही हिट आहेत! कालांतराने प्यारेलाल यांनी एका मुलाखतीत म्हटलं, 'नफरत की दुनिया..' या गाण्यासाठी मोहम्मद रफी यांचा आवाज असावा हे मला मान्य नव्हते. मात्र देवर, लक्ष्मीकांतजी आणि राजेश खन्ना यांना मात्र रफींचाच आवाज योग्य वाटला आणि तेच योग्य ठरले. तनुजाने अशीच काही वर्षांनी एक आठवण सांगितली, काजोल सहा वर्षांची तर तनिषा तीन वर्षांची असताना त्यांना हा चित्रपट दाखवला असता, त्याचा शेवट न आवडल्याने काजोल दोन आठवडे बोलत नव्हती..!

मुंबईत हा चित्रपट २१ मे १९७१ रोजी प्रदर्शित झाला तोच बच्चे कंपनीची झुंबड उडाली. एक आठवडा अगोदर दिल्लीत हाच रिस्पॉन्स होता. त्या काळात टप्प्याटप्प्याने चित्रपट प्रदर्शित होत. मुंबईत नॉव्हेल्टी थिएटरमध्ये ज्युबिली हिट ठरला. गंमत म्हणजे याच 'हाथी मेरे साथी'ची १९७२ साली तमिळ भाषेत Nalla Neram या नावाने रिमेक करण्यात आली.

असं सगळं जरी असले तरी हत्तीचे काम भारी होते असेच म्हटले गेले. इतकं की रामू हत्तीच्या निधनाची बातमी चक्क वृत्तपत्रात आली. प्रभात सर्कसच्या मालकाचा हा हत्ती कोकणातील आंबा घाटातून जात असतानाच माकडाच्या चित्काराने फार घाबरला आणि खोल दरीत पडल्याने त्याचे निधन झाले. १७ जानेवारी,१९७८

ची ही गोष्ट! चिन्नाप्पा देवर यांनी एकेक चित्रपट करत ('जानवर और इन्सान', 'गाय और गौरी', 'माँ', 'मेरा रक्षक' इत्यादी) पडद्यावर जणू प्राणीसंग्रहालय आणले. त्यातून त्यांची "प्राणीवाले दिग्दर्शक" अशी इमेज झाली! आजच्या 'नॅशनल जॉग्रफी', 'डिस्कव्हरी' अशी चॅनेल एन्जॉय करीत असलेल्या डिजिटल पिढीला हा चित्रपट भाकड कथा वाटेल. एकेकाळी तीच गोष्ट हा पिक्चर एन्जॉय केल्यावर घराघरात शेअर केली जाई. चोपन्न वर्षांपूर्वीचा चित्रपट व समाज वेगळाच तर होता! मला आठवतय!, मी तेव्हा वडिलांकडे हट्ट धरला होता, 'मला तो हत्तीवाला पिक्चर पाह्यचाय..!!' ते दिवसच वेगळे होते म्हणा!!

© दिलीप ठाकूर
(राम प्रहर-झूम प्रहर-रविवार लेख)

♥




## विशेष आभार : लेखक : डॉ. अनंत पावसकर, (संरचना/मुखपृष्ठ/ले-आऊट)

♥